Regd NO. N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख ४ माहे जानेवारी सन १९१५ ई० [ अंक १

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट ठेविली आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील पुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

### मुंबई बँकचें सोनें.

मुंबई बँकचा छाप असलेल्या उत्तम कसाच्या सोन्याच्या चिपा मुंबई बँकच्या आकोले आणि उमरावती येथील ऑफिसांत विकत मिळतील. गिऱ्हाइकानें जास्त माहिती कारितां समक्ष तपास करावा.

एका चिपचें वजन २१$\frac{१}{२}$ तोळे असतें.

मुंबई बँक } J. G. Ridland.
आकोला २१-९-१० } एजंट
नो. नं. १

### जाहिरात

मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा त्यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर त्यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयेप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नेयमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मेळतील.

मुंबई ब्यांक } J. G. Ridland.
आकोला ९।१।०९ } एजंट
नो. नं २

सतत ४२ वर्षे चाललेला कारखाना
ए. जे. ह्मात्रे आणि सन् सुगंधी.
ठिः--पांजरा पोळचा नाका, चिमणला-लमहाराजांचे मंदीर भुलेश्वर -- मुंबई.
एकच भाव ! एकच भाव !
अस्सल सुरंगी आमचेकड मिळणारा माल ओरो सुरंगी
अत्तरें--गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकुल, रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्कहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. ही अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.— चमेली, बेलिया, मुसुंदा, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगंधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. दर बाटली ४ आणे

अष्टगंधी अरगजा, १ तोळ्यास ४ आ ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना ( निरनिराळ्या सुवासाचा ) दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उदणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आयुर्वर्धक कार्डस, बिझिक, इस्पिकें, हस्तीदंती फासे व फण्या, चितळी सामान, चितळी शिंगे व करंडे, फण्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व बातहारक आणि केशवर्धक तेलें, सुर्टे व बेलींचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगावच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिवताप यांचें अरिष्ट सदोदित लागले आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १॥८.

बाटलीवाला यांचें दंतमंजन.

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ०४

बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ०४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ५

### डायरी बक्षीस ! !

(१)खंडे तात्विक बोल, भाग १ ला, किंमत ०६. (२)खंडे तात्विक बोल, भाग २ रा, किंमत ०६ (३) धर्मपद, किंमत ०४. (४) पांगारकरकृत एकनाथचरित्र, किंमत ०५ (५) विदग्धवाङ्मय, किंमत ०३. (६) आकोलें ( वऱ्हाड ) येथील साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष रा. हरिभाऊ आपटे यांचें भाषण, किंमत ०२. ७ मुशीला थोडा उपदेश, किंमत ०८. (८) वाल्मीकींचा जय, किंमत ०८. (९) अण्णा किर्लोसकरकृत संगीत सौभद्र व संगीत शाकुंतल, किंमत प्रत्येकीं ०१२. (१०) शिवलीलामृत किंमत ०८. या यादीपैकीं आठ आणे किंमतीचें पुस्तक मागविणारास पुढील ह्मणजे सन १९१५ ची, कापडी बायंडिंगची, भरपूर माहितीची, लहान [ पॉकेट ] डायरी बक्षीस मिळेल; व एक रुपया किंमतीचीं, पुस्तकें मागविणारास कापडी बायंडिंगची, भरपूर माहितीची मोठी डायरी बक्षीस मिळेल. टपालखर्च निराळा पडेल.

भट आणि मंडळी, पुणें शहर.
नो. नं ६

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेग्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची पैकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ०८ व्हीपीनें ०१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही. पी. रु० १०६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—वैद्रे आणि कंपनी पुणेंसिटी
नो. नं. ७

### केशराचें फूल मुफ्त

पवित्र केशर ॥।=शुद्ध शिलाजीत ॥ असली कस्तुरी २४ ममीरातिनशी ३ खालिस हींग ८= तो० सुंदर कामदार शाल ३ व
३$\frac{१}{२}$+१$\frac{१}{२}$ गज ६ से १०
काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२
नो० नं० ८

### अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमींट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, याच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपैण, व्रण, चिखली, मुरूी, ओली खाज, जखम, नखाविषयी, तमाम रोगावर चालणारा १ च 'दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसात बरील मलमानें गुण येता पौष्टीक चहा किं ४ आणे, बातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं. १ रु० व डोळ्यांतील बगळ सोडण्याचे औ. किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाळ ह्यात भट्टीचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता — व्ही० आर० मुळे,
नादुरा. व्ही० आय० पी०
नो० नं० ९

### नोटीस

प्रायाणी मर्द नगु धनी राहणार खैरगाव तालुका आकोला इस या जाहिरखेबानें कळवितो कीं ही नोटीस पोचल्या तारखे पासून आठ दिवसांच्या आंत तूं दागदागीन्यासह माझ्या घरीं परत यावें. यांत चूक नये. तुमचा सावत्र बाप किसन पाचपोवार यानें सर्व बनावटी व दगलबाजीचा प्रकार करून तुझा गार्डंत बसल्या नंतर पुनः लपवून ठेविलें आहे तुझ्यावर फिर्याद करून कोर्ट मार्फत सर्व दाद मिळविण्याचा प्रसंग येऊं नये ह्मणून ही नोटीस आगाऊ दिली आहे. या उपर किसनच्या कावेबाजपणा प्रमाणें तूं वागशील तर तुझ्यावर फैजदारी करणें भाग पडेल कळावें. ता. ३१।१२।१९१४
सही.

नगु वा। भगवान धनी राहणार घोडस रामागड तालुके दर्यापूर याचे हातची निशाणी रेघ
दस्तूर मारोती रामचंद्र रेलकर मु. आकोला.
नो. नं. १०

## प्रदर्शन.

पिंपळगांवदेवी तालुका मलकापूर जिल्हा बुलडाणा येथें होणारे जनावराचे व शेतीच्या पदार्थांचें प्रदर्शन आणि वन्हाडी व परदेशी नागराची शर्यत

—:*:*:—

हें प्रदर्शन तारीख ४।५।६ जानेवारी सन १९१४ पर्यंतें खुले ठेविलें जाईल. त्यांत खालीं दिलेप्रमाणें बाक्षिसें दिलीं जातील परंतु वर्गणी जशी जमेल त्या मानानें तीं ज्यास्त केली जातील. बुलडाणा जिल्ह्यातील सर्व प्रकारच्या शेतकरी लोकांनीं आपापलीं उत्तम जनावरें आणावीत.

### बक्षिसाचा तपशील

#### जनावरांबद्दल

भाग १ बुलडाणा जिल्ह्यांतील किरसान लोक जे वर्षाचा शंभर रुपयापर्यंत शेतसारा देतात त्यांचे साठीं.

| वर्णन | बक्षिसें पाहिलें रुपये | दुसरें रुपये | तिसरें रुपये |
| --- | --- | --- | --- |
| १ अवलाद घेण्यायोग्य उत्तम गोन्हे | १५ | १२ | ८ |
| २ उत्तम बैलाची जोडी | १० | ६ | ५ |
| ३ पीतनसलेली २॥ वर्षाचे आतील उत्तम कालवड | १० | ८ | ५ |
| ४ पीत नसलेला ३ वर्षाचे आंतील उत्तम गोन्हा | १० | ८ | ५ |
| ५ सर्वांत ज्यास्त दूध देणारी गाय | २० | १५ | ४ |
| ६ दुधाची बकरी | ५ | ३ | १ |
| | ७० | ५२ | २८ |

भाग २ बुल्डाणा जिल्ह्यांतील किरसान लोक जे वर्षाचा शंभर रुपयापेक्षां जास्त शेतसारा देतात त्यांचे साठीं.

| वर्ण | बाक्षिसें रुपये |
| --- | --- |
| १ अवलाद घेण्यायोग्य उत्तम गोन्हे | १५ |
| २ उत्तम बैलाची जोडी | १० |
| ३ पीत नसलेली २॥ वर्षाचे आतील उत्तम कालवड | ८ |
| ४ पीत नसलेला ३ वर्षाचे आंतील उत्तम गोन्हा | ८ |
| ५ सर्वांत जास्त दूध देणारी गाय | १५ |
| ६ दुधाची बकरा | ४ |
| | ६० |

धान्याचे नमुन्याबद्दल दोन्ही प्रकारचे किरसानी लोकासाठीं.

| वर्णन | बक्षिसें पाहिलें रुपये | दुसरें रुपये |
| --- | --- | --- |
| उत्तम रोझीया कापुस............ | ५ | ३ |
| " जोंधळा (ज्वारी) ........ | ५ | ३ |
| " गहू ........................ | ४ | २ |
| " हरबरा (चणा) ........ | ४ | २ |
| " तिळ [पांढरा] ........ | २ | १ |
| " जवस [आळशा] ........ | २ | १ |
| " तंबाखु .... .... .... .... | २ | १ |
| " मिरची .... .... .... .... | २ | १ |
| | २६ | १४ |

प्रत्येक नमुना तीन शेरापेक्षां कमी नसावा. नांगराच शर्यतीसाठीं बाक्षिसांची रकम ५० रुपये ठेविली आहे. एकूण बक्षिसांची रकम ३०० रुपये आहे. बुलडाणा तारीख १० माहे नोव्हेंबर सन १९१४ इ.

Sd/ K. S. Jathar.

डेपुटी कमिशनर जि. बुलढाणा


## जाहीरात

**पाहिजे**— न्यु इंडिया इन्शुरन्स ब्यांकिंग कंपनीचें काम करण्यासाठीं वन्हाड आणि खानदेशभर हुषार एजंट पाहिजेत. पगार किंवा कमीशन भरपूर दिलें जाईल विशेष माहिती करितां खालील पत्यावर अर्ज करावे.

विश्वनाथ विष्णू फडके चीफ एजंट न्यु० इं० इं० कंपनी मुर्तिजापूर वऱ्हाड

नो नं ११

WANTED smart and energetic men to w rk as agents in every town on very lucrative terms. Apply to:-

The National Indian Life Insurance Co. Ltd., 166, Hornby Road - Bombay

No. No. 12

## ब्रह्म विद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ५ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें **मासिक.** वा० व० ट० खर्चासह तीन **रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद,** व **विद्यारण्य** यांचे उपनिषदावरील **भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश** हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं वृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास **'वैशेषिक दर्शन' बक्षीस**-

सनातन वैदिक **धर्माचें, तत्त्वज्ञानाचें** व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें--

## आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयां शिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ याचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधी प्रश्नांची समर्पक उत्तरें दिलीं जातात. नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.

२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० नं० १३


## नोटीस

नोटीस बेशमी भिवाआपा वल्द भवानीआपा राहणार लोणाद ता० मेहकर.

यांसः—

खालीं सही करणार पुंजाबाई मर्द भिवाआपा राहणार अनव हल्लीं मुकाम मलकापूर इजकडून कळविण्यांत येते कीं तुम्ही माझे लग्नाचे पती आहात तुमचे **पासून** मला दोन आपत्य झालीं त्या पैकीं एक **मुलगी** आहे ती झाल्यापासून **सवतीचे** तापामुळें व दुसरे अनेक तापामुळे मला माझे महेरी माझा भाउ नामे रावजीआपा याजकडेस जावे लागले त्यास आज सुमारे ६ वर्षे झाली आहेत तेव्हां पासून मी व माझी मुलगी मिळून माझे भावाचे म्हणजे रावजीआपा वा॥ हरीआपा अनवेकर ह्याचे घरी त्याचे आश्रयाने दिवस काढले. त्याचे कर्ज मी खाण्यापिण्याकारितां व कपड्यालत्या करितां काढलेले आहे ते रुपये ६०० साहासे मला देणें आहेत ते त्या रकमेची मागणी करिता तेव्हा तुह्मास कळवले कीं तुह्मी ही नोटीस पोचल्या दिवसापासून १५ दिवसाचे आंता वरील रकम माझे भावास देऊन टाकून मला आपले घरीं नांदण्यास घेऊन जावें. तसे आपण न केल्यास मला दुसरा घरठाव करण्याची तुमची परवानगी आहे असे समजुन मी दुसरा घरठाव करीन मग तुमचे मजवर लग्नाचे हक्क राहणार नाहीं ते तुह्मास कळावें शिवाय माझे भावानें तुह्मावर दावा आणल्यास त्याची रकम तुह्मास शिवाय द्यावीलागेल हे तुह्मास कळावे ता० १८-१२-१४ ई

सही.

सहीची नि॥ बांगडी पुंजाबाई मर्द भिवाआपा राहणार हल्लीं मलकापूर

दस्तुर रावजीआपा

नो० नं० १४

## नोटीस

नोटीस मीनाजी वा॥ गोविंदा गीराम माळी राहणार कसबे सिंदखेडराजा ता० मेहेकर जिल्हा बुलडाणा

यांस

खालीं सही करणार **ईजकडून** नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून आज ८।१० वर्षांपासून माझें बापाचे घरी आहे. तुह्मास महारोग (रक्तपीती) झाला आहे. करितां मी तुह्मांनवळ एकत्र राहण्यास खुष नाही. तरी माझे बापाचा ८।१० वर्षांचा अन्नवस्त्राचा खर्च ३० रुपये सालाप्रमाणें देऊन पुढें माझी खाण्यापिण्या-ची सोय अलग करावी. नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत वरील सूचने प्रमाणें सोय न झाल्यास मी दुसरा घर ठाव करीन. मग पुढें मजवर नवरेपणाचा तुमचा कांहीच हक्क राहणार नाहीं. करितां या नोटिसीनें कळविलें आहे. कळावें. ता० १९।१२।१९१४ ईसवी द० मार्तंड कृष्णराव साबदे रा० सिंदखेड

साक्ष

१ तानु गोविंदा भाट रा. सिंदखेड द खु.

१ कोंडू राघो तेली दस्तुर खुद

सही

रखमी मर्द मीनाजी माळी राहणार सिंदखेड ता० मेहकर निशानी खुद बांगडी द० लिहीणार

नो० नं० १५

## जाहीर नोटीस.

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार याजकडून जाहीर करण्यांत येतें कीं माझा कुलमुखत्यार त्र्यंबक जैराम चापड गांवकर हल्लीं राहणार उंबरी ता० आकोला यांस मी संवत १९७१ चे मिती कार्तीक शु॥ १ पासून कामावरून दूर केलें आहे. व त्याचे मुखत्यारपत्र रद्द केले आहे तरी त्यांचेसी माझे करीतां कोणी कांहींही व्यवहार करूं नये व केल्यास तो मला कबूल नाहीं. व त्याबद्दल मी जबाबदार नाहीं. ही जाहीर नोटीस दिली ता०२३।१२।१४ इसवी द० मारुती पांडुरंग मु० आकोला.

सही

लक्ष्मण सखाराम द० खु०

नो० नं० १६

## जाहिर नोटीस

सर्वत्र लोक यांसः—

मी खालीं सही करणार विनंती करते कीं मजला १गणपत, २नारायण, व ३भगवान, वा॥ रावजी तेली अशी मुले असून नंबर २—३ ही मुले अज्ञान आहेत व गणपत हा सज्ञान असून तो वाईट वर्तनांत आहे व त्यानें वाईट वर्तनामुळेंच कर्ज ही केले आसावे माझे नवऱ्याचे हातचे सर्व कर्ज मी फेडिले आहे. नवऱ्याचे हातचे कर्ज मुळींच नाहीं. आणि हल्लीं कर्ज केले असल्यास माझे किंवा अज्ञानाचें उदरपोषणास केलेले नाहीं. तरी माझे बापाकडून आलेली शेती व माझे नवऱ्याचे हातची जानेफळची शेती याजवर कोणी गणपत यास कर्ज देऊं नये फक्त गणपतचा स० नं १६३ जानेफळ यांतील $\frac{१}{२}$ हिश्यापैकीं $\frac{१}{३}$ हिस्सा आहे तोच कोणी गहाण खरेदी घेतल्यांस हरकत नाहीं. बाकीचे हिस्से व दहीगांवची माझे बापाकडून आलेली इस्टेट अज्ञान सज्ञान होईपर्यंत गहाण खरेदी घेऊं नये. घेतल्यास अगर गणपत यास सदरहू इस्टेटीवर कर्ज दिल्यास अज्ञान व त्यांची इस्टेट व मी जबाबदार नाहीं. वरुन विनंती आहे. ही नोटीस लिहून दिली सही ता० १५।१२।१४ इ०

सही.

आसराई मर्द रावजी तेली नि० आंगठा रा० जानेफळ ता० मेहेकर.

नो० नं० १७

## नोटीस

नोटीस बेशमी त्र्यंबक जैराम चापडगांवकर राहणार उमरी ता० व जि० आकोला

यांसः—

लक्ष्मण सखाराम साहू दुकान शाखिडे यांजकडून नोटीस देण्यात येते कीं मी माझे कोर्टांचे काम पाहण्याकरितां तुह्मास कुलमुखत्यार नेमले व त्याप्रमाणें तुम्ही १०।११ वर्षे काम केलें परंतु संवत १९७१ चे कार्तीक शु॥ १ पासून तुमचा माझा बेबनांव झाल्यामुळें मी तुह्मास कामावरून दुर केले. व तुमचे कुलमुखत्यारपत्र रद्द केलें आहे. तुह्मा मुखत्यार असतांना कोर्टांत दाखल करण्याकरितां जे दस्ताऐवज नेले असतील व त्यावरून जे जे दावे दाखल केले असतील त्या दाव्याच्या चालू अगर नीकाल झालेल्या मिसला व त्यासंबंधी इतर कागदपत्र, पावत्या, दरखास्तीच्या चालु व नीकाल झालेल्या मीसला व दावे दाखल करणे राहीलेले दस्ताऐवज व कोर्टांत दवा दाखल केला व त्याच दस्ताऐवजावरून आणखी कांहीं रकम असामीकडून घेणे राहीली असे जे दस्ताऐवज दाव्यांत दाखल

असतील त्यासंबंधी माहीती व दुसरे येखादे दाव्यांत आमचे दुकानचे कागदपत्र दस्ताऐवज अगर पावत्या पुराव्यात, दाखल केले असतील त्यासंबंधी माहीती. तुमचे हातून कोर्टाचे अगर दुसरे आमचे कामाकरिता खर्च झालेले रकमेचा हिशेब. व त्यात तुमचे नावे नीघत असलेले आमचे दुकानचे रुपये ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आत शीकोडे मुकामी आमचे येथें येऊन आमचे स्वाधीन करून देणें समजाऊन देणें व चुकते करून देणें. तसे न केल्यास त्यामुळे एखादा दावा, एखादी दरखास्त, एखादा दस्ताऐवज अगर कोर्टात जमा असलेली रकम मुद्दतीबाहेर गेल्यास अगर बडल्यास त्याबद्दल तुह्मास जबाबदार धरण्यात येईल. व पुढें एखादा दावा दाखल करतांना अगर दरखास्त देताना तुह्मी तसें न केल्यामुळें आह्मी केलेला प्रतिज्ञालेख खोटा ठरल्यास त्या अपराधाबद्दल जबाबदारी तुमचेवर आहे माझे कामाकरीता तुह्मी कोणाचे काहीं देणे केलें असल्यास तें कोणाचें कीती व कोणचेंही कामाकरिता असो तें माझें समतीनें झालें नसेल तें मला मान्य नाहीं. तसेंच तुह्मी दुसरें कोणतेंही काम माझे समती शिवाय केलें असेल तें मला कबुल नाहीं. ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसात ही सर्व माहती कागदपत्र हिशेब व पैसे देण्यास तुह्मी कधी केव्हा आमचे येथें येणार ते मला स्वतःला लेखी अगर तोंडी आगाउ कळवावे ह्मणजे ते दिवशीं मला घरी राहण्यास बरे पडेल. असे न केल्यास तुमचेवर योग्य कायद्याप्रमाणें काम चालविणे भाग पडेल, ही नोटीस दिली ता० २३।१२ १९१४ इ० दस्तुर मारुती पांडुरंग मु० आकोला.

सही
लक्षमण सखाराम
द० खु०

नो. नं. १८

## नोटीस

चिंतामण माधोसा सोनार वस्ती दापुरे तालुका आकोट

यांसः—

खालीं सही करणार याजकडून असे कळविण्यांत येते कीं तुमची मुलगी चिनी ही माझी बायको असून पाच वर्षे झाली नयांत आली. तुह्मी घेऊन गेले. मंडळी सहित नेण्यास आलो मला कोंडण्याचा विचार केला मनबदे येथे पळून आले ती नांदण्यास खुष आहे तुह्मी नांदू देत नाहीं. काल रोजीं आकोट येथें तुह्मी बदमाष घेऊन मला धरून नेण्याचा विचार केला हेतु फारकतीचा होय. तर मला कितीही रुपये दिल्यास सोडचिठी देत नाहीं. मी गरीब आहे तरी फारकती देईल तर वडाळी येथें माझे गुरु यांचे मतानें देईन मी रोजगारी आहे पुढें अशी वेळ आणल्यास तुह्मावर फौजदारी खटला चालेल. तिला आणून घातल्यास नांदविण्यास मी तयार आहे आजपासून खावटी खर्च मजजवळून मिळणार नाहीं. नोटीशीचा खर्च तुह्मास द्यावा लागेल कळावें तारीख ३ डिसेंबर सन १९१४ इसवी. दस्तुर जानसा श्रावणसा सोनार रा० वडाळी.

सही
१ धारोसा आकासा सोनार रा०
वडाळी द० खु०

नो. नं. १९

## जाहिर नोटीस

नोटीस बेश्मी चिमाई मर्द गोविंदा टिकार रा० आंबेटाकळी ता० बाळापूर व सर्वत्र साहू सावकार लोक रा० आंबेटाकळी या सर्वांसः—

खालीं निशानी करणार नोटीस देते कीं तूं माझी साक्षात वडील सवत असून मला १ मुलगा नामें पंढरी हा आहे. आपले नवऱ्याची इस्टेट स्थावर अज्ञान मुलाचे नावें लागली असून मी मुलाची कायदेशीर पालनकर्ती नेमली आहे. तुला दरवर्षी अन्नवस्त्र बरोबर मिळत असून अलीकडे काहीं लबाड लोकांच्या नादीं लागून अज्ञान मुलाची इस्टेट कोणाजवळ गहाण खरेदी वगैरे देण्याचे विचारात आहेत. तरी असे करण्याचा अधिकार तुला नाहीं. केल्यास तें करणें रद्द समजले जाऊन त्याची जबाबदारी घेणार व देणारी या दोघावरच रहाणार आहे. मुलाची स्थावर इस्टेट ह्मणजे मौजे आंबेटाकळी येथील शेत स. नं. ५० दहा १० एकर तेवीस २३ गुंठे आकार रु० १२ व १ घर जे ज्यात साम्रत तूं रहात ही आहेस. या शिवाय तुझे अंगावरील दागीने गुंडवाळयाचा जोड नथ व करदोडा त्या नापत्ता केला आहे. तरी असे न करण्याबद्दल तुला ताकीद देण्यात येत आहे. अज्ञानाचें नावाची त्या वरील इस्टेट त्या अफरातफर केल्यास तुजवर कायदेशीर इलाज केला जाईल तसेंच सर्वत्रास ही कळविण्यात येतें कीं वरील बाई जवळून कोणी ही इस्टेट गहाण खरेदी, बक्षीस, अगर पट्ट्यानें घेऊं नये. घेतल्यास घेणाराचे नुकसान होऊन त्याबद्दलची जबाबदारी या इस्टेटीवर रहाणार नाहीं कळावें तारीख २९।१२।१४ इ.

सहीची नि. आंगठा
पंढरी वा। गोविंदा टिकार अ.
पा. क. आई तुळसाई मर्द
गोविंदा रा. आंबेटाकळी
हिचा खुद्द असे

नो. नं. २०

## जाहीर नोटीस.

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार यांजकडून कळविण्यांत येते कीं, विद्यमान स्मॉलकाज कोर्ट आकोला दि. मु. नं. १४३६ सन १९ नि. ता. १३।११।१४ यात वादी हाजी लतीब वा हाजी उसमान कच्छी रा० बाळापूर यानीं राघोसा सदाशिवसा मयत याचे इस्टेटीवर व त्याची मुलें नामें १ गणपत राघोसा २ तुकाराम राघोसा ३ गोपाळ राघोसा अ. पा. क. आई द्रुपदी मर्द राघोसा व ४ जामीनदार उकर्डासा सखारामसा यांचे जातीवर फैसल मिळविला आहे. आह्मास बुडविण्याची खटपट प्रतीवादी ६ प्रतिवादी पासून कोणी जंगम गहाण, खरेदी, ज्याचे योगानें वादीचे पैसे वसूल करण्यास हरकत येईल अशा तऱ्हेनें घेऊं नये घेतल्यास तें सपशेल रद्द असे. प्रतीवादीवर फार कर्ज आहे. खरेदी जो कोणी घेईल तो सदहू हुकूमनाम्याचे रकमेबद्दल जबाबदार धरला जाईल.

सही
हाजी लतीब हाजी उसमान

नो० नं० २१

# वऱ्हाडसमाचार

मिति पौष वद्य ४ शके १८३६

## गतवर्ष.

सतत फिरत असलेल्या कालचक्राचा आणखी एक फेरा गेल्या आठवड्यांत पुरा झाला. या कालचक्राच्या फेऱ्यात हिंदुस्थानची कशी काय स्थिति झाली हें निरनिराळ्या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे प्रगतीच्या मार्गात त्याचें पाऊल पुढें पडलें कीं मागें आलें हें कळणार आहे. राजकीय, सामाजिक, धार्मिक, औद्योगिक, वाङमयविषयक इ० सर्व अंगानीं या हतभाग्य देशाची वृद्धि होत गेली आहे काय? याप्रश्नाचें उत्तर नकारात्मक देणें आह्मा पत्रकर्त्यांच्या नशींबीं सालोसाल येत असतें, पण गेलें १९१४ चें साल तर विशेषच खडतर ह्मटलें पाहिजे. या संवत्सराचें नाव ‘आनंद’ होतें खरें; पण स्थिति पहावी तर त्याच्या अगदीं उलट! दक्षिण आफ्रिकेतल्या हिंदी रहिवाशाना किंवा कानडाहून कोमागाटामारू बोटींतून परत यावें लागलेल्या हिंदीलोकाना परदेशात व या दुसऱ्या दुर्दैवी प्राण्याना स्वदेशीं ही भोगावे लागलेले हाल लक्षांत घेतले ह्मणजे ‘आनंदाच्या’ अगदीं उलट भावना मनांत प्रादुर्भूत होतात. नाहीं ह्मणावयाला लॉर्ड हार्डिंज साहेबांच्या दयाळु व मुत्सद्दी आणि न्यायी वर्तनामुळें हीं दोन्ही प्रकरणें अखेर आनंदपर्यवसायी झालीं येवढेंच समाधान मानलें पाहिजे. इंडिया कौन्सिल सुधारणा बिल, देशी लायक गृहस्थांना वरिष्ठ प्रतीच्या जागीं नेमणें, प्रस्तुतची महागाई, वगैरे कोणत्याही बाबतींत समाधान मानण्यासारखें काहीं झालें नाहीं. पिछेहाटीचें मागपासून आलेलें लोण तसेंच पुढें चाललें आहे. कांग्रेस डेप्युटेशनचें स्वागत विलायतेंत चांगलें झालें. पण पदरात काय पडलें? तर निराशेचें श्रीफळ! पब्लिक सर्व्हिस कमिशनचा रिपोर्ट प्रसिद्ध व्हावयाचा आहे, आणि अतिशय आशावादी ना० गोखलेसुद्धां यारिपोर्टासंबंधानें फारसें उत्तेजनप्रद काहीं बोलत नाहींत यावरून भविष्यकाळाच्या पोटांतल्या रत्नांचें तेज कसें काय आहे तें दिसतेंच आहे! राजकीय बाबतींत आणखी सांगण्यासारखी गोष्ट ह्मणजे प्रस्तुतचें युद्ध. यानें तर तूर्त बाकीच्या सगळ्या चळवळी अनंत प्रस्तुत व भावी पिढीला कष्टप्रद परिणाम त्यापासून होण्याचा संभव दिसत आहे. तथापि या युद्धानें साम्राज्याविषयींचें आमचें प्रेमबंधन दृढ झालें, आमची राजनिष्ठा अग्नि आणि तीव्र पोलाद यांच्या कसोटीला उतरली, हिंदी लोकांचे अंगचें क्षात्रतेज सर्वांशीं नष्ट झालें नाहीं असें जगाच्या प्रत्ययाला येऊन आमचें तोंड उजळ झालें, व भावी उन्नतीच्या जवळून गेलेल्या आशारोपाला अंकुर फुटले. आमची गेल्यासालची राजकीय कमाई ती येवढीच! सामाजिक बाबतींत स्नेहलतेच्या आत्मयज्ञानें आमचा समाज किंचित्काल निद्रेंतून जागृत होईलसें वाटलें होतें. पण त्याची महानिद्रा अद्याप कायम आहे! सुधारक पत्राचें पुनरुज्जीवन झालें आहे, पण आगरकरांच्या लेखांची व विचारसरणीची छाया सुद्धां त्यात दिसत नाहीं! उलट ‘सौभाग्यवती, ह्मणवून घेऊन वेश्येचा धागडधिंगा घालणाऱ्या अखंड सुवासिनी त्यात बोकाळणार कीं काय अशी भीती वाटत आहे! पुण्यास सामाजिक परिषदेचें अधिवेशन झालें, पण अखेर कृतीच्या रूपानें काय निष्पन्न झालें तें कष्टया सुधारकालाही दाखवितां येणें कठीण आहे. धार्मिक बाबतीत पूर्वीचा गोंधळच सुरू आहे. तो नष्ट करून धर्माचें मुख उज्ज्वल करणारा महात्मा केव्हा अवतीर्ण होईल तो होवो! तोंपर्यंत धर्मजागृति ‘धर्मनाद’ या मंगलसूचक शब्दानींच आपण समाधान मानून घेतलें पाहिजे. औद्योगिक प्रश्नाला ब्याका बुडण्यानें जो जबरदस्त धक्का बसला होता, त्यातून आमचे कारखाने अद्याप सावरले नाहींत. या लढाईचा फायदा घेऊन देशी उद्योगधंद्याना ऊर्जित करण्याचा सरकारचा विचार आहे. पण त्या विचाराचें शब्दांतून कृतींत रूपांतर होईल तो सुदिन खरा! वाङमयाचे बाबतींत सध्या अंतःशुद्धीपेक्षां बाह्य अंगाकडेच लोकाचें अधिक लक्ष आहे.‘ माला’ व पुस्तकें भराभर जन्मास येत आहेत. प्रेमाचा ऊत अद्याप जिरला नाहीं. मनोरंजनाची किळस अद्याप वाटूं लागली नाहीं. ‘ज्ञानप्रकाश’ मत्सरग्रस्त आहे तो आहेच. विविध ज्ञानाचा विस्तार मुंगीच्या गतीनें सुद्धां होत आहे कीं नाहीं याची शंकाच आहे. नाटकांवरची झोड कमी नाहीं, आणि नाटकें तरी कसलीं? तर आमच्या पूज्य ऋषींचीं नांवें घेऊन त्याना लोकांच्या तिरस्कारास पात्र करून सोडणारीं, अचरट विनोदानें पूर्ण, नाट्यशास्त्राच्या नियमांस धाब्यावर बसवून लेखकांच्या व प्रेक्षकांच्या वैर व निर्लज्जवृत्तींचें प्रदर्शन करणारीं—अशा नाटकांची भरमसाट आहे. विद्वान् उद्योगप्रिय, आणि शोधक लेखकाच्या कपाळचें दारिद्र्य, मानहानि व निराशा हें त्रिकूट उठलेलें नाहीं. व साहित्य परिषद ही बिघडलेली घडी नीट बसविण्यास पूर्णपणें असमर्थ आहे. गेल्यासालची आमच्या देशाची ही स्थिति आहे. मग तिला तुह्मी प्रागतिक ह्मणा कीं पश्चाद्गतिक ह्मणा.

तारीख ४ माहे जानेवारी सन १९१५

प्रस्तुतचें युरोपियन युद्ध सु... बरोबर पांच महिने झाले. हें युद्ध इतक्या गंभीर स्वरूपाचें होईल अशी खुद्द त्यांत पडलेल्या राष्ट्रांनापुद्धां अटकळ असेल कीं नाहीं याची शंकाच आहे. बेल्जयम व सर्व्हिया या राष्ट्रांचा यांत बहुतेक सत्यानाश होऊन चुकला आहे. आस्ट्रियाचा कमकुवतपणा अव्वल पासून दिसून आला. रशियाच्या वाफेच्या रुळाच्या अंगची शक्ति जर्मनीच्या प्रत्ययाला आली. जर्मन लोकांच्या सुधारणेची टिमकी वाजत होती, तिचें खरें स्वरूप प्रगट झालें आणि अशी निर्दय, अमानुष, राक्षसी सुधारणेपेक्षां जंगली म्हणवून घेतलेलें बरें असेंहा मागसलेलीं राष्ट्रें हणू लागलीं. ग्रेट ब्रिटनलाहि आपल्या लष्करी खात्याच्या बळाचा अनमास आला, आरमारी खात्याचें वर्चस्व कसोटीला लागलें, ब्रिटिश मुत्सद्यांना खुल्या व्यापाराचें तत्त्व सोडून द्यावें लागलें, हिंदुस्थानच्या राजनिष्ठ प्रजेचें मुख उज्ज्वल झालें. हिंदी शिपायांच्या अंगचें पाणी झळकलें. असे अनेक चमत्कार दाखविणाऱ्या या युद्धाचा आतां जर्मनीला कंटाळा आला असला तरी वरकरणी तरी तें राष्ट्र विषाचा पेला तळापर्यंत पिण्याची आपली राजनी महत्त्वाकांक्षा दाखवीत आहे. तुर्कस्थानचे डोळे अद्यापही चांगले उघडले नाहींत. तथापि इटली व ग्रीस या दोन देशांशीं युद्ध करण्याचा प्रसंग केव्हां येईल याचा नेम सांगवत नाहीं. इटलीचा तुर्कस्थाननें जो अपराध केला आहे त्याविषयीं मागें सांगितलेंच आहे. ग्रीसचें एक दोन आफिसर शहर समजून तुर्कस्थाननें धरून त्यापैकीं एकाला देहांत शिक्षाही सांगीतली आहे, पण ती अंमलांत आणिल्यास ग्रीस हातांत शस्त्र घेतल्यावांचून राहणार नाहीं अशी ताकावणी ग्रीसनें दिलेली आहे. इकडे जर्मन लोक चवताळून भलभलती वेडाचाळीं कृत्यें करीत आहेत व त्यामुळें अमेरिकेसारख्या देशाची आपले विषयींची सहानुभूती आपल्या हातानें घालवून बसले आहेत. जर्मनलोकांची सारखी पिछेहाट होत आहे. येसर येथील एका लढाईतच त्यांपैकें ३०००० लोक प्राणास मुकले ही गोष्ट तेच लोक स्वतः कबूल करीत आहेत. जमिनीवरच्या लढाईत अद्याप आपण हार नाहीं होऊं अशी आशा जर्मन लोकाना वाटत आहे. पण ब्रिटिश आरमारापुढें आपलें काहीं चालणार नाहीं हें त्याना पुरें ठाऊक आहे. शिवाय हवेतून विमानांच्या द्वारें आपल्यावर परचक्र येतें की काय अशीही भीती जर्मनांना वाटत आहे. इकडे पूर्व भागांत वार्सा शहर सर करण्याचा आपला कृत्यनिश्चय जर्मनीनें जाहिर केला आहे. तरी रशिया त्यांना तिकडे पुढें सरकूं देत नाहीं हें पाहून जर्मन लोक चरफडत आहेत. रशियानें तुर्कस्थानच्या काहीं बोटी बुडविल्याची ही बातमी आहे. आस्ट्रियांत तर युद्धाचे विरुद्ध लोकांची मनें क्षुब्ध होऊन ते आपली क्षुब्धता स्पष्टपणें जाहिर करूं लागले आहेत. बेल्जयम आणि फ्रान्स या देशांत प्रस्तुत थंडीचा ...मुळें युद्धांत ...शिपायांचे अवर्णनीय ... राहिनेत हें उघड आहे. त्यांतल्या त्यांत हिंदी शिपायांविषयीं विशेष काळजी घेण्यांत येत आहे ही मोठी समाधानाची गोष्ट आहे.

## युद्ध आणि आयरिश लोक.

टाइम्स ऑफ इंडिया पत्रानें ता० २१ च्या अंकाच्या अग्रलेखांत अशी अशुभ वार्ता प्रासिद्ध केली आहे कीं जरी सांप्रतच्या युद्धांत पुष्कळसे आयरिश लोक इंग्रजाच्या खांद्याशीं खांदा लावून एकजुटीनें जर्मनशत्रूंचा फडशा पाडण्याचे कामीं मनःपूर्वक साह्य करीत आहेत तरी त्यांच्यांतले कांहीं लोक जर्मनीच्या कांचनाला वश होऊन म्हणा अगर दुसऱ्या कोणत्या कारणानें म्हणा, जर्मनीविषयीं अनुकूलता दाखवूं लागले आहेत. ही गोष्ट खरी असेल तर सरकारनें वेळींच सावध होऊन या लोकांचा नीट बंदोबस्त करावा अशी त्या पत्राची सूचना आहे. ही अशुभ वार्ता पसरत गेली तर सैन्यांत नवी भरती करण्याचे कामीं त्यापासून विघ्न येण्याचा संभव असल्यामुळें सरकारनें या गोष्टीकडे दुर्लक्ष करतां कामा नये. आयरिश लोक वर्णानें, धर्मानें, व जातीनें इंग्रजांचे स्वकीय असतां त्यांच्यांत असा घरभेदूपणा करणारे निघावे, व हिंदुस्थानचे लोक सर्व प्रकारें इंग्रजांहून भिन्न असता, व हिंदीलोकांच्या न्यायाच्या मागण्याही इंग्लंडनें अद्याप दिल्या नाहींत अशी सर्वत्र ओरड असतां हिंदुस्थाननें या प्रसंगीं आपली अढळ व उत्कट राजनिष्ठा पूर्णपणें दाखवावी याबद्दल आम्हां हिंदी लोकाना योग्य अभिमान वाटणें अगदीं वाजवी आहे, आणि या दोघांतला हा विरोध लढाई संपून बक्षिसांची खैरात करतांना ब्रिटिश सरकार विसरणार नाहीं अशी आम्हांस पूर्ण खात्री आहे.

## इजिप्तचें कालचक्र

आमच्या सार्वभौम ब्रिटिश साम्राज्या खालीं इजिप्त सारखा सुपीक, सधन व नाकेबंदीचा देश आला ही गोष्ट पाहून ब्रिटिश भाग्याचें कौतुक करावें तितकें थोडेंच! कालचक्राची ही गती त्या देशाच्या उर्जित व उन्नत स्थितीला कारणीभूत होईल असा आम्हास स्वकीय अनुभवावरून भरंवसा वाटतो. ब्रिटिश वैभवाला शोभण्यासारखी ही गोष्ट अचानक काकतालीय न्यायानें घडून आली असें म्हणण्यापेक्षां कालसमुद्रांत यथेच्छ पोहणाऱ्या माशाच्या कंटस्थानीं माणीक स्वाभाविकपणें गेलें हा यदृच्छालाभ होय. अशा प्रसंगानें इजिप्तच्या इतिहासाकडे दृष्टि दिली तर प्रस्तुतची राज्यक्रांती मनोहर वाटेल.

इजिप्त देशाचा विस्तार चार लक्ष चौरस मैल असून तो आफ्रिकेच्या ईशान्य भागांत वसलेला आहे. या देशांतून सुप्रसिद्ध नैल नदी वाहत गेली असल्यामुळें तिच्या कांठचा प्रदेश फार सुपीक आहे. इजिप्तचा कापूस उत्तम प्रतीचा म्हणून प्रसिद्ध आहे. जगांत जे प्राचीन देश आहेत त्यांत या देशाची गणना होते. अर्थात् या देशानें आजपर्यंत अनेक राज्यक्रांत्या पाहिल्या आहेत. हा देश पर्शियन, आरब, व तुर्की अंमलाखालीं क्रमाक्रमानें राहून आतां तो इंग्रजी अंमला खालीं आला आहे. तुर्की अंमलाखालीं हा देश सुमारें दीडशें वर्षें होता. तथापि या अवकाशांत फ्रेंच रशियन आणि ब्रिटिश यांनीं आपला हात तेथील राज्यकारभारांत घुसडण्याचे प्रयत्न केले, व त्यांत त्यांना चांगलें यशही आल्यामुळें हा सबंध देश आपल्या हाताखालीं घालण्याची युरोपियनांची महत्त्वाकांक्षा कमी न होतां उलट वाढतच चालली होती. हा देश तुर्कस्थानच्या अमलाखालीं होता, तरी तेथें त्या देशाचा स्वतःचा असा एक राजा होता. याला तुर्की साम्राज्याचें जूं झुगारून देण्याचा प्रयत्न करण्याची बुद्धी मधून मधून होत असे. आणि या कामीं त्याला मदत करण्यास युरोपियन राष्ट्रें ही तयार होतीं. तथापि तुर्की अंमल झुगारून देण्या साठीं केलेलीं कारस्थानें सिद्धीस न जाता गेल्या आठवड्यापर्यंत तुर्की अंमल नांवाचा कां होईना, पण टिकाव धरून होता. पण त्याचा परवा एकाएकीं अंत होऊन तो देश ब्रिटिश प्रोटेक्टरेट होऊन बसला आहे. १८६६ मध्यें इजिप्तच्या मांडलिक राजाला तुर्कस्थानच्या सुलतानानें खेदिव्ह असा किताब देऊन त्याला आपला व्हाइसराय कबूल केलें होतें, व सुलतानच्या परवानगीवाचून आपण नवे कर बसविणार नाहीं व परराष्ट्रापासून कर्ज काढणार नाहीं असें कबूल केलें. पुढें १८७३ मध्यें हळं हळं परराष्ट्रांशीं युद्ध किंवा तह करणें, फौज वाढविणें, व स्वतःचें नाणें पाडणें या तीन गोष्टी खेरीज करून बाकीचे राजाचे हक्क खेदिवाला मिळाले. या वेळचा खेदिव्ह इस्मायल पादशहा ह्यानें आपल्या राज्यात मोठाल्या इमारती, सडका, रेलवे, शाळा वगैरे बांधिल्या. या कामासाठीं त्याला कर्ज काढावें लागलें. पण प्रजेच्या कल्याणासाठीं सद्धेतुपूर्वक काढलेलें कर्जच त्याच्या स्वातंत्र्यहानीस कारण झालें. हें कर्ज ब्रिटिश आणि फ्रेंच सरकारापासून काढल्यामुळें आपल्या कर्जाच्या हमीसाठीं इजिप्तच्या राज्यकारभारांत आमचा हात असणें अवश्य आहे या सबबीवर या राष्ट्रांना तेथें चंचुप्रवेश करतां आला. त्यांनीं जुनें प्रधान मंडळ काढून तेथें युरोपियन प्रधानमंडळाची स्थापना करविली. इजिप्त मधल्या काहीं दूरदृष्टीच्या कारभाऱ्यांना युरोपियन लोकांचें माजलेलें हें प्रस्थ घातुक वाटून त्याच्या विरुद्ध ते खटपटी करीत असत. १८८२ सालीं तर यावरून मोठें युद्ध होऊन बंडवाल्यांनीं खेदिव्हाला कैद करून नेलें होतें. पण इंग्रजांनीं या वेळीं मदत देऊन त्याची सुटका केली, आणि तेव्हांपासून तेथील कारभाराची जोखीम ब्रिटिशांनीं स्वतःकडे घेतली. या वेळीं खेदिव्हशीं नवे करारमदार होऊन १८८४ मध्यें गॉर्डन हे इजिप्तचे पाहिले गव्हर्नर जनरल नेमिले गेले. पण सूडनशीं झालेल्या लढाईत ते मारले गेले. त्यानंतर लॉर्ड किचनर लॉर्ड क्रोमर व पुनः लॉर्ड किचनर यांची नेमणूक होऊन या अधिकाऱ्यांनीं इजिप्तच्या राज्यपद्धतीला पुरतें ब्रिटिश बनवून टाकिलें. ज्याप्रमाणें हिंदुस्थानांत मधून मधून राष्ट्रीयत्वाचा अभिमान बाळगणारी मंडळी निर्माण होऊन ब्रिटिश राज्यकर्ते तिच्या फाजील व घातुक चळवळीचा उच्छेद करीत असतें तसाच प्रकार इजिप्तमध्यें ही होत आला आहे, व तो देश इंग्रजी अंमला खालीं प्रगतीचा मार्ग झपाट्यानें आक्रमीत आहे. नवजीवनाचा संचार झालेल्या कांहीं तरुण अविचारी लोकांना इंग्रजांचें इतकें माजलेलें प्रस्थ दुःसह होऊन त्यांनीं १९१२ सालीं खेदिव्ह, किचनर आणि मुख्य प्रधान यांना ठार करण्याविषयींचा कट ही केला होता. पण तो सिद्धीस न जातां किचनर साहेबांनीं त्यांचा उलट चांगला समाचार घेतल्यामुळें इंग्रजांचा वचक इजिप्त मध्यें चांगला बसला आहे. तथापि इंग्रजी गव्हर्नर व हायकमिशनर यांनीं सगळी सत्ता आपले हातांतून काढून घेऊन स्वतःच्या हातांत ठेविली व आपणांस केवळ नामधारी राजे अथवा कळसूत्री बाहुलें करून ठेविलें ही गोष्ट तेथील खेदिवास न आवडून तो दाद मागण्या साठीं तुर्कस्थानचे सुलतान याजकडे गेला व आज सात आठ महिने तो कांस्टांटिनोपल येथेंच जाऊन राहिला आहे. इतकेंच नाहीं तर तो तेथें इंग्रजाविरुद्ध मसलती करून सध्याच्या युद्धाचा संधी साधून इजिप्तमधून इंग्रजाना हाकून लावून आपलें स्वातंत्र्य परत मिळविण्याच्या खटपटींत आहे असें पाहून इंग्रजी मुत्सद्यानीं त्याला खेदिव्हपदापासून भ्रष्ट करून त्याच्या चुलत्यास सुलतान हा किताब देऊन इजिप्तच्या गादीवर बसविलें व १०१ तोफांची सलामी देऊन त्याच्या नांवाची द्वाही गेल्या आठवड्यांत फिरविली आहे. या राजक्रांतीनें खेदिव्ह व त्याचें राज्य पूर्णपणे इंग्रजाच्या हातीं आलें आहे व तुर्कस्थानची सत्ता एकदम नष्ट होऊन परचक्रापासून इजिप्तचें रक्षण करणें व देशांत सुधारणा करणें या दोन गोष्टींची जोखीम इंग्रजाच्या अंगावर येऊन पडली आहे. या व्यवस्थेनें इजिप्तची जरी स्वातंत्र्यहानि झाली आहे तरी ब्रिटिश साम्राज्याचा एक घटकांश म्हणून त्याची मान्यता वाढेल, आणि औद्योगिक, राजकीय, सामाजिक वगैरे सर्व अंगानीं त्या देशाची प्रगति होऊन तो देश सुधारणेच्या नव्या युगांत प्रवेश करून झपाट्यानें पुढें पाऊल टाकीत जाईल असा पुष्कळांना भरंवसा वाटत आहे.

## हिंदूंच्या प्राचीन वसाहती.

बंगालच्या एका विद्वान् गृहस्थानें हिंदूंच्या नौकानयनाच्या इतिहासानें हिंदूंच्या प्राचीन इतिहासावर बराच चांगला प्रकाश पाडून हिंदुस्थानचे लोक प्राचीन काळीं किती सुधारले होते त्याची खरी कल्पना पाश्चात्यांना करून दिली. त्यानंतर अलीकडे आणखी दोन महत्वाचे शोध आमच्या वाचण्यांत आले आहेत. त्यांवरून हिंदु हे नुसते नौकानयनांतच नव्हे तर दूरदूरच्या देशांतून ही वसाहती करण्यांत अग्रेसर होते असें दिसून येतें. आनंदाचे संपादक रा० वासुदेव गोविंद आपटे यांनीं ...

नांवाचा बौद्ध धर्माच्या इतिहासावर लिहिलेला एक ग्रंथ गेल्या महिन्यांतच पुण्याच्या मठ आणि मंडळीनें प्रसिद्ध केला आहे त्यांत असें सप्रमाण दाखविलें आहे कीं अमेरिका खंडाचा शोध कोलंबसाला लागण्यापूर्वी सुमारें एक हजार वर्षें अमेरिका खंडांत बौद्धधर्मप्रचारक गेले होते व तेथें ते गेले असल्या बद्दलचीं चिन्हें अमेरिकेच्या जुन्या रहिवाशांच्या भाषेंत, समाजांत, व चालीरीतींत अद्याप दृग्गोचर होत आहेत! रा० आपटे यांनीं दिलेल्या माहितीचें पुष्टीकरण कित्येक अमेरिकन शोधकानीं ही केलेलें आहे ही विशेष गोष्ट आहे.

## औद्योगिक परिषद.

हिंदुस्थनच्या औद्योगिक परिषदेचें दहावें अधिवेशन ता. २६ रोजीं मद्रास येथें कांग्रेसच्या मंडपांत झालें. या प्रसंगीं देशांतलीं सुशिक्षित व्यापारी, कारखानदार, सरकारी कामदार व जमीनदार वगैरे बरीच प्रतिष्ठित व कर्तृत्ववान मंडळी हजर होती. प्रथम स्वागत कामिटीचे अध्यक्ष साउथ इंडिया चेंबर ऑफ कॉमर्सचे चेअरमन रा. ब. चेटी यांचें भाषण झालें. यांनीं प्रस्तुतच्या युद्धाचा उल्लेख करून त्यामुळें व्यापार व उद्योग याच्या वर घडणाऱ्या परिणामाचा उल्लेख करून मद्रास इलाख्यात औद्योगिक शिक्षणाची मोठी वाण आहे असें सांगितलें व सरकारनें इंग्लंडात उद्योगधंद्याला प्रत्यक्ष मदत देण्यास जशी सुरुवात केली आहे, तशी इकडे ही करावी असें सुचविलें. मद्रासच्या कामिटीनें केलेल्या सूचनाची निरर्थकता दाखविली. आणि इंग्लंडनें औद्योगिक शिक्षणाचे बाबतींत जर्मनीला सुद्धां जर मदत केली, तर तें हिंदुस्थानला मदत करीलच करील अशी आशा प्रकट करून भाषण संपविलें. नंतर यंदाचे अध्यक्ष ना. मनमोहन रामजी यांची अध्यक्षाचे जागीं निवडणूक झाल्यावर त्यांचें मोठें भाषण झालें. त्यांनीं आरंभींच स्वदेशी चळवळीचा थोडक्यात इतिहास सांगतांना मागें ईस्ट इंडिया कंपनीनें हिंदी उद्योगधंदे बुडविण्यासाठीं काय काय प्रयत्न केले, नंतर हे उद्योग सावरण्यासाठीं स्वदेशी चळवळ निर्माण झाल्यावर तिच्यावर कसकसे प्रसंग आले तें सांगून तिला अपेश येण्यास धंद्याचें विशेष ज्ञान असणाराचा अभाव, नीतिमत्तेचा अभाव, सरकारच्या सदिच्छे बरोबर असलेली शोचनीय उदासीनता, व उद्योगिक शिक्षणाचा अभाव या गोष्टी कशा कारणीभूत झाल्या तें ही त्यांनीं सांगितलें. नंतर प्रस्तुत युद्धाचे आमच्या व्यापारावर व विशेषतः कापसाच्या व्यापारावर जे दुष्परिणाम घडले आहेत त्यांचें वर्णन करून त्यांनीं असें सुचविलें कीं सरकारानें खुद्द इंग्लंडमध्यें स्वदेशी उद्योग धंद्याला प्रत्यक्ष मदत देण्याचे जे उपाय योजिले आहेत, तसे उपाय हिंदुस्थान सरकारानें ही इकडे योजावे. तथापि कृत्रिम उपायानीं परदेशचा व्यापार आपल्या हातीं आणितां येईल असें जें किय्येकांना वाटत आहे तो निवळ भ्रम आहे हें ही त्यांनीं दाखविलें. लोकांचे स्वतःच्या कळकळीचे प्रयत्न व सरकारची मदत यांवर भिस्त ठेविली पाहिजे तरच हिंदुस्थानच्या लहान सहान धंद्याची प्रथम अभिवृद्धि करतां येईल, व या कामीं केवळ सरकारच्या तोंडाकडे पाहण्याची संवय सोडून औद्योगिक परिषदेनें प्रांतोप्रांतीं कमिट्या स्थापून उद्योग चालविला पाहिजे आणि हा उद्योग सतत वर्षभर चालला पाहिजे तरच कार्यांत कांहीं यश येईल. औद्योगिक परिषदेनें पुनः पूर्वींच्या सारखी प्रदर्शनें भरविलीं पाहिजेत. तथापि या सर्व खटपटींच्या शीर्षस्थानीं हिंदुस्थानला आपल्या उत्पन्नावर पूर्ण ताबा असण्याची अवश्यकता ही मुख्य गोष्ट आहे, असें सांगून अध्यक्षांनीं आपलें भाषण संपविल्यावर सेक्रेटरी रा ब. मुधोळकर यांनीं गेल्या सालचा रिपोर्ट वाचला, व नंतर यंदा परिषदेसाठीं आलेल्या ६२ निबंधांपैकीं निवडक निबंध वाचण्यात येऊन पहिल्या अधिवेशनाची समाप्ति करण्यांत आली. दुसरे दिवशीं राजानिष्ठा, लार्ड हार्डिंज विषयी सहानुभूति, परस्पर सहायकारी मंडळ्याचे हिशेब तपासण्यासाठीं सरकार जी फी घेत असते ती माफ करण्याविषयींची विनंति वगैरे कित्येक नवे ठराव व मागच्या परिषदांनीं केलेल्या ठरावाचें दृढीकरण करण्यात आलें. यादुसरे दिवशीं मद्रासचे गव्हरनर लार्ड पेटलांड साहेब व इतर अधिकारी ही आले होते.

## यंदाची राष्ट्रीयसभा

यंदाची राष्ट्रीयसभा मद्रास येथे ता २८ डिसेंबर व पुढें दोन दिवस बा० बाबू भुपेंद्रनाथ बोस यांच्या अध्यक्षत्वाखालीं भरली होती. प्रथम स्वागत कामिटीचे चेअरमन सर सुब्रह्मण्यम् अय्यर यांचें भाषण झालें. यंदाचे वर्षीं युद्धामुळे लोकाचीं मनें व्यग्र असल्यामुळें राष्ट्रीयसभा भरवू नये असें कित्येकांचें ह्मणणें होतें. पण तसें केलें असते तर जे ब्रिटिश राष्ट्र सत्य, न्याय, व शांतता यासाठीं आज लढत आहे त्याविषयींचें आमचें प्रेम व सहानुभूति व्यक्त करून त्यांस राजनिष्ठापूर्वक साह्य देण्याची आयती आलेली संधी आह्मी घालविली असती व सर व्हॅलेंटाईन सारख्या सुशिक्षित हिंदी लोकांच्या शत्रूंना त्यांच्यावर विषारी बाग्बाण सोडण्यास फावलें असतें यासाठीं सभा भरविणें अवश्य होतें असें सांगून व सध्यां लढाईंत हिंदी लोक दाखवीत असलेल्या शौर्याची चोहीकडे वाहवा होत आहे, पण जेव्हां लढाई संपून बक्षिसें वाटण्याची पाळी येईल तेव्हां हिंदुस्थानचें स्मरण होईल अशी आशा बाळगतों असें ह्मणून वक्त्यांनीं बादशहाची हिंदुस्थानाविषयींची सहानुभूति व प्रेम शाश्वत राहावे त्यांना आह्मी पात्र आहों असें दाखावें. त्याजोगें वर्तन आमचे हातून घडो असें चिंतून आपलें भाषण पुरें केलें.

नंतर

### अध्यक्षांचें भाषण

झालें. त्यांनीं आरंभीच प्रतुतच्या युद्धाचा उल्लेख करून प्रस्तुतच्या प्रसंगीं हिंदु व मुसलमान एक होऊन ब्रिटिश साम्राज्याविषयींचें आपलें कर्तव्य कसें बजावीत आहेत व सध्यांचे आपले व्हाइसराय साहेब किती दयाळू आहेत हें सांगून त्यांच्यावर एका मागून एक आलेल्या दुःखाच्या प्रसंगांत हिंदुस्थान त्या दुःखाचा वाटेकरी आहे त्सें समयोचित शद्बानीं सांगितल्यावर ते विलायततल्या अधिकाऱ्यांकडे वळले, आणि स्टेट सेक्रेटरी अंडर सेक्रेटरी याची त्यांनीं तारीफ केली. नंतर इंडिया कौंसिल बिल व कांग्रेसच्या डेप्युटेशनची कामगिरी यांकडे वळलें, आणि या बिलाला गैरसमजुतीमुळें हिंदुस्थानाकडून मिळावें तसें पाठबळ दुर्दैवानें मिळालें नाहीं व तें नापास झालें याबद्दल खेद प्रदर्शित केला. नंतर रायल कमिशन व पार्लमेंटरी कमिट्या या दोहोंत कमिट्या पुष्कळ प्रकारांनीं कशा अधिक उपयुक्त असतात तें दाखवून नंतर कांग्रेस, तिचें ध्येय, व साधनें याचें विस्तारानें विवेचन केलें. वर्णभेद न लक्षांत घेतां नेमणुका व्हाव्या, पूर्ण वाक् स्वातंत्र्य व मुद्रण स्वातंत्र्य असावें, हिंदी लोकांना नागरिकत्वाचे पूर्ण हक्क असावे व हिंदुस्थानाला ब्रिटिश ध्वजेखालीं स्वराज्याचा अधिकार मिळावा हे कांग्रेसचें ध्येय उच्च आहे. व तें व्यवहार्य नाहीं असें ह्मणणारे आपल्या हातची सत्ता हिंदी लोकांच्या हातीं न जावी असें इच्छिणारे मतलबी लोक असले पाहिजेत असेंही अध्यक्षांनीं सुचविलें. नंतर लॉर्ड हार्डिंज यांनीं दक्षिण आफ्रिकेंतल्या प्रश्नाच्या संबंधांत केलेलें उदार साह्य व त्यांच्या कारकिर्दीचें एकंदर उदारपणाचें धोरण यांची प्रशंसा करून ते ह्मणाले कीं लोकांना स्वाभिमानानें राहतां येण्यास आणखी पुष्कळ गोष्टी हव्या आहेत. हिंदुस्थान स्वसंरक्षणासाठीं किती दिवस इंग्रजमातेच्या तोंडाकडे पाहत बसणार? हिंदी लोकांना शस्त्रें बाळगण्याचा, लष्करांत हुद्याच्या जागा मिळविण्याचा, व्हालंटियर होण्याचा हक्क कां नसावा? हा हक्क यापूर्वीं असता, तर आज जर्मनीचे विरुद्ध सत्तर हजारच काय, पण लंगी हिंदी सैन्य गेलें नसतें काय! पण गत गोष्टींबद्दल शोककरून काय उपयोग? भावी काळाकरिता तरी लॉर्ड हार्डिंज यांनीं हा प्रश्न हातीं घ्यावा व तो त्यांनीं घेऊन त्यात यश मिळविल्यास त्याचें नांव हिंदुस्थानांत चिरस्मरणीय होऊन राहील. पण येवढ्यानें कार्यभाग होणार नाहीं. आमच्या देशांत शिक्षणप्रसार ही पुष्कळ व्हावयास पाहिजे आहे. आमचे उद्योग, व कारखाने सरकारी साह्याच्या अभावीं बुडाले आहेत त्याचें पुनरुज्जीवन व्हावयास पाहिजे आहे आपल्या देशासंबंधानें विलायतच्या लोकांच्या गैरसमजुती दूर करून त्याना हिंदुस्थानची खरी स्थिति कळविण्याचे कामीं डेप्युटेशनचा फार उपयोग होतो असें स्वानुभवावरून सांगून आणि ब्रिटिश कांग्रेस कमिटी या संबंधांत किती महत्वाची कामगिरी करीत आहे त्याचें वर्णन करून हिंदुस्थानचें भविष्य उज्ज्वल करणें हें आपल्या हातीं पुष्कळसें आहे तें करण्यास आपण एक जुटीनें व उत्साहानें पुढें सरसावलें पाहिजे असे प्रोत्साहनपर व कळकळीचे उद्गार काढून अध्यक्षांनीं आपलें भाषण टाळयांच्या गजरात संपविलें.

## महायुद्ध

खेळाडू क्रिकेटवाले जसा मुद्दाम खेळ लांबवितात तशीं सध्यांचीं हीं युद्धें वेळ लांबविण्या सारखीं चालूं आहेत. आपलीं लष्करें पश्चिम रणक्षेत्रांत शनैः शनैः केसराला जर्मनाच्या गुहेंत कोंडू पहात आहेत. पाऊल पुढें ह्मणतात पण युद्धकलावेत्तेच तें मर्म जाणोत! पश्चिम क्षेत्रांत राशियाचा विजय असून ग्लालेशियाची बाजू सरसावली आहे. लढाईचे पुष्कळसे कैदी परस्पर हारजीत सांगत आहेत. पण निकराचा प्रसंग अजून दूर आहे तोपर्यंत जर्मनी विमानें डंकीर्क व नान्सी येथें बांबच्या लीला करीत आहेत. विध्वंसाला बांब चागले पण ही लढाई नाहीं. आरगॉनीच्या आजूबाजूच्या फ्रेंच विमानांनीं पुष्कळशी धुमाकूळ करून सोडली आहे. पांच जर्मन विमानें ४० बांब सोचाकझेन येथें टाकतात, हानि मोठी होते व रेलवेवर ही अपघात चालूं आहेत.

## वऱ्हाडवृत्त.

**हवामान**— एकाएकी थंडीचें मान कमी झालें आहे. पुनः थंडी पडूं लागेल. नागपुर वगैरे कडे प्लेग असूनही येथील आरोग्य समाधान कारक आहे.

**रावबहादूर** — उमरावतींतील ऑनररी माजिस्ट्रेट व सावकार रा. रा. रामचंद्र रिणको डोळे यास थोरली रावबहादुरी मिळाली. हा लाभ उशीरानें घडला तरी पण याच्या अंतर्गत एका प्रथम पदवीचा अध्याहार असल्यामुळें हा विशेष पुनः एकाकी व अभिनंदनीय होय.

मेजर जी० फौलर सिव्हील सर्जन हे परवा ता० ६ रोजीं लढाईवर जाण्यासाठीं मुंबईकडे रवाना होतील. अधीक उपयुक्त कामगिरीवर जाऊन हे परत लवकरच यशस्वी होऊन येतील या उमेदीवरच त्याचा वियोग सहन होईल.

प्रसिद्ध वेदान्ताचें युक्तिड कर्ते रा. रा. बाबा साहेब गर्दे हे येथें आले असून त्यांचीं प्रवचनें सुरू आहेत.

रा. रा. रंगनाथ गणेश उटगीकर, तहशीलदार यांस खामगावास बदलण्यांत आलें.

रा. रा. नानासाहेब पाळेकर, क्लार्क आफ कोर्ट निझबत कमिशनर यांस पुणें मुक्कामीं क्षयरोगानें गेल्या मंगळवारीं देवाज्ञा झाली हें ऐकून त्यांच्या आप्तमित्र मंडळीस मोठी हळहळ वाटेल. गृहस्थ तसाच दीलदार गोड व कार्यदक्ष होता!

**लीलावतीः**— राजश्री सदाशिव नारायण ठोसर बी. ए. एल. एल. बी. यांनीं आपल्या 'हकुठार' टीके नंतर लिहीलेल्या लीलावती नाटकाचा प्रयोग परवां रात्रौ 'भारत नाट्यकला संगीत' मंडळीनें करून दाखविला. संविधानक राजस्थानांतील एका अगदीं साध्या पण हृदयंगम प्रसंगावरून घेतलेलें आहे. नाटक पाहतांना अगर वाचतांना कोठेंही व्यवहार सोडून कल्पना सृष्टींत आपण कांहीं तरी तरंग उडवीत आहों असें वाटत नाहीं. प्रयोग प्रेक्षणीय आहे.

मुर्डीचे प्रसिद्ध राजश्री कृष्णशास्त्री पेंडसे यांच्या औषधालयाची कल्पना सोबतच्या पुरवणी वरून नीटशी होईल.

शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

**सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी**

संधिवात, फेंपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लेग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

**जव्हेरीयनचें जीवनामिक्श्चर**



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ॥१२

वी. एच. जव्हेरियन कंपनी,

खलासीचकला, मुंबई.

नो नं० २२

मंगालिक प्रसंगीं बक्षीस देण्याकरितां

सेंटचाराजा.

**ओटो—दील—चमन.**


हें सर्वोत्तम सेंट मुद्दाम वापरण्यासाठीं हल्लींच्या फॅशनचें हें एकच होय. फक्त २—३ थेंब रुमालावर टाकल्यानें चमेलीच्या आणि बटमोगऱ्याच्या हजारों ताज्या फुलांइतका सुवास ८ दिवसपर्यंत टिकतो एका लहान बाटलींत हा सुगंधी पुष्पांचा भांडार आहे किं, रु. -॥- ॥।- व रु. २ ट. ख. वेगळा. सुवासिक कार्डें दिलचमनचीं दर डझनास रु. -॥। "

सोल एजन्टस. एच, आर. मोदी आणि कं.

नं. १० प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर, मुंबई.

सतत ९० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

दूषित रक्त शुद्ध करणारा



शरीराचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळ व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच **सार्सापरिला** देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु. १।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक—** डा. गौतमराव केशव, आणि सन्त

ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २.

नो० नं २३

**वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.**

नामर्दास मर्द बनविणारी

**राजवंशी नवरत्न याकुती,**

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

**राजवंशी सांड्याचें तेल,**

किंमत रुपये ५ ट्रेड मार्क "सँडो"

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे.

सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

**परमा सायरप.**

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध. एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस १॥ रुपया.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,

खबुतरखाना भुलेश्वर मुंबई

नो० नं० २४

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER

THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

### FUNDs 4 CRO RES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

### Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exist-ing Assurances. |
|---|---|---|
| | Rs | Rs. |
| 1888 | 8,668 | 2,63,38 000 |
| 1893 | 17,657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,300 | 8 47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05,818 |
| [illegible] | 3136,421 | 1.41,32356 |
| 1903 | 41,07009 | 2,10,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

### RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL

Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**

CHIEF AGENT,

*C. P. Berar & Khandesh, NagPUr*

N. N. 25

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd NO N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला——सोमवार तारीख ११ माहे जानेवारी सन १९१५ ई० [ अंक २

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटिशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.
सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

## NOTICE

Tenders are invited for the supply of the undermentioned grain to the Nagpur Central Jail for the year 1915. Sealed samples with the prices and conditions percentage of refractions &c clearly stated should be submitted to the Superintendent not later than 10 A. M. on the date mentioned below: — — —

| | | |
|---|---|---|
| Juari | 7000 Mds. | 21st January 1915 |
| Toor | 2400 Mds. | 18th March 1915. |
| Linseed. | 400 Mds, | 21st January 1915 |
| Jagnee. | 200 Mds. | |

Sd/— C. H. Bensley
Major I. M.S.
Superintendent Central Jail,
Nagpur.

## जाहिरात

### मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।१।०९ } J. G. Ridland. एजंट

नो. नं २

सतत ४२ वर्षे चाललेला कारखाना
ए. जे. ह्यात्रे आणि सन् सुगंधी.
ठिः--पांजरा पोळ नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर -- मुंबई.
एकच भाव! ! एकच भाव! !
अटा सुरंगीं आमचेकडे मिळणारा माल ओढो सुरंगी

अत्तरें.— गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल, रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिन, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. ही अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४ ६ रु.

तेलें.— चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगंधराव, मोतिया, आवळा, नाग, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेंपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. दर बाटली ४ आणे

अष्टगंधा अरगजा, १ तोळ्यास ४ आ ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना ( निरनिराळ्या मुवासाचा ) दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उदणें दर डबीस १ आ २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, मोगऱ्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान. पितळी शिंगे व करणे, भंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगावच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### हिंदुस्थानावर आरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें आरिष्ट सदोदित लागलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिंवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १८८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे किं. ८४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज याचा विकार एका दिवसात नाहींसा होतो. किं. ८४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई याजकडे मिळतात.

नो० नं० ५

## डायरी बक्षीस!!

(१)खंडे तात्विक बोल, भाग १ ला, किंमत ८६. (२)खंडे तात्विक बोल, भाग २ रा, किंमत ८६. [३) धर्मपद, किंमत ४. (४) पांगारकरकृत एकनाथचरित्र, किंमत ५. (५) विदग्धवाङ्मय, किंमत ८३. (६) आकोलें ( वऱ्हाड ) येथील साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष रा. हरिभाऊ आपटे यांचें भाषण, किंमत ८२. ७ मुंओवथोडा उपदेश, किंमत ८८. ( ८ ) वाल्मीकीचा जय, किंमत ८८. ( ९ ) अण्णा किर्लोसकरकृत संगीत सौभद्र व संगीत शाकुंतल, किंमत प्रत्येकीं ८१२. ( १० ) शिवलीलामृत किंमत ८८. या यादीपैकीं आठ आणे किंमतीचीं पुस्तकें मागविणारास पुढील ह्मणजे सन १९१५ ची, कापडी बायंडिंगची, भरपूर माहितीची, लहान [ पॉकेट ] डायरी बक्षीस मिळेल; व एक रुपया किंमतीचीं, पुस्तकें मागविणारास कापडी बायंडिंगची, भरपूर माहितीची मोठी डायरी बक्षीस मिळेल. टपालखर्च निराळा पडेल.

भट आणि मंडळी, पुणें शहर.
नो. नं ६

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेप्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ८८ व्हीपीनें ८१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही. पी. रु० १८६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत
पत्ता—वैंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी
नो. नं. ७

## केशराचें फूल मुफ्त

पवित्र केशर ॥।= शुद्ध शिलाजित ॥ असली कस्तूरी २४ ममीरातिनती ३ खालिस हींग ८= तो० सुंदर कामदार शाल ३ व

$3\frac{1}{2}+1\frac{1}{2}$ गज ६ से १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२
नो० नं० ८

## अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमींट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, याच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, नायटा, आगपैण, व्रण, चिखली, मुकी, ओली खाज, जखम, नखाविषयीं, तमाम रोगावर चालणारा १ च 'दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येता पौष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं. १ रु० व डोळ्यांतील वेगळ सोडण्याचे औ. किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाळ हात भट्टीचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता — व्ही० आर० मुळे,
नादुरा. जी० आय० पी०
नो० नं० ९

## नोटीस.

रा० रा० बाबुआपा वा॥ काशीआपा वाणी राहणार तेल्हारा ता० आकोट

यांस

रामचंद पुनीलाल साहु कडून नोटीस देण्यांत येते कीं तुह्मी ता० १९।१२।१४ रोजीं माझेशीं माझे जवळील अंदाज १५ खंडी जुनी जवारीचा सवदा दर खंडीस रुपये २९॥ प्रमाणें केला व जवारी खंडी २ मोजून नेऊन त्याचे रुपये मला हातींगनी सुमार कच्ची याचा हवाला देऊन देवविले. व बाकीची जवारी नेऊन रुपये दिले नाहींत. करितां आज पासून १५ पंधरा दिवसाचे आत जवारी नेऊन रुपये द्यावे असें न केलें तर मी ती जवारी चालु भावानें विकून जी नुकसान येईल ती व या नोटिसीचा खर्च असें तुह्मास द्यावे लागेल कळावें.
तारीख ९।१।१९१५

सही
रामचंद पुनीलाल द० खुद
नो० नं० २७

## ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० १ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षीतील वीस प्रकरणें १० रुपयांस वेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस-

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें—

## आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयां शिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ याचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधी प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिली जातात. नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.

नो० नं० १०

## नोटीस

बेशमी रा. नामदेव वल्द खुशाल मुन्हे राहणार अटाळी, ता. खामगांव यांस-

खालीं सही करणार इजकडून देण्यांत येते कीं मी तुमची लग्नाची बायको असून मला शहाणी होऊन आज ७ सात वर्षे झालीं. त्यांत पहिल्या वर्षीत तुम्हीं मधून मधून आठ पंधरा दिवस ठेवून मला गांजत असा. माझी हाल अपेष्टा करीत असा, वाईट शब्द बोलून मर्मभेद करीत असा. असें आपलें दुर्वर्तन असे. शिवाय आपण दुसरी मोहतराची बायको करून नांदत आहां. माझी आपल्या कडून सहा वर्षांत ने आण झाली नाहीं.

म्हणून मला माझ्या उदर निर्वाहास दरसाल माझ्या आई बापाच्या इज्जती नुरूप शंभर रुपये प्रमाणें सहाशे रुपये कर्ज झालें आहे तरी तुम्हास ही नोटीस पावल्या पासून आठ दिवसांच्या आंत तुम्ही वरील सहाशें रुपये कर्ज देऊन, न गांजण्या बद्दल करारनामा लिहून देऊन, व चार भले पंच चांगल्या रितीनें वागविण्या बद्दल जामीन देऊन मला घेऊन जावें.

तसें आपल्या कडून न घडल्यास वरील मुदती नंतर हीच नोटीस तुमची फारकती समजून माझा संसार व्यर्थ जाऊं नये म्हणून मी गंधर्वाचा दुसरा नवरा करीन. मग तुमचा माझ्यावर विवाहाचा हक्क न राहतां मोहतराच्या पतीवर सुद्धां दावा चालणार नाहीं. ही नोटीस दिली सही. दस्तुर दवलतराव बळीराम देशमुख चांदूरकर. ता० ४-१-१९१० सही.

सरू मर्द नामदेव मुन्हे हल्लीं मुक्काम शिराळ ता. खामगांव निशाणी हातचा बांगडी दस्तुर सदर्हू.

नो. नं. १९

## नोटीस

नोटीस बेशमी संभु वा। उकर्डा माळी इंगळे राहणार निमगांव ता० मलकापूर यांस

खालीं सही करणार राहणार निमगांव ता० मलकापूर यांज कडून नोटीस देण्यांत येते कीं तूं व मी बिरादर पानाल्यानें मी तुझा चुलत चुलता असून तुझा आजा व माझा बाप असे पूर्वी पासूनच विभक्त होते. व तुझी आई आणि बाप सुद्धां विभक्त होते. ज्यावेळेस तुझे आई आणि बाप वारला त्यावेळीं तूं अज्ञान असून तुझें पालन मी न करितां माझा सख्खा विभक्त भाऊ लक्ष्मण यांनीं तुझें पालन केले. तुझा व माझा एकत्रपणाचा व पालनाचा मुळींच संबंध नाहीं. व तूं मजला उमरावती येथील प्रमोदसिंधु छापखान्यांतुन दिलेली नोटीस ता० २८ माहे १२ सन १९१४ ची मजला ता० २।१।१९१५ मीनहू रोजीं मिळाली त्यांत लिहिलेला मजकूर मजला मुळींच माहीत नाहीं. व तो सर्वच खोटा आहे व तुझी कोणतीही वस्तु माझे जवळ कधीं नव्हती व आतां ही नाहीं. व या नोटीसीच्या यादींतील एकही वस्तु माझे परिचयाची नाहीं. अशा भलभलत्या नोटिसी देऊन मजला विनाकारण त्रास देतां हें बरोबर नाहीं. अशी जर पुढें नोटीस दिली तर त्या संबंधानें लागणारा खर्च व हल्लींचे नोटिसीचा खर्च तुम्हास द्यावा लागेल कळ० तारीख ७।१।१९१५ इसवी दस्तूर वासुदेव बळवंत राः निमगांव हल्लीं मु० आकोला.

सही

सोनाजी साळुबा माळी इंगळे राहणार निमगांव मुक्काम आकोला निशानी खुद्द हातचा आंगठा असे

नो० नं० १०

## नोटीस

नोटीस बेशमी सखुबाई जवजे बापू शास्त्री पुराणीक रा० वाशीम जि० अकोला यांसी:—

खालील सही करणार याजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुमचा भाऊ नामे भगवान टोळे यांनीं मी घरीं नसतांना माझे पश्चात माझी बायको नामे गोपीका इजला घेऊन गेला आहे. व तिचे अंगावर दागिनेही होते तर त दागिने आपण चांगले रीतीनें ठेविलेच असतील. तुम्हास घेऊन जाण्यास अंदाज दोन महिने झाले आहेत मी आणून घालण्याची आजपर्यंत वाट पाहिली आहे. परंतु आपण आतां नोटीस पावल्यापासून आठ दिवसांचे आंत आणून घालावे. असें न केल्यास मी अन्नवस्त्राच्या खर्चाबद्दल जबाबदार नाहीं कळावें. ता० ४।१।१९

सही

कृष्ण नारायण दंडे रा० मंगरूळपीर जि० अकोला

द० खु०

नो० नं० ११

# वऱ्हाडसमाचार

मिति पौष वद्य ११ शके १८३६

## मद्राची कांग्रेस.

मद्रास कांग्रेसचे अध्यक्ष ना० मि० भूपेंद्रनाथ बसु यांचें भाषण म्हणजे एक भविष्य वाणी आहे. सांप्रतच्या युद्धांत हिंदी सैनिकांनीं आपल्या रक्ताच्या शाईनें लिहिलेली हिंदुस्थानची भावी गोष्टींची पत्रिका त्यांनीं वाचून दाखविली, आणि त्या पत्रिकेवरून हिंदुस्थानचें भविष्य कसें उज्ज्वल व अभ्युदयानें अंकित आहे तें सांगितलें. इंग्लंडांतले उदारमताचे मुत्सद्दी व स्टेटसमनसारखीं अनुदार आंग्लो—इंडियन पत्रें खेरीज करून बाकीचीं चटसारीं हिंदुस्थानातलीं वर्तमानपत्रें हेंच म्हणत आहेत. स्टेटसमन पायोनियर, वगैरे सारखीं पत्रें मात्र हिंदुस्थानच्या लोकांचा राजनिष्ठा, व त्यांचें शौर्य आणि हिंदी लोकांची स्वराज्याची पात्रता यांच्यांत अर्थाअर्थी संबंध नाहीं असें सांगत आहेत. म्हणे काय आत्मसमर्पण, अपूर्व स्वार्थत्याग, दृढ निश्चय, ब्रिटिश साम्राज्याविषयींचा अभिमान, इ० सांप्रतच्या युद्धात हिंदी सैनिकांच्या अंगीं दिसून आलेले गुणांवरून स्वराज्य चालविण्यास कांहीं विशेष गुण लागतात! आज पंनास वर्षें ब्रिटिश मातेचें बोट धरून तिच्या पावला मागें पाऊल टाकणारें हिंदुस्थान जर अजून स्वतःच्या हिंमतीवर मार्ग आक्रमण्यास पात्र झालें नसलें तर त्याची लाज कोणाला वाटली पाहिजे? असा जो प्रश्न मि. बसु यांनीं केला आहे तो अगदीं यथार्थ आहे असें कोण म्हणणार नाहीं? हत्यारांचा कायदा रद्द करण्याची वेळ अजून ही आली नाहीं असें ब्रिटिशसरकारला वाटत असलें, आणि तो कायदा यापुढें ही हिंदुस्थानच्या कायदेबुकांत आपलें अढळपद कायम राखणार असेल तर त्याचा परिणाम हिंदी लोकांच्या मनावर काय होईल हें समजण्या इतकी बुद्धीची तीव्रता ब्रिटिश मुत्सद्यांत नाहीं असें म्हणून सारें जग ब्रिटिश राष्ट्राचा उपहास करील त्याची वाट काय? हिंदी लोकांना लष्करी शिक्षण देण्याची अवश्यकता सांप्रतच्या युद्धानें पूर्णपणें प्रस्थापित केली आहे. हिंदुस्थानच्या रक्षणासाठीं हिंदी लोकांना व्हालंटियर करण्याची व लष्करी शिक्षण देण्याची केवढी अवश्यकता आहे व या दोन्ही गोष्टी घडून आल्यास हिंदुस्थान ब्रिटिशांच्या शत्रूंच्या समोर केवढा जंगी आपला लष्करी अभेद्य तट उभा करील याचें मि. बसु यांनीं काढलेलें शब्दचित्र किती यथार्थ आहे! इंडिया कासिलसारख्या पुराण्या संस्थेच्या डागडुजीच्या बिलाला हिंदुस्थानानें मनापासून पुष्टि दिली नाहीं म्हणून मि. बसु यांनीं खेद प्रदर्शित केला आहे. पण जुन्या इमारतीची डागडुजी करून नेहमीं कसें चालावें? हिंदुस्थानची महत्त्वाकांक्षा जर वाढत आहे. व स्वराज्याचे हक्क मागण्यापर्यंत जर पाळी आली आहे, तर त्यासाठीं सरकारनें नवी सृष्टिच केली पाहिजे, तेथें जुन्या इमारतीच्या डागडुजीनें कसा निभाव लागणार?

यंदाच्या कांग्रेसला मद्रासचे गव्हर्नर ना. लॉर्ड पेटलंड साहेब आले होते. राजकीय दृष्टीनें ही अत्यंत महत्त्वाची गोष्ट आहे. कांग्रेसच्या दुफळीचा साधा जहवूं पहाणारांनीं दिवसेंदिवस कन्व्हेशन कांग्रेसला येत जाणारें हें महत्त्व दृष्टीआड करतां कामा नये. त्या बरोबरच यंदाच्या कांग्रेसला पंजाबांतून कोणीच डेलिगेट आले नाहींत व संयुक्त प्रांतातले थोडे आले याही गोष्टी नमूद करून यंदा झालेल्या चुकीची आवृत्ति पुढले वर्षी न होऊं देण्याविषयीं सावध राहणें अवश्य आहे.

## पेनासिलीचा कारखाना.

अलीकडे जर्मनीचा हिंदुस्थानाशीं असलेला व्यापार बुडविण्याकडे सरकारचें लक्ष लागल्यापासून या ज्या वस्तूंचा संबंध त्या व्यापाराशीं येतो त्या वस्तूंच्या संबंधानें औद्योगिक दृष्ट्या माहिती सरकारच्या व्यापारखात्याकडून प्रसिद्ध होऊं लागली आहे. जर्मनी व आस्ट्रिया यांतून येणाऱ्या स्टेशनरी मालात मुख्य जिन्नस म्हणजे पेनसिली होत. पेनसिली करण्याचे कारखानें जर्मनी व आस्ट्रिया या दोन देशांत विशेषतः आहेत याचें कारण चांगल्या पेनसिलीला लागणारे प्रफाइट नांवाचा शिशा सारखा दिसणारा पण ठिसूळ पदार्थ व उत्तम प्रकारचें सीडर लाकूड हीं दोन्ही त्या देशात होतात. हिंदुस्थानात प्रफाईट फक्त ट्रावणकोर संस्थानात आहे. पण तें ही पेनसिली करण्याच्या उपयोगाचें नाहीं. मध्यप्रांतांत छिंदवाडा येथें त्याची खाण लागली, पण तेथील प्रफाईटसुद्धां पेनसिलीच्या उपयोगीं पडेल असें वाटत नाहीं. तेव्हां शुद्ध प्रफाइट युरोपांतून आणल्याशिवाय हिंदुस्थानात पेनसिली करण्याचा कारखाना चालणें शक्य नाहीं. दुसरी म्हणजे लाकडाची अडचण ही तशीच जबर आहे. जर्मनी व अमेरिका यांतल्या सीडर लाकडासारखें मऊ लाकूड इकडे सापडत नाहीं, देहरादून येथील जंगलखात्याचे अधिकारी आज पांच सात वर्षें शोध करीत आहेत पण अद्याप योग्य लाकडाचा पत्ता लागला नाहीं, म्हैसूर दरबारला त्यां संस्थानांत असें लाकूड सापडलें आहे म्हणतात. अनुभवा अंतीं त्या शोधाची खरी किंमत दिसून येईल.

## बालहत्त्याकारी जर्मन.

गेल्या आठवड्यांतली लढाईची मोठी बातमी म्हणजे जर्मन लोकांनीं क्यालेच्या मार्गानें इंग्लंडवर स्वारी करतां येत नाहीं म्हणून चरफडून जाऊन इंग्लंडच्या ईशान्य किनाऱ्यावर एका दिवशीं पहाटेस एकदम तीन ठिकाणी केलेले आरमारी हल्ले होत. तीन जर्मन क्रूझरें अकस्मात् येऊन इंग्लंडच्या किनाऱ्यावरील हार्टलपूल, स्कारबरो व आण

एक लहानसें बंदर या तीन ठिकाणावर कुलपी गोळ्यांचा वर्षाव होऊं लागला. या गोळ्यांनीं निःशस्त्र अशा गरीब, अनाथ स्त्रिया व बाळकें यांचा बराच संहार झाला. लढाई ह्मटली ह्मणजे सशस्त्रांशीं करावयाची. तें सोडून जर्मन लोक आतां लपून छपून येऊन बायकांपोरांवर हात टाकण्यासारखें क्षुद्र बुद्धीचें व चोरपणांचे कृत्य करूं लागले व प्रार्थनामंदिरावर बाँब टाकून त्याचा ध्वंस करण्याचें पाप शिरावर घेऊं लागल तेव्हां आता ख लढाई संपली, आणि खाटिकपणास प्रारंभ झाला असें ह्मणावें लागतें. पापाचा घडा भरत आला ह्मणजे माणसास अशा प्रकारच्या हत्या व पापकर्मे करण्याची बुद्धी होत असते, व हेंच निमित्त शेवटीं त्याच्या उच्छेदाला होतें असें जें आमच्या पुराणांत अनेक असुरांच्या चरित्रांच्या रूपानें दाखविलें आहे तें व्यावहारिक सत्य आहे व जर्मनीच्या संबंधात ही त्याची सत्यता लवकरच अनुभवास येईल असा रंग दिसत आहे कांहीं हा असो. पण जर्मन राष्ट्र हें ईयत सुधारलेलें असा जो आजपर्यंत त्याचा लौकिक होता तो जाऊन ते आता बालहत्याकारी व स्त्रीहत्याकारी अशा कलंकानें यापुढें दूषित होऊन राहणार हें निश्चित आहे.

## जर्मन व आस्ट्रियन मालाचें प्रदर्शन

हें सरकारच्या व्यापार व उद्योग खात्याकडून कलकत्त्यास नुकतेंच उघडण्यात आलें. यांत जर्मनी व आस्ट्रिया या देशातून हिंदुस्थानांत येणारा हरप्रकारचा माल मांडून त्याच्या शेजारींच तसाच हिंदुस्थानात तयार होणारा मालही तुलनेसाठीं मांडण्यांत आला आहे. त्यावरून असें दिसून आलें कीं लोंकरीचें कापड, साबण, ब्रश, चाकू वगैरे कित्येक देशी जिनस परदेशी मालाइतके स्वस्त जरी नाहींत तर त्यामालाइतके चांगले इकडे होऊं शकतात. जर्मन शाली व कानपूरच्या गिरणीच्या शाली यांची तुलना केली तर कानपूरचा माल श्रेष्ठच ठरतो. या प्रदर्शनात जर्मन रंगानीं रंगविलेले व वनस्पतिजन्य देशी रंगांनीं रंगविलेले अशा दोन्ही प्रकारच्या रेशमी वस्त्राचे नमुने ठेविले आहेत. चाकू कात्र्या वगैरेंत मिरतचा माल पसंत होण्यासारखा आहे. अलीगढचीं कुलपें परदेशी मालाशीं टक्कर देण्यास समर्थ आहेत. ... कलकत्ता व बडोदा या दोन ठिकाणांहून आलीं आहेत आस्ट्रियांतून तिजोऱ्या येतात. यांच्या शेजारीं हिंदुस्थानांतल्या देशी तिजोरी मांडतां येतील. कांचेच्या नकली बांगड्या दरसाल सुमारें ९ लक्ष पौंड किंमतीच्या ह्मणजे सुमारें पाऊण कोट रुपयांच्या जर्मनी व आस्ट्रिया यातून येतात. याशिवाय दिव्यांच्या चिमण्या आरसे, झुंबरें, कांचेच्या बाहुल्या, मणी, खोटी मोत्यें वगैरे जिनस तर असंख्य आहेत. जबलपूरच्या कांचेच्या कारखान्यांतून दिव्यांच्या चिमण्या व बांगड्या आमच्या जवळील फिरोजाबाद येथून बांगड्या संयुक्त प्रांतांतल्या नगीना येथून फुंकून तयार केलेल्या कांचेचे जिनस व अलाहाबाद येथून ही कांहीं नमुने आले आहेत. मीरतची नॉर्थवेस्ट सोप कं; कलकत्त्याची ओरिएंटल कं. व मुंबईची डायमंड सोप कं. यांच्या कडून साबणाचे चांगले नमुने आले आहेत. कलकत्ता, अलाहाबाद, अमदाबाद वगैरे ठिकाणाहून ब्रश आले आहेत. कलकत्त्याच्या स्मॉल इंडस्ट्रीज डेव्हलपमेंट कारखान्यांतून आलेल्या पेनसिली तर फारच तारीफ करण्यालायक आहेत. पंजाबातून खडूच्या कांड्या, कानपूराहून फण्या, कलकत्त्याहून मातीची भांडीं, वगैरे जिनस आले आहेत. अजून बराचसा माल यावयाचा आहे. तेव्हां आणखी कांहीं दिवसांनीं हें प्रदर्शन प्रेक्षणीय होईल.

## लॉर्ड रॉबर्टस्

नुकतेच परलोकवासी झालेले सुप्रसिद्ध सेनापती लॉर्ड रॉबर्टस् यांचे विषयींची एक गमतीची दंतकथा अलीकडे प्रसिद्ध झाली आहे. आश्चर्याची गोष्ट आहे कीं ज्यांनीं अफगाण युद्ध, बोअर युद्ध वगैरे सारख्या भयंकर युद्धांत आपली समशेर गाजविली ते राबर्टस साहेब मांजराला भीत असत! ते राहत असत तेथें मांजरानें फिरकूं नये ह्मणून विशेष खबरदारी घेण्यांत येत असे! एकदा यांची स्वारी ब्रह्मदेशांतल्या सैन्याची पाहणी करण्यासाठीं बोटीनें तिकडे जावयाची होती. बोटीवरल्या खलाशांनीं आपापलीं पाळीव मांजरें दूर सोडून द्यावीं ह्मणून आगाऊ हुकुम सुटले होते. त्याप्रमाणें बोटीवरल्या कप्तानानें सगळी व्यवस्था केल्याचें कळल्यावर सेनापतीसाहेबांची स्वारी त्या बोटीवर चढली. पहिला दिवस तर बरा गेला. पण दुसरे दिवशीं सगळी मंडळी खाना खात बसली असता लॉर्ड राबर्टस साहब एकदम घाबरून खुर्चीवरून उठले आणि 'मांजराचा शब्द कांहून तरी ऐकूं येत आहे' त्यावरून लोक बोटीचा कानाकोपरा शोधूं लागले. पहातात तों खरोखरच एका खलाशानें एक पाळीव मांजर लपवून ठेविलेलें सांपडलें. त्या मांजराचा शोध लागेपर्यंत लाट साहेबांना खाना खाण्याचें सुचलें नाहीं.

## निरनिराळ्या परिषदा.

डिसेंबरच्या शेवटचा आठवडा दरसाल प्रमाणें यंदाही जागोजाग भरलेल्या भिन्नभिन्न परिषदांच्या कामानें गजबजलेला होता. मद्रास येथें काँग्रेसच्या बरोबर सामाजिकपरिषद म्हैसूरच्या यवराजांच्या अध्यक्षत्वाखालीं झाली. थिऑसोफिस्ट कन्व्हेन्शन ही संस्था फार पुराणी आहे. तिचेंही वार्षिक अधिवेशन मोठ्या उत्साहाने झालें. यंदा मिसेस बिझांट व मि. जिनराज दास यांचीं सुश्राव्य व चिंतनीय भाषणें ऐकून श्रोतृवृंद आकंठ तृप्त झाला. एकेश्वरी पंथाची परिषद कलकत्त्याचे प्रि. हेरंबचंद्र मैत्र यांच्या अध्यक्षत्वाखालीं. मद्यपाननिषेधपरिषद रे. अँडरसन यांच्या अध्यक्षतेखालीं होऊन तिनें सरकारी अधिकाऱ्यांनीं गेलेवर्षी दाखविलेल्या सहानुभूती बद्दल त्यांचे आभार मानिले. याचवेळीं दक्षिण महाराष्ट्रांत दिगंबर जैन सभा, पुण्यास मराठा परिषद व रावळपिंडी 'पंजाब' येथें मुसलमानांची शिक्षण परिषद यांचीं अधिवेशनें झालीं. या शेवटल्या सभेच्या वेळीं हिंदूंनीं मुसलमान अध्यक्षांचें व फेरोजपूर येथें भरलेल्या हिंदुपरिषदेचे वेळीं तेथील मुसलमानांनीं हिंदु अध्यक्षाचें उत्कृष्ट स्वागत केलें. हिंदु मुसलमानांत बंधुप्रेम वाढत चाललें आहे याला आणखी पुरावा काय पाहिजे! याच सुमारास आह्मा वर्तमानपत्रकारांना अभिमानास्पद वाटणारा असा एक सुप्रसंग घडून आला. मद्रासच्या 'हिंदु' पत्राचे माजी संपादक मि. जी. सुब्रह्मण्यम् आयर यांची तसबीर त्यांचे संपादकबंधु कलकत्तेकर ना. मि. सुरेंद्रनाथ बॅनरजी यांच्या हस्तें अनावृत करण्यात आली! संपादकासंपादकात भ्रातृत्व गुर्गुरतें असें नातें हिंदुस्थानांत असतें असें सांगत फिरणाऱ्या आंग्लोइंडियन व मिशनरी लोकांनीं यावेळीं आपलीं तोंडें निरखिलीं असलीं पाहिजेत.

## महागाई व गव्हाची निर्गत.

दुष्काळाच्या दिवसांतल्यापेक्षाही अधिक अशी महागाई ह्या देशांत असल्यामुळें लोकांचीं मनें अत्यंत अस्वस्थ झालीं आहेत. विशेषतः उत्तर हिंदुस्थानात जेथें गव्हाचें मुख्य खाणें आहे तेथील लोकांच्या तोंडचें पाणी पळालें आहे ह्मणून सदर महागाईचीं कारणें व गव्हाची निर्गत याचा संबंध या प्रश्नाचा विचार करण्यासाठीं थोड्या दिवसांपूर्वी दिल्ली येथें एक परिषद सरकारकडून भरविण्यात आली होती. या परिषदेच्या शिफारसीवरून हिंदुस्थानसरकारच्या व्यापारी खात्यानें असा एक ठराव काढला आहे कीं गव्हाच्या निर्गतीला आळा घालण्यासाठीं १९१५ सालच्या पहिल्या तीन महिन्यांत हिंदुस्थानांतून एक लक्ष टन गहूं किंवा पीठ यापेक्षां ज्यास्त निर्गत होऊं नये. यावर पायोनियर पत्र ह्मणतें कीं हा निर्बंध ह्मणावा कीं अनिर्बंध ह्मणावा तेंच कळत नाहीं. कारण कीं आजपर्यंत साठ हजार टन इतकीच निर्गत होत होती, त्या जागीं सरकारनें एकलक्ष टनाची मर्यादा ठरविली आहे! याला जर निर्बंध ह्मणावयाचें तर शद्बांचे अर्थ बदलले पाहिजेत! पायोनियरनें दिलेल्या माहितीत चूक आहे कीं सरकारच्या धोरणात कांहीं चुकलें आहे तें कळणें अवश्य आहे.

## नवीन वर्षाचें पददीदान.

सरकारकडून होणाऱ्या पदवीदानांत पगाराच्या रूपानें खोऱ्यानें पैसे ओढणाऱ्या सरकारी अफिसरांचाच परड्यांचा भरणा ज्यास्त होतो, व जे बिनसरकारी लोक स्वार्थत्याग करून व आपला अमूल्य वेळ खर्चून नागरिकत्वाचीं कर्तव्ये योग्य रीतीनें बजावतात, ते कोरडेचे कोरडे राहतात अशी टीका कलकत्त्याच्या स्टेटसमन पत्रानें केली आहे. मोठमोठाले सगळे मान संपेपर्यंत बिनसरकारी लोकांची आठवण सरकाराला होत नाहीं, व केसर. इ. हिंद पदकें देण्याचे वेळीं मात्र सढळ हात दिसतो या त्या पत्राच्या टीकेंत खरोखर कांहीं अर्थ आहे कीं काय हें सरकारनें अवश्य पाहावें.

## महायुद्ध.

या लढाईसंबंधानें सरकारी साप्ताहिक 'युद्धवृत्तां'त नुकताच एक नामी लेख आलेला आहे. यांत आजपर्यंतच्या बातम्या संकलित करून त्यांचा पूर्वापार संबंध दिलेला आहे आणि एकंदर माहिती युद्धाच्या रम्य कथानकाप्रमाणें वाचण्यासारखी आहे. इंग्रजींत मूळचा लेख असून त्याचें मराठी रूपान्तरही चांगलें साधलें आहे. हे युद्धवृत्ताचे लेख लिहिणाऱ्या शोधक व चतुरस्र गृहस्थाचें अभिनंदन करून आह्मी त्याचा मासला खालीं देतों आहों:—

### साप्ताहिक युद्धवृत्त.

आजच्या लेखांत आपण गेल्या आठवड्यांत फ्रान्स आणि बेलजममध्यें, पूर्व युरोपात, दर्यावर झालेल्या युद्धाची संक्षिप्त हकीगत देऊन नंतर तुर्कस्थान ह्या युद्धात का सामील झालें व त्यापासून काय परिणाम होतील याचें थोडक्यांत दिग्दर्शन करूं.

उत्तर समुद्रांत जर्मन आरमारानें हालचाल चालविली आहे. असें दिसतें कांहीं क्रूझर (तीं किती होती तें कळलें नाहीं) धुकें पडलें असतां ब्रिटिश आरमाराचा चुकवून बाहेर निसटलीं आणि इंग्लंडच्या पूर्व भागांतील स्कारबोरो, हार्टलपूल व वेनेदन व्हिटबी ह्या शहरांवर गोळे टाकून तीं परत तशींच झटपट निघून गेलीं, व त्यामुळें तेथील प्राणहानि झाली व मालमत्तेचें नुकसान झालें. जर्मनीनें ठरविलेल्या अनुक्रमाचें हें कृत्य झालें. खुल्या येऊन हरएक बाबतींत आपल्याहून बलाढ्य अशा ब्रिटिश आरमाराशीं करण्याची जर्मन आरमाराची हिंमत परंतु समुद्रकांठच्या शहरावर असे छापे घालून ह्मणजे इंग्लंडने घाबरून जातील व फ्रान्स आणि येथें सैन्य पाठवणें तें बंद करतील त्याना भ्रम वाटत आहे. असल्या कांहीं विशेष हानि होत नसते, पाहिलें तर जर्मन जहाजें जर थोडे वारंवार छापे घालतील तर इंग्लिश बहुतेक आनंदच होईल असें वाटतें अशानें त्यांना अधिक जमवानें बाहेर येईल व त्या योगानें त्यांच्या पुन्हा चिंधड्या उडविण्याची ब्रिटिश चालीली संधि मिळेल ह्या हल्यांमुळे लोकांना तिळमात्र भीति वाटत आरमारी सामर्थ्याची त्यांना आहे, आणि सबंध जर्मन ... बाहेर येवो व खुल्या दर्यावर बीरकुंड आरमाराशीं तें दोन हात करो, हेंच काम इच्छा आहे ... इतम

फ्रान्स व बेलज्यममध्यें, उत्तर खुलासा किनाऱ्यापासून तों जर्मन सरहद्दीलगत खाली गेलेल्या एका लांबच लांब पट्टीवर शत्रूंचीं सैन्ये समोरासमोर उभीं त्याच्या परस्पर स्थितीमध्यें कांहीं फारसा फरक झालेला नाहीं. दोस्त राष्ट्रांनीं आफ ब्रिटिश, फ्रेंच व बेलजन सैन्यानें अखील हल्ला परत फिरविला आहे इतकेंच नव्हे तर ह्या पट्टीचे पूर्व व पश्चिम टोंकास ते बरेच पुढें सरसावलेले दिसतात.

ळें दोस्त राष्ट्रांचें पाऊल पडणें तें थोडें आस्ते आस्ते पडेल हें साहजिक आहे, पण नुसता वेळेचा प्रश्न आहे. उंदीर जसे खाया पनीराचा तुकडा थोडथोडा कुरतडून याचा फडशा पाडतात, त्या प्रमाणें दोस्त ष्ट्रें हीं शत्रूचा थोडाथोडा चावा घेत हेत. उंदराला त्या पनीराचा फडशा पाडण्यास थोडासा वेळ लागतो पण शेवटीं तो याचा फडशा पाडल्या शिवाय राहत नाहीं. च प्रमाणें दोस्त राष्ट्राचीं सैन्यें शत्रूनां हळू मागें हटवून त्यांचें सामर्थ्य खें क्षीण करित आहेत. आणि पूर्व हद्दीवर रशियाशीं लढण्यासाठीं आपलीं तेथें पाठविणें जर्मनीला भाग पडत त्यानें तर हें काम उत्कृष्टपणें पार ण्यास दोस्त राष्ट्रांस अधिकच फावलें आहे. ो करितो आहे तें मला स्वस्थपणें कुरत मी त्यांनां कुरतडतों आहे" असें च चे सेनापति जनरल जॉफ्रे यांनीं छाट- ी प्रसिद्ध झालें आहे.

शियाच्या सैन्याच्या मुरिच्या मंडो जर्मनी आस्ट्रिया यांचे सरहद्दीवर जोरानें चढाई जात आहेत त्यांमुळे तर जर्मनीचें अगदींच दणाणलें आहे. पोलंडमध्यें ला व वॉर्टा त्या नद्यांमधील टापूमध्यें भयंकर रणकंदन माजलेलें आहे तें काय चाललें आहे हें सांगणें आज कठिणच आहे. पण गेल्या महिन्यांत नीं आपलें पुष्कळसें सैन्य तिकडे पाठवून तें फार थकलें आहेत ाट सिद्ध होते हंगेरीवर स्वारी संभव असल्यामुळें त्यानीं आस्ट्रिया- दतीसाठीं तिकडेही बरेंचसे सैन्य आहे अशीही बातमी आली आहे. ारांमुळें आस्ट्रियाला आपलें सैन्य मधून काढून घेणें भाग झालें व णाम असा झाला कीं सर्व्हियन आस्ट्रियन सैन्याचा पुरा मोड करून पुष्कळ तोफा घेऊन व पुष्कळ कैदी करून आणले व आपली राज- ग्रेड पुनः आपलें स्वाधीन करून ह्या गोष्टीमुळें आस्ट्रियाचे राज्यांत संतोष उत्पन्न झाला व त्यामुळें एकंदरीनें लंका- बरीच नापसंत झाली ह्याच्या सर्व्हियाचा तर पराभव झालाच ग आतां रशिया हंगेरीवर स्वारी असा मात्र फारच संभव

आस्ट्रिया यांचे पक्षाला तुर्की झाला हें पाहून प्रत्येकाचे न उभा राहिला तुर्कीला असें कारण काय झालें असावें? इंग्लंडचें दोस्त होतें. तुर्कस्थान तरी शत्रू आहेत व त्याचे स्थानाचें संरक्षण इंग्लंड नेहमीं लें आहे. आस्ट्रिया हा तुर्कस्थानचा शत्रु आहे. हीं दोन राष्ट्रें आज न अधिक वर्षें युरोपच्या आग्नेय वर्चस्व व मुलुख मिळविण्यासाठीं झुंजत आहेत असें असून पुरातन शत्रूच्याच पक्षाला तुर्क- ला कां मिळालें?

त्या लेखांत सांगितलें आहे कीं गेलीं काहीं वर्षें जर्मनीनें तुर्की साम्राज्याचे कारभारांत बरेंच मन घातलें आहे. असें करण्याचा इरादा जरी काहींअंशी बर्लिनपासून इराणी आखातापर्यंत दळणावळणाचा मार्ग तयार करावा हा असला तरी त्याचा मुख्य उद्देश हा होता कीं ज्या युद्धाची तयारी जर्मनी आज कित्येक वर्षें करित आहे त्या इंग्लंड, फ्रांस व रशिया यांशीं होणाऱ्या महायुद्धांत तुर्कस्थानास ओढीत घालावें. आणि हा उद्देश तडीस नेण्यासाठीं जर्मनीनें तुर्कस्थानाचे सैन्यास युद्धकलेंत तरबेज करण्यासाठीं आपले बरेच अंमलदार तुर्कस्थानांत पाठविले आहेत, व इतर रीतींनीं तुर्कस्थानाचें सामर्थ्य वाढविण्याची जर्मनी खटपट करित आहे. पण आश्चर्याची गोष्ट ही कीं, जर्मनीकडून युद्धकलेचें शिक्षण जरी त्यास मिळालें तरी सन १९१२ सालीं झालेल्या बाल्कन युद्धांत बलगेरिया व ग्रीस यांचे सैन्यासमोर तुर्की सैन्यास टिकाव धरवला नाहीं. आणि त्यामुळें पुष्कळ तुर्कांची आपणास युद्धकलेचें शिक्षण देणाऱ्या ह्या जर्मन पंतोजांच्या संबंधानें फार निराशा झाली.

युद्धाचे आरंभींच तुर्कस्थान जर्मनीस जाऊन का मिळालें नाहीं ह्याचा वरील गोष्टींनीं थोडासा उलगडा होण्याजोगा आहे. निदान येवढी गोष्ट खरी कीं सुलतानाचे मंत्र्यामध्यें बराच मतभेद होता. जर्मनीचा पक्ष स्वीकारावा असें कांहींचें मत पडलें तर कांहींचें असें ठाम मत होतें कीं ह्या युद्धांत आपण मुळींच पडूं नये. तर मग, जर्मनीचाच पक्ष स्वीकारण्यास तुर्कस्थानाला काय कारण झालें असावें?

तुर्की सरकारचें असें ह्मणणें आहे कीं, एका ब्रिटिश गोदीमध्यें नुकतेंच तयार करण्यांत आलेलें तुर्कस्थानच्या मालकीचें एक लढाऊ जहाज ग्रेट ब्रिटननें ठेऊन घेतलें पण ही सबब काहीं युद्ध करण्यास वाजवी होऊं शकत नाहीं. कोणत्याही राष्ट्रानें युद्ध सुरू केलें असतां आपल्या देशांत जर इतर कोणा देशासाठीं लढाऊ गलबत तयार होत असलें तर तें आपणच ठेऊन घेण्याचा त्यास हक्क आहे, मात्र त्या दुसऱ्या राष्ट्राची त्यामुळें होणारी नुकसानी त्यानें भरून द्यावी, हा आंतरराष्ट्रीय कायद्याचा एक नियमच आहे व तो सर्व राष्ट्रांना मान्यही आहे. दक्षिण अमेरिकेंतील चिली नामक लोकसत्ताक राज्यासाठीं नुकतेंच तयार झालेलीं गलबतें ही ब्रिटिश सरकारानें अडकावून ठेविलीं पण त्या राष्ट्रानें काहीं कुरकुर केली नाहीं. दोघांनाही, चिलीला तसेंच तुर्कस्थानालाही, ब्रिटिश सरकारानें भरून देण्याचें कबूल केलें होतें. अर्थात, तुर्कस्थानानें जर्मनीचा पक्ष स्वीकारला त्याचें हें कांहीं योग्य कारण नव्हे.

शिवाय, हें तुर्कस्थानचें लढाऊ जहाज युद्धाचे आरंभीच अडकावून ठेवण्यांत आलें होतें, पण तुर्कस्थान तर जर्मनीला नवंबर महिन्यापर्यंत उघडपणें सामिल झालें नाहीं. उघडपणें सामिल झालें नाहीं असें आह्मी ह्मटलें आहे त्याचें कारण असें कीं, जरी ग्रेट ब्रिटन व त्यांचीं दोस्त राष्ट्रें यांशीं [illegible] केलें

नव्हतें तरी त्यांच्या विरुद्ध पुष्कळशीं शत्रुत्वाचीं कृत्यें तुर्कस्थानानें केलीं. उदाहरणार्थ, त्यानें गोबेन व ब्रेसला त्या दोन जर्मन लढाऊ जहाजांना तुर्की समुद्रांत कित्येक आठवडे आसरा घेऊं दिला. असें करणें आंतरराष्ट्रीय कायद्याचे विरुद्ध आहे. त्या कायद्यानें असें ठरविलें आहे कीं, कोणत्याही तटस्थ राष्ट्रानें (व त्यावेळीं तुर्कस्थान हें तटस्थ राष्ट्र होतें) लढत असलेल्या राष्ट्राचें लढाऊ गलबत आपल्या बंदरामध्यें २४ तासांहून अधिक वेळ राहूं देतां कामा नये व तेंही केवळ त्याची दागदुजी करण्या पुरतेंच किंवा पुढें दुसऱ्या तटस्थ राष्ट्राचे बंदरांत जाऊन पोहोंचण्यास पुरेल इतकी रसद घेण्यापुरतेंच राहूं द्यावें अर्थात् तुर्कस्थानाचें हें कृत्य दोस्त राष्ट्रांचे विरुद्ध केलेलें शत्रुत्वाचें द्योतक होय.

पण गोबेन व ब्रेसला ह्या लढाऊ जहाजांचें संरक्षण करूनच तुर्कस्थान थांबलें नाहीं. तुर्की आरमारावरील ब्रिटिश अंमलदारांस बरतर्फ करून त्यांचे जागीं जर्मन अंमलदारांची त्यानें नेमणूक केली व अखेर काळ्या समुद्रात रशियाचे लढाऊ गलबतावरही त्यानें हल्ला केल्याचें दिसून येतें. असें करणें ह्मणजे आपण लढाई सुरू केली असें जाहिर करणें होय, आणि ह्मणून पेट्रोग्राडनें तुर्कस्थानाची समजूत करण्यासाठीं आपली शिकस्त केली असतांही तुर्कस्थानास आपला शत्रू ह्मणून लेखणें त्यास भाग पडलें.

जर्मनीचा पक्ष स्वीकारला तो काहीं त्यानें मनापासून स्वीकारला नाहीं असें मानण्यास बरीच जागा आहे, आणि सुलतानाचे मंत्र्यांत आपसांत बेबनाव खातरीनें झालेला आहे हें वर सांगितलेंच आहे. तुर्कस्थानला अखेर आपल्या पक्षाकडे ओढण्यासाठीं लांच लचपत देणें जर्मनीला भाग पडलें असें ह्मणतात.

आता तुर्कस्थान युद्धांत सामिल झाल्यानें काय परिणाम होण्याचा संभव आहे तें पाहूं. निदान एका गोष्टीबद्दल तरी संशय राहिला नाहीं. ती गोष्ट ही कीं, सर्व जगभर मुसलमान लोकांनीं तुर्कस्थानाचें ह्या कृत्याबद्दल जोरानें निषेध व्यक्त केला आहे व हा निषेध हिंदुस्थानातील मुसलमानांनीं तर अत्यंत जोरानें व्यक्त केला आहे. मुसलमानाने लक्षात ही गोष्ट घेऊन चुकली आहे कीं वस्तुतः जर्मनीचे कारस्थानामुळेंच तुर्कस्थानला ह्या युद्धांत पडावें लागलें आहे. ईजिप्त, सुदान व अरबस्थानाचे एका टोंकापासून दुसऱ्या टोंकापर्यंत ज्यांचें फार मोठें वजन आहे, जे, मोरक्कानी तरीकयाचे मुख्य व पैगंबराचे प्रत्यक्ष वंशज आहेत असें सय्यद अलीएल मोरघानी यांनीं तर जर्मनीनें "आपली महत्वाकांक्षा सिद्धीस नेण्यासाठीं तुर्कस्थानला बळी दिलें आहे" असें ह्मणून जर्मनीचा अगदी झणझणीत शब्दांनीं निषेध केला आहे ही गोष्ट विशेष लक्ष्यात ठेवण्या जोगी आहे.

तुर्कस्थानला ह्या युद्धांत सामिल करून घेण्यात जर्मनीचा हेतु असा होता कीं, मिसर "ईजिप्त" देशामध्यें जें एक संरक्षित राज्य "प्रोटेक्टरेट" ब्रिटिश लोकानीं स्थापन केलें आहे त्या राज्यावर आणि ग्रेटब्रिटन व त्याचें पूर्वेकडील साम्राज्य ह्याचेमधील

दळणवळणाचे [illegible] मार्ग ज्या सुवेझचे कालव्यां-
तून जातो [illegible] सुवेझचा कालवा मोडून
टाकण्याचा [illegible] तुर्की सैन्याचा उपयोग
व्हावा. परंतु [illegible] इजिप्तच्या पूर्वेकडील प्रदेश
ह्मणजे अगदी [illegible] ओसाळ मैदान आहे व तेथें
रेल्वे नसल्यामु[illegible] सैन्यास रसद पोहोचविणें
मुष्किलीचें आ[illegible] आणि आपणावर कोणी
हल्ला केलाच त[illegible] त्यांचा खरपूस समाचार
घेणें आपणास [illegible] कठिण पडणार नाहीं असें
इजिप्त मधील ब्रि[illegible] ब्रिटिश लोकांची खातरी आहे.
शिवाय, कित्येक [illegible] गोष्टीवरून असें दिसून
येतें कीं तुर्की सै[illegible] झाला जर्मन अंमलदारांचे
फाजील कडक [illegible] स्त न आवडल्यामुळें त्या
सैन्यांत बराच अ[illegible] ोष उत्पन्न झाला आहे.

तुर्की साम्राज्य [illegible] त्या इतर भागांतही स[illegible]
कांहीं सुयंत्र [illegible] झालें आहे असें नाहीं.
इराणी आखाताचे [illegible] माथ्यापासून पुढें २८-
एक- आरबपर्यंत [illegible] हिंदी व ब्रिटिश सैन्य
घुसलें आहे आणि [illegible] उत्तरेकडून रशियन सैन्य
खालीं उतरून आ[illegible] निर्यातील व्हान सरोवर
राजवळ तुर्की सैन्या[illegible] झोंबी लढत आहे. अगदीं
ताज्या बातमीवरून [illegible] असें कळतें कीं ह्या
टापूंत रशियाशीं [illegible] थंडी [illegible] करण्या [illegible]
तुर्कस्थानानें आपलें [illegible] नाहीं. [illegible]
बोलावलें आहे. [illegible] आहे [illegible]

तुर्कस्थान ह्या युद्धा[illegible] तिकील झ[illegible]
ह्मणून तंत्रज्ञ नें पूर्व व [illegible] पश्चिम युरोपात
सैन्याच्या ज्या मुख्य हाल[illegible] चाली सुरू आहे
त्यावर कांहीं परिणाम हो[illegible] ण्याजोगा नाहीं.

## सगळा गोंधळ!

लढाईच्या बातम्यां वाचण्याविषयींची लो कांची उत्सुकता दिवसें दिवस कमी [illegible] चालली आहे याविषयींची मीमांसा करतांना एक इंग्रजी पत्र ह्मणतें कीं या बातम्या देणारीं वर्तमानपत्रें आपल्या वाचकांना निबुद्ध समजतात कीं काय कोण जाणें! आस्ट्रियानें कैद केलेल्या लोकांची संख्या दरखेपेस ला[illegible] पंनास हजारापेक्षा कमी नसते. आणखी अशारितीनें कैद केलेल्यांची जर बेरीज केली तर आस्ट्रियाच्या एकंदर लोक संख्येपेक्षांही अधिक होईल! गेल्या आठवड्यांत मुंबईच्या अ[illegible] क्रोनिकल पत्राच्या एका अंकांत 'तीन आठवड्यात नुसत्या पोलंड मध्यें जर्मनीचे ६ लक्ष लोक मेले' अशी खबर ठळक अक्षरांनीं छापिली आहे. त्याच अंकांत ६ लक्ष संयुक्त सैन्यांनीं कैद केल्याचें हें सांगितलें आहे. ह्मणजे नुसत्या पोलंडमध्यें जर्मनीचे १२ लक्ष लोक निरुपयोगी झाले. याशिवाय आजपर्यंत १७।१८ लक्ष जर्मन मारले गेले व कैद झाले असे हिशोब एक महिन्यापूर्वीं कलकत्याच्या स्टेटसमन् मध्यें आला होता. हे आंकडे खरे असले तर जर्मनीच्या ४० लक्ष सैन्यापैकीं तीन चतुर्थांश भाग खलास झाला आहे, फक्त १० लक्ष कायते राहिले आहेत असें ह्मणावें लागेल. पण ही गोष्ट खरी असेल काय? असा संशय येतो. तसेच हिंदुस्थानांत रूटर कडून येणाऱ्या बातम्या व सिडिनच्या द्वारें आस्ट्रेलियन पत्रांतून येणाऱ्या बातम्या यांच्यांत कांहींच मेळ नसतो ह्मणून पायोनियर सारखें पत्रही रूटरवर गरम झालें आहे. रूटर सांगतो कीं तुर्कस्थानवर रशि

...नें आगोपाठ सारखे जय मिळविले आहेत. इकडे हमदद नांवाचें उर्दू पत्र लंडन टाइम्स, म्यांचस्टर गार्डियन वगैरे इंग्रजी पत्रांतलेच उतारे प्रसिद्ध करीत असतें. तें उतारे पाहिले ह्मणजे अगदीं उलट प्रकार दिसतो! हें काय गौडबंगाल आहे तें कळत नाहीं. असा प्रकार पाहिला ह्मणजे युद्धाच्या बातम्या वाचण्याविषयीं उत्सुक असलेल्या वाचकांना वर्तमानपत्रांतल्या बातम्या वाचण्यापेक्षां लढाई संबंधाची एखादी कादंबरी वाचणें अधिक बरें वाटूं लागल्यास त्याच्याकडे काय दोष आहे?

## विलक्षण खोडसाळपणा !

ता० ९ च्या 'बंगाली' पत्रांनें एक विलक्षण खोडसाळपणा उघडकीला आणिला आहे. अलाहाबादच्या पायोनियर प्रेसमध्यें छापिलेलें, व वर 'खाजगी प्रसारार्थ' अशीं इंग्रजी अक्षरें छापलेले 'बर्लिन' नावांचे एक छोटेखानी पत्रक कोणी काढलें आहे व त्यात पुढील विधानें आहेत. इंग्रजांच्या विरुद्ध राजद्रोही चळवळ जी आज कित्येक वर्षे हिंदुस्थानांत चालली आहे ती जर्मन लोकांच्या चिथावणीमुळे झालेली आहे. हिंदी लोकांना बांब टाकण्यास, कापनाच्या गड्यांना आग लावण्यास व खून करण्यास जर्मन लोकांनीं शिकविलें. मिदनापूरच्या कटाच्या खटल्याच्या मुळाशीं जर्मन लोकांचा शिकवणी होती. एडवर्ड बादशहा जर्मनीस गेले होते. तेव्हां लॉर्ड हार्डिंज त्याचे प्रायव्हेट सेक्रेटरी ह्मणून बरोबर गेले होते तेव्हांपासून जर्मन लोक त्यांना शत्रू मानतात, आणि दिल्लीस त्यांच्यावर बांब टाकण्यांत आला होता याचें कारण हेंच बारिसालचा कट, कोमागाटामारू प्रकरण, स्वदेशी चळवळ, बंगालच्या फाळणीविरुद्धची चळवळ, फार काय पण कांग्रेसनें स्वराज्याच्या हक्काची केलेली मागणी, यांच्या सुद्धा मुळाशीं जर्मनांचेंच कारस्थान आहे. या विधानाच्या सत्यतेचा लेखी पुरावा जर्मन बादशहाच्या ताब्यांत असल्यामुळें तो आणितां येत नाहीं, पण तो आहे खास असें ह्या या पत्रकांत ह्मटलें आहे. ही विधानें इतकीं खोडसाळ व हिंदी लोकाची बेअब्रू करणारीं आहेत कीं त्याबद्दलचा, तर सदर पत्रक लिहिणारा व हें पत्रक छापणारा या दोघांजवळ हो सरकारनें मागणें अवश्य आहे. कारण, तसें न झाल्यास कांग्रेस व एकंदर हिंदुस्थान जी राजनिष्ठा दाखवीत आहे ती केवळ फसवणूक आहे असा ग्रह कोणाचा ही होईल. कोणि बिनसरकारी कौन्सिलचा सभासद वरिष्ठ कायदे कौन्सिलांत याबद्दल प्रश्न विचारून सरकारला या बाबतींत चौकशी करण्यास प्रवृत्त करील काय!

## जगा आणि शहाणपण शिका.

अशी इंग्रजींत एक ह्मण आहे, आणि लॉर्ड कर्झन हे आपल्या कृतीनें तिचें सत्यत्व करीत आहेत. हिंदी शिपायांच्या मदती साठीं विलायतेंत उभारलेल्या फंडासंबंधानें झालेल्या एका सभेंत भाषण करतांना त्यांनीं सांगितलें कीं आमच्या ववनावरचा लोकांचा विश्वास पावरच हिंदुस्थानांतल्या राज्याची बळकटी अवलंबून आहे' अगदीं खरें आहे. पण दुर्दैवाची गोष्ट ही आहे कीं याच राजश्रींच्या हातांत हिंदुस्थानचीं राज्य सूत्रें असताना त्यांनीं महाराणी व्हिक्टोरिया यांनीं १८५८ सालीं दिलेल्या सनदेला' अशक्य सनद' असें नाव देऊन त्यात दिलेलीं वचनें' परमार्थेन न गृह्यतां वच.' या दुष्टोक्तीनें वाऱ्यावर उडवून देण्याचा यत्न केला होता, व त्याबद्दल पुढें लोकरच लॉर्ड मोर्ले सारख्या कडकडीत उदारमतवादी प्रधानाकडून त्याबद्दल त्याना चांगला खरपूस टोमणाही मिळाला होता! अधिकार हातांतून जाताच त्याच्या डोळ्यावरचें पडळ दूर होऊन त्यांची दृष्टि आतां साफ झालेली दिसते. आतां त्यांना वस्तु त्यांच्या खऱ्या स्वरूपांत दिसू लागल्या आहेत. पर्यायानें सांगावयाचें ह्मणजे अंगचा पोरकटपणा जाऊन ते जसें वयातीत होत आहेत, तसतसे शहाणपण शिकत आहेत असें ह्मटलें पाहिजे. असा वास्तविक प्रकार असला तर तो सर्वथा अभिनंदनीयच ह्मटला पाहिजे.

## युद्धाचा रंग.

हिंवाळ्यामुळें युद्धाच्या हालचाली पुष्कळशा बंद पडल्या आहेत. तेव्हां किरकोळ लढाया व छापे या शिवाय दुसऱ्या बातम्या ह्मणण्यासारख्या नसतात. लढाईमध्यें घायाळ झालेले कैदी ज्याच त्याना परत करावे असें जर्मन व ब्रिटिश या दोन सरकारमध्यें ठरलें आहे हा दुःखांत सुखाची गोष्ट होय. आष्ट्रियन लष्करानें पोलंडमधून डोंगराळ रस्त्यानें आपला रस्ता सुधारित असता रशियन घोडस्वारांनीं त्यांचा दाणादाण करून मोडली आणि शेंकडा लोक कैदी केले कारकेशिअनच्या बाजूला रशियन सैन्यानें टर्कीच्या तोफा व दारूगोळा लुटून आणला. ॲरगॉन व उत्तरव्होज्स या भागानें आपलीं लष्करें पुष्कळ पुढें सरसावली असून त्यांनीं ३०० मीटर लांबी पर्यंत शत्रूंचे खंदक सर केले आहेत. आल्टर्किकपर्यंत आपल्या जाणाऱ्या पोंचल्या आहेत. पोलंडांतल्या दावा प्रमाणें हालचाल काहीं सांगतां येत नाहीं तथापि जर्मनांचें जेवढें दांडगे सैन्य होतें त्याच्या तोडीला तितकंच दांडगें सैन्य आतां नवीन सज्ज असून शत्रूचा पाय मात्र अर्धाकअर्धांक मागेंच घेत असल्यासारखे दिसते. जर्मन सैन्यानें नुकताच बेलजमधील ब्रिजहेड, डक्समूड, अरमानो, व्हाडम व स्टॉनव्याक येथें जे मोठ निकराचे हल्ले केले त्या सर्वांतच त्यास अपयश आलें. रूबमरीन बोटी आता ब्रिटिश सरकारच्याही पुष्कळ तयार झाल्या असून त्यांची सरबत्ती सुरू होईल. तेव्हां शत्रूना समुद्रावरील वर्चस्व काय आहे याची खरी कल्पना येईल. शनैः शनैः ही लढाई चालू आहे खरी पण तिचा शेवट तहापर्यंत दोनचार महिन्यांत येईल असा जो कित्येकांचा समज आहे तो प्रस्तुतच्या स्थितीवरून आह्मांस सरळसा वाटत नाहीं

## गर्वोक्ति

[ हितवादाचा जो जो ]

मुलांना कित्येकदां हौस वाटते कीं आपण पुनः पाळण्यांत निजावें आणि जो जो बाळा कुळभूषणा हा मधुर पाळणा वडीलधारी गातांना आपण हस्यास्मित करावें. पण आपल्या नागपूरच्या 'हितवाद' पत्रकर्त्यांस हा पाळणा गाण्यास दुसरा कोणी लागतच नाहीं. मध्यप्रांतांत हें एकच वर्तमानपत्र स्वतंत्र विचाराचें आहे असें त्याच्या तिसऱ्या वर्षीच्या वाढदिवसाच्या गाण्याचें ध्रुवपद आहे. त्याच्या स्वतंत्रपणाचा ध्वज गेल्या दोन वर्षांत कोठेंच फडकताना आढळून आला नाहीं. नामदार गोखले हे या पत्राच्या चालकाचे स्वतंत्र सूर्य तेव्हां त्याचें सर्वच तेज 'हितवादांत' उतरलें तरी देखील प्रस्तुतच्या काळीं हितवाद करर्यांस स्वतंत्र' हें उपपद लावण्यापूर्वी पुष्कळदाच लेखणी माघारी घ्यावी लागेल. असो फाल्गुनाची गर्वोक्ती गोपालकृष्ण खरी मानो, पण हितवादाचें स्वयं स्वातंत्र्य हें खरोखर होईल तरी देखील आह्मांस मोठा आनंद वाटेल.

## वऱ्हाडवृत्त.

हवामानः- मकर संक्रांतीचें झोंबणारें वारे सुरू असून थंडी ही कडक पडते. तथापि प्रस्तुतच्या हवामानावरून ही थंडी फार दिवस टिकेल असें वाटत नाहीं. पुढील ऋतूचा हा सूचक संधिकाल आहे असें वाटतें. रोगराई नाहीं व आरोग्याची अभिवृद्धी आहे, ही परमेश्वराची कृपा होय

रा० रा० मुनिरोद्दीन हाजीचांद डेपुटी सुपरिंटेन्डन्ट आकोला यास कालपासून २ महिन्यांची हक्काची रजा देण्यात आली आहे.

रा. रा. ए. जी. डिक्स, स्पेशल डेपुटी, ट्रेनिंग कालेज, जबलपूर यांस रा. रा. इ. ए. म्यांकने यांच्या गैरहजिरींत वऱ्हाड सर्कलचे इनस्पेक्टर आफ स्कूल नेमण्यांत आल्याअन्वयें ते रुजू झाल्या नंतर रा. रा. काशीनाथ वामन कुळकर्णी आफि. इनस्पेक्टर हे पूर्ववत टेम्परारी असि. इनस्पेक्टर होतील.

इनस्पेक्टर आफ युरोपिअन स्कूल्स व इनस्पेक्टर आफ सायन्स या हुद्याची एक निराळी जागा स्टेट सेक्रेटरीकडून या प्रांतांतील शाळाखात्यासाठीं मंजूर करण्यांत आली आहे.

या नव्या मंजूर झालेल्या जागी रा. रा. आर. एच. बेकेट बी. एससी. यांस नेमण्यांत आलें.

आणि रा. रा. इ. बी. बी. किल्रो एम. ए. यांस असिस्टंट डायरेक्टर. विद्याखातें या हुद्यावर स्वतंत्रपणें नेमण्यांत आलें.

येत्या सोमवारीं स्थानिक कायदे कौन्सिलाची बैठक भरणार असून त्यावेळीं अलिशान नामदार चीफ कमिशनर सर राबर्टसन यांची स्वारी हजर राहणार आहे. या वेळीं अबकारी कायद्याचा खर्डा विचारासाठीं कौन्सिलांपुढें मांडण्यांत येईल.

मिडल व हायस्कुल स्कालरशिप परीक्षा फेब्रुवारीच्या ४ थे तारखेपासून सुरू होणार आहे.

**अबकारी इरास—** या जिल्ह्याचे वार्षिक दारू, आफू व गांजा यांच्या मक्त्यांचे हरास आकोल्यास ता. २२ फेब्रुवारी पासून सुरू होतील. हे कलाली मक्तेदार ह्मणजे सरकारी नारळाचीं झाडें आहेत तेव्हां फळभार घेताना झाडें जगतील असा उपाय अवश्य झाला पाहिजे.

वार रिलीफ फंडा करितां परतवाडा येथील रिक्रीयेशन क्लब करानें आयेडो (झुंझारराव) ह्या नाटकाचा प्रयोग ता० २।१।१९ रोजीं शहर एलिचपूर येथील बालेजी गणेश मंदिरात करून दाखविला. मे. कमिशनर साहेब व सर्व अधिकारी मंडळी नाटक पाहण्याला आली होती. नाटक चांगलें वठलें. माधवराव व झुंझारराव यांनीं आपलें काम फारच चांगलें केलें कमळजा सारजा व रंभाजीराव ह्यांनींही आपलीं कामें चांगलीं केलीं उत्पन्न खर्च वजाजातां अंदाज १०० रु० होईल.

रावसाहेब आबाजी रामचंद्र सावंत हे बेळगांवच्या 'श्रीरामतत्त्वप्रकाश' छापखान्याचे प्रसिद्ध मालक आहेत; त्यांस मिळालेल्या रावसाहेब किताबा बद्दल त्यांचें अभिनंदन करितांना आह्मी त्यांच्या विक्रीच्या पुस्तकांची माहिती सोबतच्या पुरवणींत देत असों तेव्हां तिकडे वाचकांचें लक्ष अवश्य जावें तितकें बरें

भारतनाट्य समाजाकडून सुवर्ण पदक मिळालेली

**महाराष्ट्र नाटक मंडळी**

आकोलें येथें श्रीराम नाटकगृहात

मंगळवार ता. १२ जानवारी सन १९१५

इसवी रोजीं रात्रौ

नवा खेळ! पौराणिक! नवा खेळ!

रा. कृ. म. खाडिलकर कृत

**सत्वपरीक्षा**

**( हरिश्चंद्र )**

हा एकच खेळ करून बाहेरगावीं जाणार.

त्र्यं. सि. कारखानीस

व्यवस्थापक.

**नोटीस**

**पाहिजे—** वणी तालुक्यांतील बीरकुंड इलाख्यासाठीं कामगार पाटलाचें काम करण्यास लायक असा विश्वासू इसम पाहिजे. पगार किती पाहिजे याचा खुलासा करून लायकीचे दाखल्या सह अर्ज खालीं सही करणाराकडे पाठवावा.

सही

अबदुल वाहीद अ० पा० क० आई

अलिमुन्निसा बेगम के० आफ०

खानसाहेब अबदुल अझीम

खान ओरिएंटल ट्रान्स्लेटर

नागपूर.

नो० नं० ३२

शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

संधिवात, फेंपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण,
प्लग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरीयनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचे प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून
वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ॥१२
वी. एच. जव्हेरियन कंपनी.
खलासीचकला. मुंबई.
नो. नं० २२


मांगलिक प्रसंगीं बक्षीस देण्याकरितां
सेंटचाराजा.

## ओटो—दील—चमन.

हें सर्वोत्तम सेंट मुद्दाम वापरण्यासाठीं हल्लींच्या फॅशनचें हें एकच होय. फक्त २—३ थेंब रुमालावर टाकल्यानें चमेलीच्या आणि बगीचांतल्या हजारों ताज्या फुलांइतका सुवास ८ दिवसपर्यंत टिकतो एका लहान बाटलींत हा सुगंधी पुष्पांचा भांडार आहे किं रु. -॥ ॥। व रु. २ ट. ख. वेगळा. सुवासिक कार्डे दिलचमनचीं दर डझनास रु. -॥। "

सेल एजन्टस. एच, आर. मोदी आणि कं.
नं. १० प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर, मुबई.

सतत ९० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला
दूषित रक्त शुद्ध करणारा




शरीराचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळ व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु. अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नक्कल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

मालक-- डा. गोतमराव केशव, आणि सन्‌
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २.

नो० नं २१

## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी
राजवंशी नवरत्न याकुती,
किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"
व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.
राजवंशी सांड्याचें तेल,
किंमत रुपये ५ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे अनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

परमा सायरप.

कमस्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध. एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस २॥ रुपया

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,
कबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० २४

## Oriental Government Security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs 4 CRORES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

## Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Extra Assunces. |
|---|---|---|
| | Rs | Rs. |
| 1888 | 8 668 | 2,63,38 000 |
| 1893 | 17,657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6 81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8 47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05,818 |
| | 3136,421 | 1,41,32356 |
| 1903 | [illegible] (9 | 2,10,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,2[illegible],79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

" At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL
Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
*C.P. Berar & Khandesh, Nagpur*

N. N. 25

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd NO. N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला——सोमवार तारीख १८ माहे जानेवारी सन १९१५ ई० [ अंक ३

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

सूचनाः— गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. पापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

WANTED smart and energetic men to work as agents in every town on very lucrative terms. Apply to :-
The National Indian Life Insurance Co. Ltd.,
166, Hornby Road - Bombay
No. No. 12

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्याक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक आकोला ९।९।०१ } J. G. Ridland. एजंट

नो. नं २

सतत ४२ वर्षे चाललेला कारखाना

**ए. जे. ह्यात्रे आणि सन् सुगंधी.**

ठि:--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर -- मुंबई.

एकच भाव! ! एकच भाव! !

खोटा सुरंगीं आमचेकडे मिळणारा माल ओढो सुरंगा

अत्तरें.- गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल, रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.- चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगंधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. दर बाटली ४ आणे.

अष्टगंधी अरगजा, १ तोळ्यास ४ आ ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना ( निरनिराळ्या सुवासाचा ) दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, केशर, गुलाबपाणी, मध, उदबत्ती, रंगीत पाट, दशावतारी गंजिफे, सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, भिंग्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटे व वेणींचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर मिळेल. व्यापाऱ्यांस सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हाल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. १

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारची सुबक व घाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन
रविवार पेठ नाशिक सिटी.
नो. नं. ४

### हिंदुस्थानावर आरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें आरिष्ट सदोदित लागलें आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं रु. १॥८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ॥४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज पांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ॥४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ५

## डायरी बक्षीस ! !

(१)खडे तात्विक बोल, भाग १ ला, किंमत ॥६. (२)खडे तात्विक बोल, भाग २ रा, किंमत ॥६. (३) धर्मपद, किंमत ४. (४) पांगारकरकृत एकनाथचरित्र, किंमत ५. (५) विदग्धवाङ्मय, किंमत ॥३. (६) आकोलें ( वऱ्हाड ) येथील साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष रा. हरिभाऊ आपटे यांचें भाषण, किंमत ॥२. ७ मुलांसथोडा उपदेश, किंमत ॥८. (८) वाल्मीकीचा जय, किंमत ॥८. (९) अण्णा किर्लोस्करकृत संगीत सौभद्र व संगीत शाकुंतल, किंमत प्रत्येकीं ॥१२. (१०) शिवलीलामृत किंमत ॥८. या यादीपैकीं आठ आणे किंमतीचीं पुस्तकें मागविणारास पुढील म्हणजे सन १९१५ ची, कापडी बायंडिंगची, भरपूर माहितीची, लहान [ पॉकेट ] डायरी बक्षीस मिळेल; व एक रुपया किंमतीचीं, पुस्तकें मागविणारास कापडी बायंडिंगची, भरपूर माहितीची मोठी डायरी बक्षीस मिळेल. टपालखर्च निराळा पडेल.

भट आणि मंडळी, पुणें शहर.
नो. नं ६

### अनायासें देवदर्शन.

नोटपेपर्सः— श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० प्रेमनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चौकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ॥८ व्हीपीनें ॥१२ दोन्ही मिळून किंमत रु. १ व्ही. पी. रु० १॥६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

**पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणॉसिटी**

नो. नं. ७

केशराचें फूल मुफ्त

पवित्र केशर ॥।= शुद्ध शिलाजीत ॥ असली कस्तूरी ३४ ममीरातिनती १ खालिस हींग ॥= तो० सुंदर कामदार शाल ३ व

$3\frac{1}{2} + 1\frac{1}{2}$ गज ६ से १०

काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२
नो० नं० ८

### अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमींट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, याच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरूज गजकर्ण, खवडा, इसब, मायटा, आगपैण, व्रण, चिखली, मुरी, ओली खाज, जखम, नखाविषयीं, तमाम रोगावर चालणारा १ च ' दिलखुष ' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पौष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं. १ रु० व डोळयांतील वेगळे सोडण्याचे औ. किं ४ आणे, वि० सु० पत्रद्वारें, वंग प्रवाळ हात भट्टीचे किं० तोळ्यास २ रु०

पत्ता – व्ही० आर० मुळे,
नांदुरा. जी० आय० पी०
नो० नं० ९

### नोटीस.

रा० रा० सविप्रसाद दुर्गाप्रसाद राहाणार मेळ जानोरी यांस हरकचंद गुलाबचंद मु० तेल्हारा यांजकडून नोटीस देण्यांत येते कीं तुम्ही आमचे पासून जी शेती पट्यानी वहीतीस केली आहे व त्या बद्दल पट्टेखत लिहून दिलें आहे यातील शर्तीचे विरुद्ध आपलें वर्तन चालू आहे. पट्याचे करारी प्रमाणें करार संपला तरी रकम आपण अद्याप आणून दिली नाहीं तरी या नोटिशीनें कळविण्यात येते कीं नोटीस पावल्या पासून १५ दिवसाचे आंत तुम्ही आमची पट्याची रकम चुकती करावी व शेती आपणा कडून वहीत होत नसल्यास आमचे ताब्यांत द्यावी व नुकसानीची रकम वगैरेचे बोलणे समक्ष दुकानी येऊन करावे तसे न केल्यास कायदेशीर तजवीज केली जाईल कळावे तारीख १-१-१५ इ०

सही.

हरकचंद गुलाबचंद दु० तेल्हारा
तर्फे नथुआपा गणापा

नो० नं० १५

## ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षातील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस-

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें—

## आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयां शिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात. नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणें.
नो० नं० १३

## जाहीरात

पाहिजे— न्यु इंडिया इन्शुरन्स ब्यांकिंग कंपनीचें काम करण्यासाठीं वऱ्हाड आणि खानदेशभर हुषार एजंट पाहिजेत. पगार किंवा कमीशन भरपूर दिलें जाईल विशेष माहिती करितां खालील पत्यावर अर्ज करावे.

विश्वनाथ विष्णू फडके चीफ एजंट
न्यु० इं० इं० कंपनी मुर्तिजापूर वऱ्हाड
नो नं ११

## नोटीस

पाहिजे— वणी तालुक्यांतील बीरकुंड इझाऱ्यासाठीं कामगार पाटलाचें काम करण्यास लायक असा विश्वासू इसम पाहिजे. पगार किती पाहिजे याचा खुलासा करून लायकीचे दाखल्या सह अर्ज खालीं सही करणाराकडे पाठवावा.

सही
अबदुल वाहीद अ० पा० क० आई
अझिमुन्निसा बेगम कें० आफ०
खानसाहेब अबदुल अझीम
खान ओरिएंटल ट्रान्स्लेटर
नागपूर.
नो० नं० ३२

## जाहिर नोटीस

हखी मर्द जानु बारी रा. आकोट रामटेकपुरा आणि मारुती वा। चिनकाजी बारी सुकदेव वल्द किसन बारी दामधर
या सर्वांसः—

खालीं सही करणार यांजकडून या जाहिर नोटीसीनें कळविण्यांत येते कीं माझा चुलता मयत जानु आणि माझा बाप महादाजी हे उभयतां सखे बंधु असून सर्व कुटुंब अविभक्त एकत्र होते आणि सर्व स्थावर जंगम जिनगीही एकत्र असून माझा चुलता जानुजी हा मरेपावेतों त्या समाईक जीनगीचा एकत्रांत उपभोग घेत आले. जानुजी मरण्यास अंदाज एक महिना झाला त्यानें आपलें मरण्यासमयीं मजला सांगितलें कीं मी नीपुत्रिक आहे. तरी तूं माझा पुतण्या असून मजला मुलाचे ठिकाणी आहेस जीनगी सर्व स्थावर जंगम एकत्र आहे तर माझे निम्मे हिस्याचे जीनगीचा तूं मालक आहेस. फक्त तुजला माझे सांगणें एवढेच आहे कीं तूं माझे मरणा नंतर क्रियाकर्म करावे माझे कर्ज द्यावे आणि माझ्या दोन विधवा नामे लग्नाची गुजी आणि पाटाची रुखी या दोघीना त्यांचे हयातीपावेतों अन्न वस्त्र द्यावे. त्यांची या समाईक आपल्या स्थावर जंगम इस्टेटीवर त्यांचे हयातीपावेतों अन्नवस्त्राशिवाय कोणतेच प्रकारचा वारस नहीं खरा कायदेशीर मालक वारसाचें नात्यानें तूंच आहेस असें सांगून मरणपावला. त्यानें सांगितल्याप्रमाणें मी तो मेल्यानंतर सर्व कर्ज ४९० रुपये फेडले. त्यांची क्रिया कर्में केलीं. आणि तुझा उभयता विधवांना अन्न वस्त्र देऊं लागलो. क्रिया कर्मांचे समयीं जे पंच दिवसावर होते त्यांनीं सुद्धां असें सांगीतले. या रितीनें मी चालत असून तूं शिवा रामजी दामदर बारी याचे नादानें आणि तुझे वरील दोन इसम पहिल्या घरचे मुलगे यांचे मतानें चालून माझ्या इस्टेटीची अफरातफर करण्यास सुरवात केली आहेस एवढेंच नाहीं तर माझा बैल रामजी माळी यांचें कोठ्यांत होता तो त्याचे कोठ्याचे कुलूप उघडून पाठीमागे सोडून नेला आणि दोन गाड्या नेल्या आहेस तर या नंतर नोटीसीनें तुजला कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या दिवसापासून दोन दिवसांत माझा बैल आणि गाडी दोन २ आणून द्यावी न आणल्यास मी तुजवर आणि वरील तिन इसमावर जबरीचे चोरीची फिर्याद करीन. दुसरे तूं कोणास माझे चुलत्याकडून मजपाशीं वारसाचे नात्यानें आलेल्या स्थावर इस्टेटीचे गहाण खरेदी बक्षीस पट्टा वगैरे कांहीं दस्तऐवज करून दिल्यास ते कायद्यानें रद्द असून त्यांचा बोजा या समाईक जिनगीवर राहणार नाहीं. मी तुझा उभयता विधवांना तुझी मजपाशी राहिल्यास तुमचे हयातीपावेतो अन्न वस्त्र देण्यास कबूल आहे ही नोटीस दिली सही
मु० आकोला ता० १३ १-१९१५ इ.

सही
रामजी वल्द महादाजी आसवार
बारी राहणार आकोट रामटेक-
पुरा याचे खुद हातची
नो. नं. ३६ नि० असे

## नोटीस

नोटीस बेशमी गणु वल्द संभा जात कुणबी आडनांव बतकी राहणार आष्टी प्रगणे भादक तालुके वल्हा जील्हे चांदा पोष्ट वल्हा यांस खालीं सहीकरणार इजकडुन नोटीस देण्यात येते कीं तूं माझा लग्नाचा नवरा असून लग्न झाल्यास सुमारे १८ अठरा वर्षे झालीं आहेत तेव्हां तू मला लहानपणीं आज्ञान असतांना चांगले प्रकारे वागविले. पुढें मी सज्ञान झाले वर कांहीं वर्षे पर्यंत तुझे घरीं असतांना मला दिसून आले कीं तूं संसारायोग्य नाहीं तरी मी तसीच राहीले असतांना तू सांगीतले कीं मी औषधी खातो करिता तुला तुझे बापाचे घरीं नेऊन पोहोचवितो त्या प्रमाणे मला तूं पोहोचविले पुढें तूं आजपर्यंत मला नेले नाहीं सबब मी कांहीं वर्षे बापाचे घरी राहून निरवाहा केला नंतर बापानी पोसले नाहीं सबब हली मामाचे घरी येऊन तीन वर्षे लोकांचें कर्ज काढून नीरवाहाकरीत आहे तरी ही नोटीस पावल्या पासून एक महिन्यात येऊन लोकांचे कर्ज घेतले आहे ते रुपये २९० अडीचसे तूं ज्याचे त्यास देऊन त्याची पावती मजला आणून द्यावी आणि तूं संसारायोग्य असलेबद्दल मे. सिविल सर्जन साहेब यांचे सर्टिफिकीट आणून मला द्यावे म्हणजे मी तुझे बरोबर तुझेघरी नांदण्यास तयार आहे. असें तुजकडुन वरील करारात न झालेसहीच फारकती समजून मी दुसरा पाटाचा नवरा करीन. मग तुझा नवरेपणाचा हक्क माझेवर किंवा पाट लावणार यावर ही राहणार नाहीं. करितां या जाहीर नोटीसीनें आगाऊ कळविलें आहे. रुपये नादिलेस दीवाणींत दावा करून भरून घेईन. ही नोटीस दिली असे कळावे तारीख ४।१।१५ ई. द. धोंडोसखाराम पेनशनर नाजर रा. वणी.

सही
सहीची निशाणी बांगडी मती मर्द
गणु जात कुणबी आडनाव
बतकी राहणार हलीं वाजरी
तालुके वणी हिचे हातची
असे द. धोंडोसखाराम
नो. नं. ३७

## नोटीस

नारायण वा॥ सखाराम झालीं राहणार पाथर्डी पोष्ट ता० आकोट जि० आकोला
यांस

खालीं सही करणार तानी मर्द नारायण झाली इजकडुन नोटीस देण्यांत येते कीं मी तुमची गंधर्वाची बायको आहे. सुमारें १ वर्ष झाले तुम्ही मला विनाकारण घराबाहेर मारहाण करून घालऊन दिले व परत बोलावीत नाहीं व येऊ देत नाहीं. मला खाण्या पिण्यास व कपडेलत्यास व इतर योग्य खर्चास पैसेहि तुम्ही पाठवीत नाहीं मला आजपर्यंत सदर्हु बाबींत ४०० रुपये कर्ज झालें आहे. तरी या नोटिसीनें तुम्हाला कळविण्यांत येते कीं ही नोटीस पावल्या पासून आठदिवसाचे आंत मला ४०० रुपये पाठवून द्यावेत व मला घरीं नेऊन नीट बायकोच्या नात्यानें वागवावे. घरी वागवीत नसल्यास मला दरमहा योग्य रकम खर्चा करितां द्यावी. अगर फारकत द्यावी. वर तुम्ही सदर्हु आठ दिवसाचे मुदतीचे आंत रुपये ४०० पाठविले नाहींत तर कायद्याप्रमाणें या नोटीसीचे खर्चासुद्धा रक्कम वसूल करावी लागेल. त्याचप्रमाणें मला घरीं न नेले अगर दरमहा कांहीं खर्चाकरितां पैसे न दिले तर तुमचा इथूनपुढे नवरेपणाचा कोणताही हक राहणार नाहीं व मी जर दुसरे मोहतीर लावले तर तुम्हांस कांहीं हरकत आणतां येणार नाहीं कळावें. ही नोटीस ता० ११।१।१९१५

सही
तानी मर्द नारायण झाली इचा अंगठा
नो० नं० ३८

वऱ्हाडसमाचार

मिति माघ शुद्ध ३ शके १८३६

## मुलांचीं खेळणीं.

बाजारांत सहज एखाद्या बोहऱ्याच्या दुकानाकडे नजर फेकावी म्हणजे दृष्टीस पडेल कीं त्या दुकानांतल्या मालाचा बराच सा भाग म्हणजे स्टेशनरी सामान व मुलांचीं खेळणीं हा असतो, व हीं दोन्ही बहुधा जर्मनी किंवा आस्ट्रिया या देशांतून विशेषतः आलेलीं असतात आज आम्हांस स्टेशनरी मालासंबंधानें लिहावयाचें नाहीं. त्या विषयाचा काथ्याकूट आजपर्यंत अनेक वेळां झालेला आहे. पण मुलांच्या खेळण्यासंबंधानें पुष्कळ उपयुक्त माहिती हिंदुस्थानसरकारच्या अविश्रांत श्रमानें मुद्रितीच उपलब्ध झालेली असल्यामुळें तिच्या आधारानें पुढील चार शब्द लिहिण्याचें योजिलें आहे. पूर्वी आमच्या देशांत लहान मुलांचीं खेळणीं समळीं इकडेच तयार होत असत. लहान मोठे चेंडू, खुळखुळे, मुलींच्या वरकुलांतलीं स्वयंपाकाचीं व इतर भांडीं, भावल्या, विटीदांडू, रंगीत लाकडाचीं बोळकीं, वगैरे खेळाच्या जिनसासाठीं पुणें, नाशिक, सांवतवाडी, काशी, वगैरे कित्येक शहरें प्रसिद्ध होतीं. त्यावेळीं या जिनसाचा खप किती होत असे या बद्दलचे आंकडे उपलब्ध नाहींत, तरी हा खप फार दांडगा असे हें प्रत्येकजण स्वानुभवावरून सांगेल. पण मुलांचीं खेळणीं तयार करण्याचा आमच्या देशी कारखानदारांचा हा उद्योगधंदा अगदीं बसल्यासारखा झाला आहे. आतां मुलांच्या या खेळण्याची जागा परदेशी रबरी चेंडू, काचेच्या किंवा चिनी मातीच्या भावल्या, स्प्रिंगनें चालणाऱ्या आगगाड्या, मोटार, तारेचीं केलेलीं विलक्षण कोडीं, नाना प्रकारचे हातानें व तोंडानें वाजविण्याचे वाजे इ. जिनसांनीं पटकाविली आहे. आणि हिंदुस्थानाला हीं खेळणीं पुरविण्याचा मक्ता जर्मनी, ब्रिटन, जपान, आस्ट्रिया वगैरे परदेशांनीं घेतला आहे. दरसाल सुमारें ३६॥ लक्ष रुपयांचीं परदेशी खेळणीं हिंदुस्थानांत खपत आहेत. यांतलीं जवळ जवळ निम्मी म्हणजे १०॥ लक्ष रुपयांचीं खेळणीं एकट्या जर्मनींतून इकडे येतात; ब्रिटनमधून सुमारें सत्

सहा लक्षांची जपानांतून ९ लक्षांची व इतर १॥। लक्षांची, असें १९१४ सालच्या मार्च अखेर प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टांतल्या आंकड्यांवरून कळतें. जर्मनी व आस्ट्रिया या दोन शत्रूच्या देशांतला हा माल इकडे येऊं द्यावयाचा नाहीं असा बंदोबस्त सरकारनें केला आहे; पण येवढ्यानें भागत नाहीं. असा माल हिंदुस्थानांतल्या हिंदुस्थानांत तयार होईल अशी कांहीं तजवीज झाली पाहिजे, आणि तीं कार्य ह्मणजे मुष्किलीचें आहे असें नाहीं. या खेळण्यांतले पुष्कळ जिन्नस केवळ हस्त काशल्याचे असतात. त्यांना मोठाल्या कारखान्यांची किंवा यंत्र सामुग्रीची गरज लागत नाहीं असलीं खेळणीं इकडे होण्यास नाहीं अडचण वस्तुतः पडूं नये. उदाहरणार्थ, भावल्या घ्या. या भावल्यांचीं तोंडें चिकट मातीचीं, रबराचीं, किंवा चिनी मातीचीं असून, पाय लाकडाचे, आणि पोटांत एखादी स्प्रिंग व भुसा असतो. यांपैकीं कोणता जिन्नस येथें होण्यासारखा किंवा मिळण्यासारखा नाहीं. या भावल्यांच्या किंमती १ आण्यापासून ३ रुपयांपर्यंत असतात, व जर्मनीसारख्या लांब देशांतून ऊन ही इकडच्या व्यापाऱ्यांना शेकडा ३० प्रमाणें कमिशन देण्यास परदेशी कारखानदारांना परवडतें. कलकत्यास चिनी मातीचे पदार्थ करण्याचा कारखाना आहे. तेथून भावल्यांचीं तोंडें करवून मागविलीं तर बाकीचे अवयव कोणाही अडाणी कारागिराला सुद्धां तयार करता येतील, आणि कोणी व्यापाऱ्यानें मनावर घेतल्यास भावल्या परदेशाहून आणण्याचें काम पडणार नाहीं. तशीच रबराच्या चेंडूची ही गोष्ट आहे. सीलोनमध्यें रबर पुष्कळ होतें. चेंडू करण्याचा एक सांचा आणविला कीं एखाद्या पोराला ही चेंडू करून दिवसाचे शेंपनास चेंडू करून पांच चार आणे कमाई करतां येईल. बारीक तारेची खेळणीं करण्यास केवळ डोकें त्यांत घालण्याची अवश्यकता आहे या पलीकडे त्यांत कांहीं नाहीं. कांचेचीं खेळणीं आमच्या देशांतल्या कांचेच्या कारखान्यांना सहज काढतां येतील. तळेगांवदाभाडे येथील कांचेच्या कारखान्यांतल्या कांचेच्या रंगीबेरंगी गोट्या तयार झालेल्या आह्मीं स्वतः पाहिल्या आहेत. त्या परदेशी मालाची बरोबरी करण्याइतक्या चांगल्या आह्मांस दिसल्या. आमच्याइकडे माल चांगला निघेल. मात्र या उद्योगास तुच्छ न मानतां त्यांत शिरण्याचें धाडस कोणीं केलें पाहिजे व माल खपविण्यासाठीं हुशार फिरते एजंट पाहिजेत इतकेंच, या उद्योगाला फारसें भांडवल नको, यंत्रसामुग्री नको, किंवा खप होईल कीं नाहीं याची शंका ही नको. वाण नुसती प्रयत्नाची आहे. प्रथम खेळणीं तयार करण्याची पद्धति दाखवून देणारे दहा पांच हुशार कारागीर सरकारनें विलायतेहून किंवा जपानांतून आणवून आमच्या कारागिरांना मार्ग दाखवून द्यावा ह्मणजे झालें. सरकारनें निरनिराळ्या उद्योगधंद्यांची माहिती पुरविण्याचा स्तुत्य उपक्रम केला आहेच. त्यांत आणखी एक पाऊल पुढें टाकून हुशार कारागीर लोकांना शिक्षण देण्यासाठीं आणविण्याची तजवीज करावी, ह्मणजे देशी लोकांना उद्योग प्राप्त करून दिल्याचें श्रेय त्यांना मिळेल व हिंदुस्थानचे लोक सदैव त्यांचे उपकार बद्ध राहतील.

## श्रीकृष्णाचा काळ.

श्रीकृष्ण एक होते, दोन होते कीं तीन होते हा प्रश्न डा. सर रामकृष्णपंत भांडारकर यांच्या शैवधर्म व वैष्णवधर्म या पुस्तकानें प्रथम उपस्थित केलेला नाहीं. पंचवीस वर्षांपूर्वी सुप्रसिद्ध बंगाली कादंबरीकार बाबू बंकिमचंद्र चटर्जी यांनीं आपल्या कृष्णचरित्र नांवाच्या पुस्तकांत भगवद्गीतेचा श्रीकृष्ण निराळा व भागवतांतला रंगेल श्रीकृष्ण निराळा असें सप्रमाण दाखविलें होतें. तथापि यावरून सुद्धां श्रीकृष्णाच्या काळाचा निर्णय होत नाहीं. तो करण्याचें एक साधन अलीकडे एका पंडितानें दाखविलें आहे. तो ह्मणतो कीं हें साधन ह्मणजे ऐतरेय ब्राह्मण हें आहे. परीक्षित राजानें नकळत फेंकलेल्या बाणानें श्रीकृष्णाचा देहांत झाला ही कथा सुप्रसिद्ध आहे. या परीक्षिताचा मुलगा जनमेजय व त्यावेळचे कांहीं ब्राह्मण यांच्या मध्यें कांहीं वाद पडला होता व या वादाची हकीकत ऐतरेय ब्राह्मणामध्यें आहे. अर्थात श्रीकृष्णाचा काळ ह्मणजे ऐतरेय ब्राह्मणाच्या रचनेच्या अगोदरचा असला पाहिजे. इसवी सनानंतर श्रीकृष्णाचा अवतार झाला असें ह्मणणारांचा वाद या रीतीनें निरर्थक आहे हें स्पष्ट दाखवितां येईल. ऐतरेय ब्राह्मणाचा काळ संस्कृत भाषेच्या निरनिराळ्या काळच्या नमुन्यांच्या तुलनेनें नक्की काढतां येईल, व अशा ऐतिहासिक पद्धतीनें पाहूं गेल्यास श्रीकृष्णाचा काळ काढतां येण्यासारखा आहे.

## हिंदु युनिव्हर्सिटी

हिंदुस्थानसरकारच्या शिक्षण विभागाचे सेक्रेटरी सर हरकोर्ट बटलर यांनीं हिंदु युनिव्हर्सिटी कमिटीचे अध्यक्ष दरभंग्याचे महाराज यांना पाठविलेले पत्र नुकतेंच प्रसिद्ध झालें आहे. त्यावरून ही युनिव्हर्सिटी व सरकार यांच्यामध्यें कित्येक बाबीसंबंधानें उत्पन्न झालेल्या वादाचा समाधानकारक निकाल लवकरच लागेल अशी आशा वाटूं लागली आहे. संयुक्त प्रांताचे अधिपति हेच या युनिव्हर्सिटीचे चान्सेलर असले पाहिजेत असा सरकारचा प्रथम आग्रह होता पण तो आग्रह आतां त्यांनीं सोडून दिलेला दिसतो. आतां त्यांचें ह्मणणें आहे कीं युनिव्हर्सिटीनें पाहिजे तो चान्सेलर नेमावा, पण व्हाइसराय साहेब युनिव्हर्सिटीचे संरक्षक व संयुक्त प्रांताचे अधिपति तिचे दर्शक राहावेत. चान्सेलर, व्हाइसचान्सेलर, प्रोफेसर, परीक्षक वगैरे नेमण्याचे सर्व अधिकार युनिव्हर्सिटीला देण्यास ही सरकारकडून हरकत नाहीं. फक्त कांहीं नेमणुकांना सरकारची मंजुरी लागेल व व्हाइसराय आणि संयुक्त प्रांताचे अधिपति यांच्या हातांत कांहीं विशेष अधिकार राहतील. हे विशेष अधिकार कोणते व त्यांच्या मर्यादा ठरविण्याचें काम युनिव्हर्सिटी बद्दलचें बिल स्टेट सेक्रेटरी साहेबापुढें जाईल त्या वेळीं नक्की करण्यात येतील. ही बाब गुलदस्तांत आहे तों पर्यंत युनिव्हर्सिटीचें तारूं वादळांतून मुक्त झालें असें जरी ह्मणतां येत नाहीं, तरी तूर्त बिलाचा मुक्काम गांठण्याइतका तरी युनिव्हर्सिटीचा रस्ता मोकळा झालेला आहे यांतच आनंद मानला पाहिजे.

## कागदाच्या पेनसिली.

हिंदुस्थानांत शिक्षण प्रसारा बरोबर कागद, पेनसिली, टाक वगैरे स्टेशनरी सामानाचा खप झपाट्यानें वाढत आहे. सन १९०९ सालीं ४८ लक्ष ३० हजार रु० चें स्टेशनरी सामान बाहेरून हिंदुस्थानांत आलें होतें. तेंच १९१३ सालीं ७० लक्ष ९३ हजार रुपये किंमतीचें आलें. या स्टेशनरी सामानापैकीं बहुतेक पेनसिली जर्मनी व आस्ट्रिया या दोन देशांतून आल्या. पेनसिलीसाठीं लागणारा शिशासारखा काळसर दिसणारा ग्रेफाईट नांवाचा पदार्थ हिंदुस्थानांत फारच कमी पैदास होतो. इकडे फक्त त्रावणकोर संस्थानांत या पदार्थाची खाण आहे, व ती ही एका इंग्रज कंपनीचे हातीं आहे. या खाणींतून निघणारा ग्रेफाईट ही पेनसिलीला असावा तसा नाहीं. तिनवेली जवळही अशीच एक खाण सांपडली असल्याचें कळतें. पण तिचें काम अद्याप सुरू झालें नाहीं. छत्तीसगड संस्थानांत कालाहंडी येथें या पदार्थाची खाण सापडण्याचा संभव आहे. या ठिकाणचे कांहीं नमुने विलायतेस पाठविण्यांत आले होते, पण ते नापसंत ठरले. डालटनगंज व लोहारडांगा येथें ही थोडासा ग्रेफाईट सापडतो. पण तूर्त तरी पेनसिलीसाठीं लागणारा सगळा ग्रेफाईट युरोपांतून मागवावा लागतो. येथें पेनसिलीचे कारखाने काढण्यास दुसरी अडचण लाकडाची आहे. पण लाकडाच्या ऐवजीं कागद गुंडाळलेल्या पेनसिली इकडचे कारखानदार काढूं लागले तर ही अडचण दूर होण्या सारखी आहे. तसें झालें असतां किंमतींत सुद्धां हिंदी पेनसिली जर्मनी किंवा जपानी पेनसिली इतक्या स्वस्त देतां येतील.

## बोर्डिंगची पद्धति.

पाश्चात्य राष्ट्रांची नक्कल करणें येवढेंच काम हिंदुस्थानानें आपल्याकडे घेतलें आहे. असें दिसते. आमचे सुशिक्षित लोक पाश्चात्यांच्या चालरीतींचें अंध अनुकरण करून आपला कसा घात करून घेत आहेत व निरनिराळ्या खर्चाच्या बाबी समाजांत रूढ करून अगोदरच दारिद्र्यानें पीडलेल्या आपल्या देशाला दारिद्र्याच्या खोल गर्तेंत ढकलण्यास कसे साह्य करीत आहेत हें आह्मी अनेक वेळां टीकेची पर्वा न बाळगतां स्पष्टपणें दाखविलेंच आहे. आमचे सरकारही शिक्षणाच्या बाबतींत असेंच अनुकरणप्रियता दाखवीत असते. इंग्लंडात शाळांना जोडून बोर्डिंगें आहेत ह्मणून आमच्या इकडे ही शाळांना जोडून बोर्डिंगें काढण्यावर अतोनात पैसा खर्च होत असतो. पण खुद्द इंग्लंडांत या बोर्डिंगांच्या उपयुक्तते संबंधानें अनुभवी व विद्वान लोकांच्या मतांत कसें अंतर पडलें आहे हें पाहणें असेल तर यंदाच्या सालीं ब्रिटिश असोसिएशनच्या शिक्षणशाखेचे अध्यक्ष प्रो० पेरी यांनीं केलेलें भाषण लक्षपूर्वक वाचा. ते ह्मणतात कीं बोर्डिंगांत पुष्कळ वर्षें राहिल्यानें विद्यार्थ्यांच्या बुद्धिमत्तेचा, व विचार शक्तीचा ऱ्हास होत चालला असून त्यांची अध्यात्मिकता तर अजिबात नष्ट झाली आहे. त्यांची वाचनाविषयींची आसक्ति अभ्यासाची संवय, विचार करण्याचें वळण, कुटुंबाविषयींचें प्रेम हीं जाऊन त्यांच्या जागा खेळाडूपणा, मनाची चंचलता, अनुकरण प्रियता, आणि स्वतःविषयींची आढ्यता, इत्यादि हानिकारक गोष्टी पटकावीत आहेत. गरीब देशांना तर ही पद्धति अधिकच हानिकारक आहे असें प्रो० पेरी हे स्पष्टपणें सांगत आहेत. कारण कीं बोर्डिंगमध्यें चैनीनें राहण्याची चटक लागलेल्या मुलांना घरीं गरीबीनें व काटकसरीनें राहणें आवडत नाहीं, इतकेंच नाहीं तर आपल्या दरिद्री देशबांधवांविषयीं सहानभूतिही वाटेनाशी होते. यासाठीं हिंदुस्थानांत पूर्वी जशी घरीं राहून विद्या शिकण्यापुरतें तेवढें शाळेंत जाण्याची पद्धति असे व अजून ही पुष्कळअंशी आहे तीच पद्धत उत्तम असें प्रो० पेरी यांनीं निक्षून सांगितलें आहे. इकडे प्रो० पेरी साहेब इंग्लंडच्या लोकांना बोर्डिंगापासून होणाऱ्या हानिपासून सावध राहण्याविषयीं आक्रोशानें सांगत आहेत, आणि त्याचवेळीं हिंदुस्थानांत पहावें तर सरकार प्रत्येक हायस्कुलाला जोडून बोर्डिंग स्थापण्याविषयीं जोराचे प्रयत्न चालवीत आहे. हा विरोध किती गमतीचा आहे!

## विद्यार्थ्यांची वाढती संख्या.

गेल्या दहा बारा वर्षांत शाळांत शिकणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या भराभर वाढत चाललेली पाहून हायस्कुलांतून अमक्या संख्येच्यावर विद्यार्थी घेण्यांत येऊं नयेत असे निर्बंध सरकारी अधिकाऱ्यांनीं घातले आहेत. पण आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं इंग्लंड व जपान यासारख्या देशांतून असे निर्बंध मुळींच नाहींत! आमच्या इकडे विद्यार्थ्यांची संख्या ९०० च्यावर गेलेलीं हायस्कुलें फारशीं नाहींत. पण तेंच इंग्लंडमध्यें पहा बेडफर्ड ग्रामर स्कूलमध्यें ७४०, चार्टर हाउस स्कूलमध्यें ६८०, चेल्टनह्याममध्यें ६७१, सेंटपॉलस मध्यें ६००, ईटन मध्यें १००० वर व बर्मिंगह्याम एडवर्ड स्कूल मध्यें तर २८०० विद्यार्थी आहेत! जपानचीं अशीं उदाहरणें देतां येतील. हे दोन्ही देश संपन्न आहेत. शाळेंत विद्यार्थ्यांची संख्या ज्यास्त होण्याने नुकसान होतें अशी खरी स्थिति असती तर या देशांनीं शाळांची संख्या खास वाढविली असती. पण तसें न करतां त्यांनीं विद्यार्थ्यांच्या संख्येला कोणत्याही प्रकारचा निर्बंध घातलेला नाहीं. आणि आमच्या दरिद्री हिंदुस्थानांत मात्र शाळांची संख्या वाढवा, नाहीं तर मुलांना खुशाल अज्ञानांत ठेवा, पण एका शाळेंत पुष्कळ मुलांची गर्दी आह्मी होऊं देणार नाहीं असें निष्ठुरपणानें सांगण्यात येतें यांतला अर्थ आह्मांस खरोखर समजत नाहीं.

## साहित्यसंमेलनास एक सूचना.

यंदाचें साहित्यसंमेलन मुंबई येथें शिमग्याच्या सुटींत भरण्याचें ठरलें असून

त्याबद्दलचें आहिरनिमंत्रणही साहित्य परिषदेच्या चालक मंडळीच्या सह्यानें प्रसिद्ध झालें आहे. या मंडळींत चांगलीं कर्तृत्ववान्, वजनदार, आणि साहित्याविषयीं आस्था व कळकळ बाळगणारे लोक आहेत. तथापि आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं आमच्यांत श्री. सौ. गिरिजाबाई केळकर, श्री. सौ. काशीबाई कानिटकर व श्रीमती रमाबाई रानडे यांच्या सारख्या विदुषी व ग्रंथकर्त्या स्त्रिया असतां त्यांच्यापैकीं एकीचेंही नांव परिषदेच्या चालकांतच काय, पण परिषदेच्या मेंबरांत मुद्दां दिसत नाहीं. ही चूक मुद्दाम झालेली नाहीं अशी आमची खात्री आहे, आणि यंदा तरी ती सुधारण्यांत यावी ह्मणून आह्मी मुद्दाम ही सूचना करीत आहों, स्त्रियांना सार्वजनिक बाबतींत सहकारी ह्मणून घेण्यानें कोणत्याही सार्वजनिक चळवळीचें हितच होईल. विशेषतः साहित्यासारख्या कामांत स्त्रिया अनुभवानें अधिक उपयुक्त ठरतील अशी आमची खात्री आहे. तेव्हां यंदा परिषदेनें एक दोन प्रमुख स्त्री लेखकांस परिषदेच्या चालकमंडळींत अवश्य घ्यावें. त्या योगानें सन्माननियांचा सन्मान केल्यासारखें होऊन परिषदेच्या कामालाही स्त्रियांकडून सहानुभूति व सहकारित्व याचा लाभ घडेल.

---

## देशी संस्थानिक.

सध्याची लढाई संपून पुनः शांतता प्रस्थापित होईल तेव्हा लॉर्ड मोर्ले साहेबांनीं ज्याला ‘खरें ब्रिटिश साम्राज्य’ असें नांव दिलें आहे त्या हिंदुस्थानच्या राजनिष्ठेचा व सहकारितेचा कोणता मोबदला ब्रिटिश राष्ट्राकडून मिळणार आहे हें एक परमेश्वरच सांगू शकेल. न्यायाच्या दृष्टीनें पाहिलें तर हिंदुस्थानांतली ब्रिटिश राजनिती पार बदलून ती थेट आस्ट्रेलिया किंवा कानडा यासारख्या वसाहतींतल्या राजनीती सारखी व्हावयास पाहिजे. हत्याराचा कायदा रद्द व्हावयास पाहिजे, नेमणुका करतांना काळा व गोरा हा भेद दृष्टीआड व्हावयास पाहिजे. अशा शेकडों गोष्टी आहेत. विशेषतः ज्यांनीं आपला खाजिना, फौजा, फार काय पण स्वतःचे प्राण व त्यांच्याही पलीकडे प्रिय असलेल्या आपल्या युवराजांचे प्राण ब्रिटिश साम्राज्याच्या रक्षणार्थ धोक्यांत घातले अशा देशी संस्थानिकांची इज्जत वाढली पाहिजे. त्यांना हिंदुस्थान सरकारनें आपले मसलतगार नेमिले पाहिजे व त्यांच्या सल्ल्यानें राज्य चालविलें पाहिजे. मात्र ही सूचना करतांना एका गोष्टीवर आह्मी विशेष जोर देतों. ती ही कीं ब्रिटिश अंमलाखालच्या प्रजेसंबंधाच्या गोष्टींत यः संस्थानिकांची सल्ला सरकारनें घेऊं नये. कारण, त्या रयतेची स्थिति व सुखदुःखें यांची संस्थानिकांना कांहीं माहिती नसते. लॉर्ड मिंटो साहेबाच्या कारकीर्दींत या गोष्टीचा अनुभव आलाच आहे. ब्रिटिश अंमलाखालचें सारें सुशिक्षित हिंदुस्थान वर्तमानपत्राच्या मुस्कुटदाबीचा कायदा नको असा आक्रोश करीत असतां घी शक्कर खाऊं हे संस्थानिक वस्तुस्थितीच्या अज्ञानामुळें किंवा खरी सल्ला देण्यात लागणाऱ्या मनोधैर्याच्या अभावामुळें भलती सल्ला देण्यास कसे प्रवृत्त झाले व त्याचा परिणाम ब्रिटिश प्रजेस कसा अद्याप भोगावा लागत आहे ते लोक अद्याप विसरले नाहींत. ब्रिटिश रयतेची सुखदुःखें त्या रयतेच्या सुशिक्षितांसच अधिक ठाऊक असणार. या संस्थानिकांची सल्ला घ्यावयाची ती देशी संस्थानें व हिंदुस्थानें सरकार यांच्या मध्यें उपस्थित होणाऱ्या प्रश्ना पुरती घ्यावी येवढी खबरदारी घेणें अवश्य आहे.

---

## एक अप्रकाशित ऐतिहासिक चरित्र.

हिंदुस्थानच्या इतिहासरूपी महासागराच्या तळाशीं लोकांना अज्ञात अशीं अद्याप किती तरी दिव्यरत्नें आहेत! त्यां पैकीं एक नुकतेंच मि. हिल नांवाच्या एका युरोपियन लेखकानें प्रकाशात आणिलें आहे. युसफखान नांवाच्या एका शूर शिपायाचें नांव आर्मे साहेबांनीं लिहिलेल्या हिंदुस्थानच्या इतिहासांत जागोजाग आलेलें आहे. पण याचें हृदयंगम चरित्र फारच थोड्यांना विदित असेल. हा कर्नाटकांत एका अगदीं गरीब कुळांत जन्मला होता, पण आपल्या अंगच्या कर्तृत्वाच्या जोरावर एका प्रांताचा सुभेदार कर्नाटकातील युद्धाच्या प्रसंगीं झालेला होता. याला दैवाची अनुकूलता मिळती तर हा हैदरअल्ली प्रमाणें मूर्धाभिषिक्त राजा झाला असता, पण दैव फिरल्यामुळें बंडखोराप्रमाणें फांशीची शिक्षा त्याला भोगावी लागली. हा मूळ धर्मानें हिंदु होता. तरुणपणीं उनाड स्वभावानें घरांतून पळून जाऊन तो मुसलमान झाला, व मग अगोदर फ्रेंचांच्या व नंतर कर्नाटकाच्या नबाबाच्या सैन्यात शिपाई झाला. १७५१ मध्यें तो ईस्ट इंडिया कंपनीच्या चाकरीस राहून सुभेदारीच्या हुद्यापर्यंत चढला. क्लाइव्ह साहेबानें त्याची हुशारी पाहून सगळ्या देशी फौजेचा सेनापति त्याला केलें होतें. त्याच्या कर्तृत्वाबद्दल व इमानदारीबद्दल कंपनी कडून त्याला पदक ही मिळालें होतें. पुढें तो मदुरा व तिनवेल्ली या प्रांताचा मुलकी व लष्करी मुख्य अंमलदार झाला. हैदरअल्लीनें त्याच्यामुलुखांत गडबड मांडली होती तरी त्यानें फार शहाणपणानें व कडक शिस्तीनें लोकांना शांततेंत ठेविलें होतें. यानें हिंदु व मुसलमान यांच्यांत एकोपा राखिला होता. यानें लाली सारख्या फ्रेंच गव्हर्नराला पुरेपुरे करून सोडलें होतें. पण याचें आणि कर्नाटकाच्या नबाबाचें सूत नव्हतें, आणि पुढें जेव्हां कंपनीनें युसफखानाला नबाबाच्या दिमतीस दिलें तेव्हां मात्र तो बिथरला. एव्हापासून तो बंडखोर सुभेदार या नांवानें प्रसिद्धीला आला. त्यानें फ्रेंचांशीं कारस्थान सुरू केलें. फ्रेंचांची मदत घेऊन त्यानें ब्रिटिश निशाणाचा अपमान केला. दोन वर्षे पर्यंत त्यानें इंग्रज सैन्याला दाद दिली नाहीं, आणि शेवटीं एका मित्राच्या दगलबाजीमुळें तो इंग्रजाच्या हातीं लागला. तेव्हां इंग्रजांनीं त्याला १५ आक्टोबर १७६४ रोजीं सुळावर चढविलें. त्याच्या मृत्यूनंतर कित्येक वर्षेपर्यंत त्याचें नांव कर्नाटकांत सर्वतोमुखीं राहिलें होतें. त्याचा पुनरुद्धार आतां १५० वर्षांनीं मि० हिल यांनीं त्याचें इंग्रजीत चरित्र लिहून केला आहे.

---

## सध्याचें महायुद्ध.

सध्याच्या महायुद्धाची मौज हीच आहे की एकाच वेळीं परस्पर विरुद्ध बातम्या कानीं येऊन मनुष्य अगदीं भांबावून जातो. इकडे लॉर्ड किचनेरसारखे युद्धशास्त्र विशारद हें युद्ध निदान तीन वर्षे चालेल असें भाकीत करीत आहेत, तर त्याच वेळी जर्मनीजवळचा धान्यकोश व द्रव्यकोश दोन्ही संपले, आतां त्याला तहाचें बोलणें लावण्याखेरीज गत्यंतर नाहीं अशा बातम्या ही मधून मधून उठतात. नुकतीच खबर आली आहे कीं फ्रान्स व रशिया यांच्याशीं स्वतंत्र तह करण्याविषयींचें कारस्थान जर्मनीनें सुरू केलें आहे! या बातमीवर कोणाचा विश्वास बसत असेल तो बसो, पण सुप्रसिद्ध वजनदार फ्रेंच पत्र टेम्स यानें या कारस्थानाविषयीं संतापून जे उद्गार काढले आहेत त्यांवरून फ्रान्स या कारस्थानाला बळी पडेल असा संभव दिसत नाहीं; आणि ब्रिटिश राष्ट्राच्या बळाविषयीं या पत्रानें जें ह्मटलें आहे तें ही खरें आहे. फ्रान्स आणि रशीया हीं दोन्हीं राष्ट्रें तह करण्यास कबूल झालीं व इंग्लंडशीं त्यांनीं बेइमानीपणा केला ही गोष्ट घटकाभर कल्पिली तरी एकटें ब्रिटन आरमारी युद्धांत जर्मनीला पुरून उरेल, आणि व्यापारासाठीं जर्मनीचीं बंदरें खुलीं करून घेण्याची जर्मनीची आशा विफलच राहील यांत शंका नाहीं. मग तहाच्या गोष्टी करून जर्मनी आपल्या तोंडाची वाफ कां दवडीत आहे असें टेम्स पत्रानें विचारलें आहे तें अगदीं योग्य आहे.

---

प्रस्तुतच्या युद्धांतला दुसरा विशेष हा आहे कीं यांत दोन्ही पक्षाच्या सरदार व उच्च घराण्यांतली तरुण पिढी नाश पावत आहे. एका इंग्लिश पत्रानें असें ह्मटलें आहे कीं ज्याचा निदान एक तरी तरुण पुरुष आतांपर्यंत या युद्धांत गमावला किंवा जखमी अगर कैद झाला नाहीं असें एकही सरदार घराणें नाहीं. फ्रेंच प्रेसिडेंट पाइनकारी, इटलीचा सुप्रसिद्ध देशभक्त ग्यारिबाल्डी, खुद्द जर्मन बादशहा, लॉर्ड रॉबर्टस, लॉर्ड हार्डिंज, लॉर्ड वेलिंग्टन, ॲस्किथ, वगैरे बड्याबड्या पुरुषांच्या घराण्यांना थोड्या फार अंशानें या युद्धाचा चटका लागलेला आहे.

---

हिंदुस्थानच्या लोकांनीं शौर्याबद्दलचा लौकिक अद्याप कायम राखला आहे. बिकानेरच्या महाराजांच्या उंटाच्या पलटणीनें मोठा पराक्रम केल्याबद्दल युद्धखात्याकडून महाराजांना अभिनंदनपर पत्र आलें आहे.

गेल्या आठवड्यांत युद्धक्षेत्राच्या पश्चिम सीमेवर विशेष हालचाल झाली नाहीं. जर्मन सैन्यानें केलेले हल्ले परतविण्यांत आले. तथापि युद्ध जोरानें चाललें आहे यांत शंका नाहीं. रोज हजार पांचशें बळी देऊन दहापांच यार्ड जागा हस्तगत झाली तर त्यांतच धन्यता मानण्याचा प्रसंग युद्धांत गुंतलेल्या राष्ट्रांना यावा हें कांहीं युद्धाच्या सौम्य स्वरूपाचें लक्षण नव्हे. पूर्व हद्दीवर रशियाची खोड जिरविण्याचा जर्मनीचा कृतनिश्चय कायम दिसतो. पण त्याचें प्रत्यक्ष फळ मात्र कांहीं दिसत नाहीं. बेलग्यममध्यें असा पावसानें कहर मांडला आहे आणि खंदकांतलें पाणी पंपानें उपसून टाकतां टाकतां उभय पक्षास पुरेवाट झाली आहे, तशी पूर्व हद्दीवर थंडीची उग्रता अतिशय तापद झाली आहे. आस्ट्रियानें तर आपण संयुक्त राष्ट्रांच्या सैन्यापुढें हात टेकले अशी कबुली स्वतःच्याच तोंडानें दिली आहे. दाक्षिणेकडे तुर्क व रशियन यांचे युद्धांत तुर्कांची फजीती उडाली आहे. सारिकामिश जवळच्या लढाईत तुर्कांच्या नवव्या कोअरचा सप्पा रशियानें उडवून तोफखान्यावरचे सर्व तुर्क अधिकारी व तिनशें आफिसर कैद केले, आणि दहाव्या कोअरचा पाठलाग रशियानें चालविला आहे. तुर्कांची तिसरी कोअर तर सबंध नाहींशी झाल्याची खबर आली आहे. काळ्या समुद्रांत ही असाच तुर्कांचा नाश होत आहे. ब्रस्लो व हमदिये ही दोन मोठालीं तुर्की लढाऊ जहाजें राशियानें नायबंदी करून टाकलीं आहेत व तिसरें एक जहाज ही अगदींच निरुपयोगी झालें आहे. असे बरचेवर पराभव झाल्याच्या खबरा वाचून कान्स्टांटिनोपल मधील लोकांच्या तोंडचें पाणी पळालें आहे.

---

जर्मन लोकांना नाताळचे दिवस तर फारच कठीण गेले असले पाहिजेत. रूटर ह्मणतो कीं ता० दिसेंबरपासून जर्मन लोकांचा नाश झपाट्यानें होत आहे. त्यांच्या सैन्यांतले लोक शेंकडा साठ या प्रमाणांत मरत आहेत!

---

परवा लॉर्ड किचनेर यांनीं लॉर्डस सभेंत युद्धाचा रिपोर्ट वाचला तो अत्यंत समाधानकारक होता. सैन्यांत नवी भरती होण्यास त्यामुळें लोकांना चांगलें प्रोत्साहन मिळेल. सुएझ कालवा अधिक निर्भय होत चालला आहे. या कालव्याच्या पूर्वेकडील प्रदेशांत प्रवेश करण्यासाठीं जर्मन आफिसराच्या हाताखालच्या तुर्की सैन्यानें शिकस्तीचे प्रयत्न चालविले आहेत. परंतु गिधाडांना तुर्की मांसाची मेजवानी मिळण्यापलीकडे त्या प्रयत्नाचा कांहीं उपयोग होत नाहीं.

---

## युद्धकथा.

सरकारी ‘साप्ताहिक युद्धवृत्ताच्या’ लेख्या लेखांत माहिती साधारण प्रतीची आहे तथापि त्यांतील तपशील कांहींसा सामान्य लोकसमूहाला अवश्य ठाऊक पाहिजे असा आहे ह्मणून त्यांतून कांहीं भाग येथें उतरून घेतला आहे:—

### साप्ताहिक युद्धवृत्त

युद्धभूमीचे येथून तेथून सर्व पद्धतवार जर्मन सैन्य खंदकांत दबा धरून राहिलें आहे. कमजास्त खोल किंवा रुंद ह्मणजे सरासरी ४ एकद्वितीयांश फुट खोल व १ एकद्वितीयांश फुट रुंद असे खड्डे त्यानीं रांगेनें खणले आहेत; ह्या खड्ड्यांत ते दबून बसले ह्मणजे शत्रूच्या तोफांच्या किंवा बंदुकांच्या गोळीबारापासून त्यांचा बराच बचाव होऊन शिवाय त्या आतल्याचे जागेंतूनच त्यांना दोस्त राष्ट्रांचे सैन्यावरही गोळीबार करितां येतो. दोस्त राष्ट्रांचें सैन्य जर नेहमीसारखें उभें राहिलें किंवा शत्रूवर चाल करून गेलें तर अशा स्थितींत शत्रूचा कांहींच नाश न होतां ह्याचें मात्र पुष्कळ लोक मरतील. ह्याच कारणानें आपल्या

सैन्याला सुद्धां खंदक खणून राहावें लागलें आहे. शत्रूनें डोकें वर काढलें कीं लागलीच आपलें सैन्य त्यांवर गोळ्या सोडतें.

तोपर्यंत उभय शत्रूंच्या मोठमोठ्या तोफा आपआपल्या खंदकांच्या मागून एकमेकांचे सैन्यांवर भारी वजनाचे गोळयांचा वर्षाव करित आहेत. परंतु खंदकांचा आश्रय त्यांस असल्या कारणानें एकमेकांस आपल्याचे जागेंतून हुसकून लावण्यास बंदुकांच्या किंवा मोठ्या तोफांच्या गोळयांचा फारसा उपयोग होत नाहीं. कोणच्याही सैन्यास पुढें सरसावयाचें असलें तर त्याला एकच उपाय करावा लागतो. तो हा कीं; शत्रूच्या खंदकापासून शक्य तितक्या जवळ आपले खंदक खणून तेथून आपल्या शत्रूवर एकदम तुटून पडावयाचें व बंदुकांवर संगिनी चढवून संगिनींनी त्यांजवर हल्ला करावयाचा गेले कांहीं आठवडे ते हेंच करित आहेत.

खराब हवा पडल्यामुळें लढाईच्या अडचणींत भर पडत आहे. तारेनें अशा बातम्या येत आहेत कीं कित्येक वेळां थंडीमुळें जमीन इतकी टणक होते कीं खंदक खणणें बहुतेक अशक्य होतें! व कधीं कधीं ती इतकी भिजते कीं सर्व जागेंत चिखलच चिखल होतो व जो जो तो खोऱ्यांनीं वर फेकावा तों तों तो खालीं वाहून येतो व खंदकांच्या भिंती पुनः पुनः कोसळून पडतात.

इतक्याही अडचणी आहेत तरी आपल्या सैन्याचा उल्हास व आपणच जय मिळवणार अशी त्यांची खातरी ही कायम आहेत. कारण, हळूं हळूं कां होईना, पण त्यांचें पाऊल पुढें पुढें पडत आहे. व एकएक पाऊल ते जर्मनास मागें मागें रेटीत आहेत इंग्लंडात हल्लीं युद्धाचे शिक्षण मिळत असलेले १० लाख लोक थोडक्याच महिन्यांत आपल्या मदतीस येतील हें त्यास माहित असल्यानें, फ्रन्स व बेलज्यम मधून शत्रूंस आपण पिटाळून लावूं अशी त्यांसच नव्हे तर सर्व ब्रिटिश साम्राज्यास खातरी आहे. ह्या गोष्टीस कांहीं वेळ लागेल इतकेंच.

रशियन सैन्यानें इकडे जर्मन सैन्याची पोलंडमधील स्वारी थोपवून धरिली तर तिकडे आस्ट्रियन सैन्याचेही पुरे पराभव केले आहेत. सर्व्हियाशीं लढण्यांत गुंतलेलें आस्ट्रियन सैन्य इकडे येऊन त्याची कुमक मिळाल्यामुळें, रशियन सैन्य जें गॅलिशियामधून व कार्पेथियन पर्वत ओलांडून पुढें चाललें होतें त्या सैन्यास ह्या आस्ट्रियन सैन्यानें अडथळा केला होता. गेल्या तीन आठवड्यांत अर्धा लाख आस्ट्रियन लोक कैदी करण्यांत आले आहेत.

रशियाची राजधानी पेट्रोग्राड येथून आलेल्या तारेवरून समजतें कीं रशियामध्यें दिसेंबरच्या २३ वे तारखेस एक हजाराहून जास्त ऑफिसर व सवा लाखाहून जास्त शिपाई इतके जर्मन कैदी होते व तीन हजारांहून अधिक आफिसर व अडीच लाखांहून अधिक शिपाई इतके आस्ट्रियन कैदी होते.

जेथें पाणसुरुंग पेरण्याची शत्रूंनीं इतकी खबरदारी घेतली आहे तेथें कांहीं जहाजें 'समुद्रसुरक्षितु' होणारच अशी ब्रिटिश लोकांनीं कधींच खुणगाठ बांधून ठेविली आहे. तथापि उत्तर समुद्रांतील आपल्या बंदरांतून बाहेर पडण्याचें जरी जर्मन काफिलानें मुळींही धाडस केलें नाहीं तरी ग्रेटब्रिटनपेक्षां जर्मनीच्याच जास्त जहाजांस जलसमाधि मिळाली आहे ही गोष्ट लक्ष्यांत ठेवण्याजोगी आहे. आज तारखेपर्यंत ग्रेटब्रिटनची निरनिराळया जातींची १९ जहाजें बुडालीं तर जर्मनीची ४२ बुडालीं आहेत! जितकीं जहाजें जर्मनीची बुडालीं तितकीं जरी ग्रेटब्रिटनचीं बुडालीं असतीं तरी सुद्धां ग्रेटब्रिटनच्या आरमाराचें सामर्थ्य जर्मनीच्या अनेकपट अधिकच राहिलें असतें. असें ग्रेटब्रिटनचें एखाद दुसरें लढाऊ जहाज बुडालें ह्मणून तेवढ्यानें ब्रिटिश आरमाराचें सामर्थ्यास विशेष धक्का बसणें शक्य नाहीं.

## कृतज्ञता

गेल्या दिसेंबरच्या २० व्या तारखेला आपल्या मध्यइलाख्याच्या वतीनें नामदार चीफ कमिशनर यांनीं अलिशान व्हाइसराय साहेबांस तार पाठवून कळविलें कीं आपला रणशूर पुत्र मृत होऊन आपली जी आणखी नवीन हानी झाली आहे तिच्या संबंधानें सर्वांस मोठी हळहळ वाटत आहे. त्या तारेला जबाब ह्मणून व्हाइसराय साहेब लिहितात कीं मध्य प्रांताच्या या अंतःकरणाच्या कळवळयाबद्दल आह्मी अत्यंत कृतज्ञ आहों.

## शिक्षण संस्था.

नागपुरास रा. रा. जनार्दन आबाजी मुळे यांनीं एक मुलाचें हायस्कूल व मुलींचें मिडलस्कूल चालविलें आहे. विद्या सुलभ करणाऱ्या गोष्टी अवश्य हव्या तितक्या पाहिजे आहेत. एका कुटुम्बांतील स्त्रीपुरुष मिळून या दोन्ही शाळा चालवितात आणि त्यांनीं ही संस्था नोंदून आपला मनोनिग्री तत्प्रीत्यर्थ अर्पण केला आहे. हा प्रयत्न फार उत्कृष्ट असून त्याला गोड फळें येऊं लागल्याचें आह्मी ऐकतों. राजश्री मुळे यांचे धाकटे बंधु शंकरराव हे आकोल्यास आपल्या संस्थेसाठीं वर्गणी गोळा करण्यास आले आहेत. ही चालक मंडळी अंतःकरणाच्या तीव्र व पवित्र प्रेरणांनीं उद्योग करीत आहेत. त्यांच्या परिश्रमाचें चीज धनिकांनीं आपल्या वर्गणीच्या तीळगुळानें करावी असें आह्मी सूचवितों.

## भूकंप

### [ इटलींतील विध्वंस ]

बुकवर लिटनच्या पॉंपी शहराचा अस्त दिवस या पुस्तकावरून ध्यानांत आलें असेल कीं आल्प्स पर्वताचा दक्षिण भाग ह्मणजे ज्वालामुखी व भूकंप यांचें माहेर घर होय. गेल्या आठवड्यांत ॲड्रिॲटिक समुद्राच्या किनाऱ्या किनाऱ्यानें "अँकोना" "ॲव्हेझानो" "रोम" "नेपल्स" व "पोटेन्झा" या शहरांच्या भागाला ज्वालामुखीचें दुसरें स्वरूप जें भूकंप त्यानें मोठाच कहर उसळून दिला जिकडे तिकडे गावचे गांव उध्वस्त झाले व मनुष्यहानि तीस हजारांवर असावी असें तारा सांगतात. यूरोप लढाईनें ग्रस्त आहे अशा वेळीं त्या लढाईच्या मानवी आपत्तीला निसर्ग देवतेच्या कोपानें भयंकर भर पडली आहे.

---

## वऱ्हाडवृत्त.

हवामान — युरोपांतल्या युद्धाची जशी चलबिचल तशी आमच्या इकडे वातावरणांत चालू आहे ढग वारंवार जमतात व दूर दूर कोसळतात गल्या शनिवारीं पाऊसही पडला. हवेंत गारठा वाढला आहे. आरोग्य स्वास्थ्याच्या कुशल गोष्टी मकरसंक्रमणाचा शुभकाल दर्शवित आहेत.

रा. रा. सयद जाहिरुल हसन रिझवी यांस आकोला येथें डेप्युटी पोलिस सुपारिंटेंडेंट प्रोबेशनवर नमलें.

कायदे कौंसिलः— गेल्या सोमवारच्या बैठकींत अबकारी कायद्याचे बिलाचा खर्डा पास करण्यांत आला. तसेंच कोर्ट ऑफ वॉर्डसचा कायदाही दुरुस्त करण्यांत आला. देवी टोंचण्याचा कायदा, जनावरें मारण्याचा कायदा, मुलकी कायदा, व टेनंसी कायदा यांच्या संबंधाच्या दुरुस्तीचीं बिलें कौंसिलापुढें मांडण्यांत आलीं.

ऑनररी क्याप्टन मर्फी यांस बुलडाणा येथें सिविल सर्जन नेमून तेथील असिस्टंट सर्जन होम्स यांस उमरावती येथें सिविल सर्जन नमण्यात आलें. आणि आकोल्याच्या सिविलसर्जनच्या जागीं क्याप्टन रॉबर्टस यास नरसिंगपुराहून बदलण्यांत आलें.

'राजेश्वर मित्र समाजा' नें गेल्या गुरुवारीं 'प्रेमध्वज' नाटकाचा प्रयोग केला. उत्पन्न सुमारें ३९३ रुपये झालें. राजेश्वर संस्थेच्या विद्यमानें श्रीगणेशोत्सव, व इतर कांहीं महोत्सव होतात तेव्हां त्यांच्या चालकांस पैशाची तूट भरून काढणें कठीण जातें. वर्गणी जमविण्याचे हाल सोसताना पुष्कळदां वर्गणीदार कुरवोडी करूं पाहतात, तेव्हां अशा कर्मकटकटींतून मुक्त होण्याला करमणुकीच्या द्वारानें पैसा जमविण्याला व आपल्या बुद्धीलाही नाट्यकलेचा व्यासंग देण्याला सध्यांच्या कालाला अनुरूप असाच हा मार्ग राजेश्वर मित्र समाजानें स्वीकारला व तो त्यांस चांगला फलद्रूप झाला ही आनंदाची गोष्ट होय. तीन चार महिन्यांच्या परिश्रमाच्या मानानें नाटकाचा प्रयोग फार नामी झाला. प्रेमध्वज, प्रतापसिंह, व अकबर या पात्रांचीं कामें हृदयंगम झालीं. त्याचप्रमाणें पद्मावती, वृद्धि, राणी या भूमिकांनींही लौकिक चागला मिळविला. तसेंच हुजरे शिपाई इत्यादि कनिष्ठ पात्रांचीं कामें वाखाणण्यासारखीं झालीं. राजेश्वर मित्र समाजाचें आह्मी अभिनंदन करितों आणि आपली वाणी कायम ठेवण्यासाठीं त्यांनीं केलेल्या या धर्मार्थ खटाटोपीबद्दल आह्मी त्याचा मोठा गौरव करितों. ही नवी कामधेनु या मित्रसमाजाचे मनोरथ पूर्ण करो!

**पुरवणी**— आजच्या अंका सोबत मे० शर्मन आणि कंपनी सतघडा मथुरा यांच्या औषधाची जाहिरात वाटली जात आहे तिजकडे वाचकांचें लक्ष जाईलच.

---

## नोटीस

नोटीस बेशमी परयान मर्दे जगू कोळी रा. हैसांग ता. आकोला

ईसः—

खालीं सही करणार नोटीस देतो कीं तूं माझी लग्नाची बायको असून मी तुला ता. २१।१२।१४ रोजीं वऱ्हाड समाचारांतून नोटीस दिली ती त्वां घेतली नाहींस व पुनः मला उलट नोटीस दिलीस. तरी हें योग्य केलें नाहींस. तुझा कांहीं दुष्ट लोकांच्या नादानें माझे घरी नांदण्याचा इरादा दिसत नाहीं परंतु या बद्दल तुझी लवकरच योग्य तजवीज केली जाईल. तुझें दागीनें मी नेले नाहींत व नोटीस पावल्यावरही दोन वेळ नेण्यास आलो असतां तू आली नाहींस. रूसून राहिलीस. तरी मी पुनः तुला कळवितो कीं अशा भानगडीन मानवितां त्या नोटीस पावल्यापासून ८ दिवसांत निघून यावेस मी आई बापांतून सांप्रत निराळा राहत असल्यानें माझ्या खाण्या पिण्याची गैरसोय आहे. परंतु वरील मुदतींत असें न केल्यास तुला कोर्ट मार्फत मिळविण्या बद्दल योग्य तजवीज करून तुझे जे सल्लगार आहेत त्यांचे वर ही काम चालविण्यांत येईल ता. १४।१।१५

सही

सहीची निशानी जगू वा॥ भगवान कोळी रा. घोडस रामागड ता. दर्यापूर नो. नं. ३९

---

## नोटीस

रा. रा. माधव शिवराम भाळे ब्राह्मण राहणार पेठ पंचगव्हाण ता. आकोट जि. आकोला.

यांस

खालीं सही करणार याजकडून नोटीस देण्यात येते कीं तुह्मीं आह्मास स्वतःचे राहते घर १ भाऊ भोळेवाले घर १ व वासुदेव नाइकवाले १ अशी तीनघरें इमल्या समेत मौजे पंचगव्हाण येथील रक्कम रुपये ६७५ ऐवजीं आह्मास खरेदी देऊन त्यापैकीं रु. ११६ घेतले व आह्मास पावती करून दिली व खरेदी खत रजिस्टर करून आणून तिन्ही घराचा कबजा आह्मास देऊन तुमचे राहिलेले रु. ४५९ घेण्याचे कबूल केले. करारा प्रमाणें आज तीन महिनें झाले तरी खरेदीखत रजीस्टर करून दिलें नाहीं व कबजाही आह्मास देत नाहीं सबब या नोटीसीने कळविण्यात येते कीं ही नोटीस पावल्यापासून आठ दिवसाचे आंत खरेदीखत नोंदून आणून आह्मास विक्री केलेले घराचा कबजा देऊन तुमचे राहिलेले रु. ४५९ घेऊन जावे तसे न केल्यास तुमचे वर रीती प्रमाणें स्पेसिफिक परफारमन्सचा दावा करून कोर्ट खर्चासह व या नोटीसीचे खर्चासह रकम भरून घेणें भाग पडेल कळावे ता. १५।१।१५

सही

मोहनलाल बिहारीलाल दस्तूर खुद.
नो नं ४०

शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

संधिवात, फेंपरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरीयनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ॥२

बी. एच. जव्हेरियन कंपनी,

खलासीचकला, मुंबई.

नो. नं० २२

---

मांगालिक प्रसगीं बक्षीस देण्याकरितां

सेंटचाराजा.

## ओटो—दील—चमन.

हें सर्वोत्तम सेंट मुद्दाम वापरण्यासाठीं हल्लींच्या फॅशनचें हें एकच होय. फक्त २—३ थेंब रुमालावर टाकल्यानें चमेलीच्या आणि बटमोगऱ्याच्या हजारों ताज्या फुलांइतका सुवास ८ दिवसपर्यंत टिकतो एका लहान बाटलींत हा सुगंधी पुष्पांचा भांडार आहे किं, रु. -॥- -॥। व रु. २ ट. ख. वेगळा. सुवासिक कार्डें दिलचमनचीं दर डझनास रु. -॥। "

सोल एजन्ट्स. एच. आर. मोदी आणि कं.

नं. १० प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर, मुंबई.

---

सतत १० वर्षांच्या पूर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला

दूषित रक्त शुद्ध करणारा




शरीराचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळ व तदनुषंगीक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रु. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नकल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

**मालक--** डा. गोतमराव केशव, आणि सन्‌

ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबइ नंबर २.

नो० नं २३

---

## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी सांड्याचें तेल,

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

परमा सायरप.

कमरखाही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध. एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस २॥ रुपये.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,

खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० २४

---

## Oriental Government securi:y Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER

THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs 4 CRO RES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

### Quinquennial Record of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | Rs | Rs. |
| 1888 | 8 668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17 657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6,81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8.47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 64,097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05,818 |
| [illegible] | 3136,421 | 1.41,32356 |
| 1903 | [illegible] | 2,10,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

"At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL

Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**

CHIEF AGENT,

N. N. 25 C.P. Berar & Khandesh. Nagpur

---

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें

Regd NO. N. 150

# वऱ्हाडसमाचार.

Berar Samachar

वर्ष ४९ ] आकोला--सोमवार तारीख २५ माहे जानेवारी सन १९१५ ई० [ अंक ४

## वर्गणीचे दर

आकोल्यांतील लोकांस........१ रुपया
बाहेरगांवीं ट. हां. ........ २ रुपये
वर्गणी आगाऊच घेण्याची वहिवाट आहे.

---

## नोटीशीचे दर

दर ओळीस दीड आणा.
हेडिंगच्या दोन ओळी धरल्या जातील
नोटीस सुवाच्य असली पाहिजे.

**सूचनाः–** गुरुवारच्या आंत येणाऱ्या नोटीसा त्याच आठवड्यांत घेतल्या जातील. यापुढें येणाऱ्या नोटीसास स्पेशल चार्ज पडेल.

---

WANTED smart and energetic men to work as agents in every town on very lucrative terms. Apply to:-
The National Indian Life Insurance Co. Ltd.,
166, Hornby Road - Bombay
No. No. 12

---

### जाहिरात

**मुंबई ब्यांकेची सेव्हिंग ब्यांक.**

ह्या बँकेंत खालीं दिलेल्या अटीवर ठेवी ठेवितां येतात.

कोणत्याही वर्षाचे १ ले जानेवारी आणि ३१ दिसेंबर याच्या दरम्यान एक हजार रुपये पर्यंत पैसा ठेविला जाईल.

ठेवी दोन अथवा अधिक इसमांच्या नांवावर ठेवतां येतील आणि तो पैसा यापैकीं एकास अथवा जास्त इसमांस अगर यापैकीं मयताचे मागें राहील त्यांस काढतां येईल

व्याज दर साल दर शेंकडा तीन रुपयाप्रमाणें दिलें जाईल. व्याजाची आकारणी प्रत्येक महिन्याची जी कनिष्ठ शिल्लक असेल तिजवर केली जाईल. मात्र पांच हजारावरील शिल्लक रकमेस व्याज नाहीं. नियमांच्या प्रती बँकेंत अर्ज केला असतां मिळतील.

मुंबई ब्यांक } J. G. Ridland.
आकोला ९।१।०९ } एजंट

नो. नं २

---

सतत ४२ वर्षे चाललेला कारखाना

**ए. जे. ह्यात्रे आणि सन् सुगंधी.**

ठिः--पांजरा पोळचा नाका, चिमणलालमहाराजांचे मंदीर भुलेश्वर -- मुंबई.

एकच भाव! ! एकच भाव! !

अस्सल सुरंगीं आमचेकडे मिळणारा माल ओहो सुरंगी

अत्तरें.- गुलाब, मोतिया, दवणा, अंबर, बकूल, रुपाच, हिना, पाच, वाळा, जुई चांफा, अंबा, इस्तंबोल, केशर, मदनबाण पारिजातक, मुस्काहिना, गुलहिना, रुअबझा, केवडा, रुखस, चमेली, अगर. हीं अत्तरें दर तोळ्यास १ रुपयापासून ८ रुपयेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. २-३-४-६ रु.

तेलें.– चमेली, बेलिया, मुसुंबी, हिना, लिंबू, मेंदी, गुलाब, मसाला, नारंगी, सुगंधराव, मोतिया, आवळा, नागर, कपाशी.

वरील तेलें दर रुपयास ६ तोळ्यापासून २८ तोळेपर्यंत निरनिराळ्या भावाचीं मिळतील. दर बाटली ४ आणे.

**अष्टगंधी अरगजा,** १ तोळ्यास ४ आ ६ आ. १२ आ. १ रु. १॥ रु.पर्यंत. अरगजा व फितना ( निरनिराळ्या सुवासाचा ) दर डबीस ३ आ. ४ आ. ६ आ. ८ आ. १ रु. उटणें दर डबीस १ आ. २ आ. ४ आ. ८ आ. पर्यंत. केशरी गोळी उत्तम २॥ आ. ५ आ १० आ. १। रुपयापर्यंत. क्याटलॉग फुकट

ह्याशिवाय कस्तुरी, **केशर, गुलाबपाणी,** मध, उदबत्ती, रंगीत पाट, **दशावतारी गंजिफे,** सोंगट्या, बुद्धिबळें, आर्यवर्धक कार्डस, बिझिक, इसापिकें, हस्तीदंती फासे व फण्या, पितळी सामान, पितळी शिंगे व करणे, चंच्या, सरबतें व मुरंबे, पक्या तारा, बदामाचें तेल, व वातहारक आणि केशवर्धक तेलें, सुटें व वेणीचें गंगावन इत्यादि वरील पत्त्यावर **मिळेल. व्यापाऱ्यांस** सवलत.

बाहेरगांवच्या गिऱ्हाईकांस माल व्हल्युपेबलनें पाठविला जाईल. नो. नं. ३

---

## चांदीचीं भांडीं.

### विकावयाचीं आहेत.

नाशिक येथें तयार केलेलीं सर्व प्रकारचीं सुबक व वाटदार भांडीं आमचेकडे विक्रीस तयार असतात. भाव माफक व्ही. पी. नें अगर रोखीनें पाठवूं. मालाचे खरेपणाबद्दल ग्यारंटी देऊं.

**पुरुषोत्तम रामचंद्र वैशंपायन**
**रविवार पेठ नाशिक सिटी.**
नो. नं. ४

---

### हिंदुस्थानावर अरिष्ट.

हिंदुस्थानांतील रहिवाशांच्या पाठीस ज्वर व हिंवताप यांचें अरिष्ट सदोदित लागले आहे पण त्याचा प्रतिकार करण्यास बाटलीवाला यांचें हिवतापाचें औषध व गोळ्या हे रामबाण आहेत. ताप किंवा शीतज्वर येणारसें वाटतांच हें औषध घ्यावें. किं. १ रु.

**बाटलीवाला यांच्या निस्तेज लोकांसाठीं शक्तिकारक गोळ्या**

हें औषध घेतल्यानें भागवटा, मेंदूचे श्रम, पौरुषनाश, अशक्तता व क्षयरोगाचें स्वरूप, त्याप्रमाणें अजीर्ण इ. इ. विकार तावडतोब दूर होतात. किं. रु. १॥८.

**बाटलीवाला यांचें दंतमंजन.**

हें दंतमंजन मायफळाशीं कांहीं इंग्रजी औषधांचा वैद्यकीय रीतीनें मिलाफ करून बनविलें आहे. किं. ॥४

**बाटलीवाल्याचें गजकर्णावर मलम.**

यानें गजकर्ण, कुजली खरूज यांचा विकार एका दिवसांत नाहींसा होतो. किं. ॥४

हीं औषधें सर्व औषधी विकणाऱ्या दुकानावर व डॉ. एच. एल. बाटलीवाला जे. पी. मु. वरली लेबोरेटरी दादर, मुंबई यांजकडे मिळतात.

नो० नं० ५

---

## डायरी बक्षीस!!

(१)खडे तात्विक बोल, भाग १ ला, किंमत ॥६. (२)खडे तात्विक बोल, भाग २ रा, किंमत ॥६. [३] धर्मपद, किंमत ४. (४) पांगारकरकृत एकनाथचरित्र, किंमत ५. (५) विदग्धवाङ्मय, किंमत ॥३. (६) आकोलें ( वऱ्हाड ) येथील साहित्यसंमेलनाचे अध्यक्ष रा. हरिभाऊ आपटे यांचें भाषण, किंमत ॥२. ७ मुलांस थोडा उपदेश, किंमत ॥८. (८) वाल्मीकीचा जय, किंमत ॥८. (९) अण्णा किर्लोसकरकृत संगीत सौभद्र व संगीत शाकुंतल, किंमत प्रत्येकीं ॥१२. (१०) शिवलीलामृत किंमत ॥८. या यादीपैकीं आठ आणे किंमतीचीं पुस्तकं मागविणारास पुढील ह्मणजे सन १९१५ ची, कापडी बायंडिंगची, भरपूर माहितीची, लहान [ पॉकेट ] डायरी बक्षीस मिळेल; व एक रुपया किंमतीचीं, पुस्तकें मागविणारास कापडी बायंडिंगची, भरपूर माहितीची मोठी डायरी बक्षीस मिळेल. टपालखर्च निराळा पडेल.

**भट आणि मंडळी, पुणें शहर.**
नो. नं ६

---

### अनायासें देवदर्शन.

**नोटपेपर्सः—** श्रीगजानन, दत्तात्रय मारुती शंकर व नरहरी या पैकीं कोणती ही एक मूर्ती रंगांत दाबून उठाव (एम्बास) छापलेले, १०० ग्रेप्रनाईट नोटपेपर्स व त्याच्या बेताची चैाकोनी १०० कव्हरें प्रत्येकीं किंमत ॥८ व्हीपीनें ॥१२ दोन्हीमिळून किंमत रु. १ व्ही. पी. रु० १॥६




सर्वत्र एजन्टस् पाहिजेत

**पत्ता—बेंद्रे आणि कंपनी पुणेंसिटी**

नो. नं. ७

---

### केशराचें फूल मुफ्त

पवित्र केशर ।।।= शुद्ध शिलाजीत ॥ असली कस्तूरी २४ ममीरातिनती ३ खालिस हींग ॥= तो० सुंदर कामदार शाल ३ व

$3\frac{1}{2}+1\frac{1}{2}$ गज ६ से १०

**काश्मीर स्टोर्स श्रीनगर नं० १२**
नो० नं० ८

---

### अनुभवून पसंत ठरलेली

केशनाशकपूड किं० ४ आणे, दंतमंजन कापूर, शोप, पेपरमींट, सुंठ, पुदीना, हिंग, अजवान, दवना यांचे अर्क, किं० प्रत्येकीं ४ आणे, कावीळ, व मुळव्याध, याच्या अप्रतीम गोळ्या किं १। रु० खरुज गजकर्ण, खवडा, इसब, मायटा, आगपैण; व्रण, चिखली, सुकी, **ओली** खाज, जखम, नखाविषयीं, तमाम रोगावर चालणारा १ च 'दिलखुष' मलम किं ४ आणे ३ दिवसांत वरील मलमानें गुण येतो पैाष्टीक चहा किं ४ आणे, वातनाशक तेल किं १२ आणे, विंचवावर पूड किं. १ रु० व डोळ्यांतील वेगळे सोडण्याचे औ. किं ४ आणे, वि० खु० पत्रद्वारें, वंग प्रवाळ हात भट्टीचे किं० तोळ्यास २ रु०

**पत्ता –** व्ही० आर० मुळे,
नांदुरा. जी० आय० पी०
नो० नं० ९

---

### नोटीस

नोटीस बेशमी रा. लक्ष्मण वा॥ सखाराम शिंपी २ नारायण भोनाजी शिंपी व ३ शंकर वा॥ भोनाजी शिंपी अ० नं० २ व ३ ची अ० पा० करणार आई अंबी मर्द भोनाजी शिंपी रा० अडगांव बु॥ ता० आकोट यासवीसः—

या नोटीशीनें कळवितों कीं तुमच्याकडून आमची रक्कम घेणें आहे ती तुह्मांस बरेच वेळां मागितली असतां तुह्मी देतों ह्मणून वारंवार थापा देता करितां मुद्दाम या जाहीर नोटीसीनें कळवितो कीं ही नोटीस पावल्यापासून चार दिवसांत सर्व व्याजामुद्धां रुपये आणून देऊन आमची पावती घ्यावी. तसें मुदतींत न केल्यास योग्य कोर्टांत तजवीज केली जाईल व सदरहू मुदती पुढें दरमहा दर शेंकडा २ रुपये प्रमाणें व्याज आकारलें जाईल कळावें.

ता. २२।१।१५ सही

मेघराज गंगाराम मालक सुरजमल गंगाराम दु० अडगांव तर्फे सदरमुखत्यार विठ्ठलदास अजबराम द. खु.

नो० नं० ४४

### ब्रह्मविद्या ग्रंथ रत्नमाला

या मासिकाचा वर्षारंभ माघ शु० ९ तिसऱ्या वर्षापासून ७२ पानांचें मासिक. वा० व० ट० खर्चासह तीन रुपये. यांत श्रीशंकराचार्य, शंकरानंद, व विद्यारण्य यांचे उपनिषदावरील भाष्य, आत्मपुराण व अनुभूतिप्रकाश हे ग्रंथ क्रमानें मूळ, अन्वय, अर्थ व विवरण यांसह प्रसिद्ध होतात. यांत हल्लीं बृहदारण्यकाचा भाष्यार्थ चालू आहे. मागील दोन वर्षांतील वीस प्रकरणें १० रुपयांस घेऊन तिसऱ्या वर्षी वर्गणीदार होणारास 'वैशेषिक दर्शन' बक्षीस-

सनातन वैदिक धर्माचें, तत्त्वज्ञानाचें व सामाजिक विषयाचें विवेचन करणारें—

### आचार्य

पाक्षिक, दर एकादशीस नियमितपणें प्रसिद्ध होतें. पृष्ठें २४ वा० व० ट० खर्चासह १ रु० ८ आणे वरील मासिक घेणारास फक्त १रु० वरील विषयां शिवाय यांत संस्कृत काव्यें, नाटकें व इतर लहान लहान ग्रंथ यांचाही परामर्श केला जातो. धर्म संबंधीं प्रश्नांची समर्पक उत्तरेंही दिलीं जातात. नमुना मागवा.

पत्ता— विष्णुशास्त्री बापट.
२४१ सदाशिव पेठ पुणं.
नो० नं० १३

### जाहीरात

**पाहिजे**— न्यु इंडिया इन्शुरन्स व्यांकिंग कंपनीचें काम करण्यासाठीं वऱ्हाड आणि खानदेशभर हुषार एजंट पाहिजेत. पगार किंवा कमीशन भरपूर दिलें जाईल विशेष माहिती करितां खालील पत्यावर अर्ज करावे.

विश्वनाथ विष्णू फडके चीफ एजंट
न्यु० इं० इं० कंपनी मुर्तिजापूर वऱ्हाड
नो नं ११

### नोटीस

**पाहिजे**— वणी तालुक्यांतील बीरकुंड इझाऱ्यासाठीं कामगार पाटलाचें काम करण्यास लायक असा विश्वासू इसम पाहिजे. पगार किती पाहिजे याचा खुलासा करून लायकीचे दाखल्या सह अर्ज खालीं सही करणाराकडे पाठवावा.

सही
अबदुल वहीद अ० पा० क० आई
अलिमुन्निसा बेगम के० आफ०
खानसाहेब अबदुल अझीम
खान ओरिएंटल ट्रान्स्लेटर
नागपूर.
नो० नं० ३२

### जाहीर नामा.

सर्वत्र लोकांस खालीं सही करणार याजकडून जाहीर करण्यांत येतें कीं नामे पुंजाई मर्द यशवंता राहाटे रा. ब्रह्मपुरी प्र. फतेखेर्डे ता. मेहकर जि. बुलडाणे ही माझी पाटाची बायको असून गैर चालीची असल्यानें ६ महीन्यापासून ती मजपाशीं राहत नाहीं. मी व माझा अज्ञान पुतण्या असे असून हातानें भाकरी करून खात आहों. वरील माझी बायको हलीं गावात येऊन वेगळी राहीली आहे व तिनें छोगमल मारवाडी यांचे कांहीं कर्ज काढल्याचे मजला समजलें आहे करितां जाहिर करण्यांत येते कीं तिजला कोणी कर्ज देऊं नये व कागद करून घेऊं नये. तिनें करून दिलेल्या दस्तऐवजाबद्दल व तिने काढलेल्या कर्जाबद्दल मी अगर माझा पुतण्या किंवा जिनगी जबाबदार होणार नाहीं. करितां आगाऊ सर्वत्रांस जाहीरीतीनें कळविलें आहे तिनें वाटल्यास दुसरा घरठाव करावा. माझी कांहीं तकरार नाहीं. मी तिजवरील सर्व हक्क सोडला आहे कळावें ता. १३।१।१९

सही
नि. यशवंता वा॥ जानजी राहाटे
रा. ब्रह्मपुरी प्र. खेर्डे ता. मेहकर
नो. नं. ४१

### नोटीस

सिताराम विश्वनाथ भट रा० पाटण बोरी ता० केळापूर जि० यवतमाळ

यांसः—

खालीं **सही करणार** याजकडून नोटीस देण्यांत येते कीं, मौजे दाभ ता० वणी शेत स० नं० ३३ चे खाते माझे नांवें असून माझ्या पूर्ण मालकीचें आहे. त्यांतील माझा हिस्सा मी तुह्मांस वाहण्यास दिला आहे. तुह्मावर बयाबाईनें सन १८९८ व १९१२ सालांत दावा करून जरी डिक्री मिळविली आहे; तरी ती मला मुळींच कबूल नाहीं. तुह्मांस माझा हिस्सा वाहणें नसल्यास माझे स्वाधीन करावा. माझे परवानगी वांचून सदर्हू शेत तुह्मी कोणास विक्री, गहाण, मृत्युपत्र, कींवा अन्य तऱ्हेची अफरातफर कराल तर ती सर्व या नोटीसीने रद्द समजली पाहिजे. या बदलची जबाबदारी माझेवर नसून तुमचेवर राहील कळावे. ता. मा. इ. १२।१।१९

सही
वासुदेव विश्वनाथ भट रा.
बोरी. ता. केळापूर जि. यवतमाळ दस्तुर रामन्ना गांडली.
इलाखे मोगलाई.
नो. नं. ४२

### जाहीर नोटीस

सर्वत्रांस कळविण्यांत येते कीं पाटण बोरी येथील देशपांड्याचे घराचे दक्षिणेस देवळासलागून असलेलें राहतें घर, व अवार व मौजे दाभ येथील स० नं० ३३ हे माझे पूर्ण मालकीचे आहे. माझे परवानगी वाचून माझा भाऊ सिताराम, व पुतणे, रामचंद्र, बळीराम, कृष्णा हे कोणत्याही प्रकारची अफरातफर करतील तर ती सर्व रद्द समजली पाहिजे. याबद्दलची जबाबदारी माझेवर नसून देणार व घेणार यावर राहील क० ता० १२।१।१९

सही
वासुदेव विश्वनाथ भट.
रा० बोरी ता० केळापूर
जि० यवतमाळ.
दस्तुर रामन्ना गवंडी मोगलाई
नो. नं. ४३



वऱ्हाडसमाचार

मिति माघ शुद्ध १० शके १८३६


## शिष्टागमन.

### ( सर रॉबर्टसन यांचा सुखसंवाद )

—:*:*:*:—

सर बेंजामिन रॉबर्टसन् हे चीफ कमिशनर या नात्यानें सर्वांस आवडत आहेतच पण त्यापेक्षां ही वऱ्हाडचे लोक त्यांना विशेष चहातात. कां कीं कमिशनर असतांना झालेला त्यांचा परिचय हल्लींच्या श्रीमंतीनें अलंकृत झालेला आहे. हल्लीं सर रॉबर्टसन् हे यवतमाळ जिल्ह्यांतील वणीच्या बाजूनें पिसगांव, कारंजा, पांढरकवडा वगैरे ठिकाणीं मु. करीत करीत यवतमाळ मुक्कामीं आजरोजीं दाखल होऊन बुधवारीं नागपुरास परत जातील. या बारा दिवसाच्या दवऱ्यांत सर रॉबर्टसन् यांचा लोकांनीं मोठा बहुमान केला आणि या त्यांच्या सुजनपणाला अनुरूप होणाऱ्या बहुमानापेक्षांही आह्मी त्यांच्या कार्यपरत्वें होणाऱ्या सुखसंवादांना विशेष महत्व देतों. राजपुरुषांचे हे सुखसंवाद भावी राजकीय गोष्टींचे मार्गदर्शक असतात. तथापि या दवऱ्यांतील त्यांच्या संभाषणांत जरी राजकीय प्रपंचाच्या गोष्टी नाहींत तरी स्थानिक सरकार व लोकप्रेम यांची सांगड प्रस्तुतच्या कारकीर्दींत किती सुरेख जमली आहे हें पहाण्यास मिळेल अंतःकरणाच्या एक दिलाचा ध्वनि सरकार व प्रजा यांच्या मनामध्यें कसा घुमत आहे याचे उद्गार सर रॉबर्टसन् यांचा वणी येथें ता. १९ रोजीं मुक्काम असतांना त्याच्या सार्वजनिक संभाषणांत आपोआप निघाले आहेत.

या महत्वाच्या गोष्टीमुळें आह्मी सर रॉबर्टसन् यांच्या इंग्रजी भाषणाचा मराठींत अनुवाद आमच्या वाचकांकरितां मुद्दाम करीत आहों. रावबहादूर विठ्ठलराव पुराणीक व इतर सभ्यगृहस्थ यांना उद्देशून सर रॉबर्टसन यांनीं वणी येथें झालेल्या आपल्या स्वागताबद्दल व मानपत्रांतील प्रेमळ गौरवाबद्दल सर्वांचे मोठ्या प्रेमानें आभार मानिले. गुदस्त सालीं आह्मीं या सुमाराला यवतमाळ जिल्ह्यांत येण्याचा संकल्प केला होता पण दक्षिण आफ्रिकेत एकाएकीं जाणें भागपडल्यामुळें तो बेत तसाच राहिला. आतां वऱ्हाडच्या या भागांत फेरी करण्याला आह्माला मोठा संतोष वाटतो. यावेळीं मुख्य इजारदार व पाटील मंडळी यांच्या मुलाखती होतील तेव्हां सन १९०८ जानेवारीमध्यें आह्मी इकडे फिरत असताना झालेल्या ओळखी पुनः नव्या जुन्या होतील, त्या पहिल्या भेटीच्या गोड आठवणी अजून आह्माला आहेत. त्या वेळीं सर्वत्र प्रेमळमित्रभावानें व पाहुणचारानें आमचें स्वागत करण्यांत आलें. आणि वऱ्हाडचा पाहुणचाराबद्दल नांवलौकीक आहे.

प्रस्तुतच्या महायुद्धांत या देशानें भाग घेतलेला आहे आणि चक्रवर्ती बादशहा संबंधानें आपण मानपत्रांत निःसीम राजभक्ति व्यक्त केली असून साधूंच्या परित्राणार्थ सुरू केलेल्या या चिरस्मरणीय युद्धांत आपल्या साम्राज्यानें जी कामगिरी उचलली आहे तिच्या संबंधानें आपण अंतःकरण पूर्वक धन्यवाद केला आहे. हिंदुस्थानांतील कोणत्याही भागापेक्षां वऱ्हाडचे प्रजाजन बिलकुल मागे नाहींत. या आणीबाणीच्या प्रसंगीं साम्राज्याच्या कार्याला आपलें निश्चळ पाठबळ आहे. आणि वऱ्हाडच्या मंडळीमध्यें दिसून येणारी ही उत्कृष्ट भावना आह्मी मोठ्या तत्परतेनें मान्य करतों. संयुक्त राष्ट्रांविरुद्ध या लढाईत तुर्कस्थाननें दुर्दैवानें जी बाजू स्वीकारली तिच्या संबंधानें वणीच्या मुसलमान प्रजाजनांनीं केलेला निषेध आह्मीं विशेषेंकरून स्मरणवहींत नोंदला आहे. चालू सतकांतील कायदे कौंसिलच्या बैठकीच्या वेळीं ना० नबाब सलामुल्लाखान यांनीं मुसलमानवर्गाचा ब्रिटिश सरकाराविषयींचा आदरभाव नुकताच व्यक्त केला आणि आह्मीं त्याचवेळीं मुसलमानांनीं वेळोवेळीं जी अढळ राजनिष्ठा व्यक्त केली आहे तिचा अनुवाद केला.

या महायुद्धानें बहुविधप्रकारें प्राणहानि व इतर संकटें प्राप्त झालीं आहेत. सर्वांमध्यें मुख्य मनुष्यप्राणाचा चाललेला संहार होय. आणि हिंदुस्थानचे वीरपुत्र या लढाईच्या अग्रभागीं धारातीर्थीं मरण पावत आहेत त्यामुळें या संहाराची मजल आतां हिंदुस्थानांत आपणांपर्यंत प्रत्यक्ष येऊन पोंहचली आहे. खुद्द आलिशान व्हॉइसरॉय यांच्यावर त्यांच्या पराक्रमी पुत्राच्या मरणानें जें दुःख कोसळलें त्याचा उल्लेख आपल्या मानपत्रांत आहेच. त्यांना आणि त्यांच्यासारख्या स्थितींतल्या इतर आप्तजनांना आह्मी आपल्या अंतःकरणापासून सहानुभूती दर्शवीत आहों आणि ज्या प्राणांसाठीं ते शोक करितात ते प्राण राष्ट्रकार्याकरितां इतक्या उत्कर्षानें खर्ची पडले आहेत हा विचार त्यांच्या मनाचें सांत्वन करो अशी आह्मी उमेद बाळगतों.

वऱ्हाड मधील मंडळींना या लढाईचे परिणाम व्यापारांत जी नुकसानी आली आहे आणि कापसाच्याभावांत जी मंदी आली आहे तिच्यामुळें विशेष प्रकारें दिसून येत आहेत. आपल्या ध्यानांत आलेंच असेल कीं व्यापाराला मदत करण्यासंबंधानें सरकारनें नुकत्याच कांहीं योजना केल्या आहेत आणि त्या योजना लोकांत विश्वास फैलावत जाईल त्या मानानें फलद्रूप होत जातील. पण मला एका प्रसिद्ध जमेदारानें नुकतेंच उमरावतीला जी गोष्ट सांगितली तीच आह्मीं तुह्मांस पुनरुक्त सांगू इच्छितों. ते जमेदार ह्मणाले कीं आह्मी वऱ्हाडची मंडळी अगदीं अलीकडेपर्यंत समृद्धींत आहोंत आणि आतां जरी कांहीं नुकसान आलें तर हल्लीं चालू असलेल्या इतर लोकांच्या हानीपुढें त्या नुकसानीची मातबरी ती काय? सर रॉबर्टसन होकार भरून ह्मणाले कीं हीच

खरी मनोवृत्ती होय आणि ह्या वेळेशीं याच रितीने झगडलें पाहिजे. हे वरील उद्गार काढणारे गृहस्थ वऱ्हाडचेच आहेत हें पाहून आह्मांस आनंद वाटतो.

आपल्या मानपत्रांतील वतनदार पटवाऱ्यां विषयींच्या मजकुरासंबंधानें आह्मी आपणांला कळवितों कीं हीं वतनें हिसकावून घेण्याचा सरकारचा बिलकुल इरादा नाहीं. आपणांला माहीत आहे कीं पाटील पटवाऱ्यांच्या कायद्याप्रमाणें आपलीं हीं वतनें कायमचीं आहेत आणि त्या कायद्याचा विपर्यास होईल असे कोणतेच फेरफार करण्याचा सरकारचा विचार नाहीं. पण तो कायदाच सांगतो कीं जेव्हां बदली नेमावयाचा असतो तेव्हां त्याला विशेष कारणें नसतील तर संपूर्ण मुशाहिरा मिळावा. आणि वणीसारख्या गरीब तालुक्यांत ही गोष्ट विशेष जरूर आहे कीं कायद्याच्या या बाबीला पूर्ण पूर्ण अंमल दिला पाहिजे. ह्मणजे बदली लोकांस योग्य वेतन मिळून त्याजागीं लायक माणसें मिळत जातील. कायद्याचें हे कलम पूर्णपणें अंमलांत येण्यासाठीं तुह्मी डेप्युटी कमिशनर यांना योग्य मदत द्याल तसाच सर्वच मुलकी कारभार अधिक व्यवस्थित करण्यासाठीं जे जे उपाय योजण्यांत येतील तेही आमलांत आणण्यास मदत द्याल. शेवटीं कमिशनर व डेप्युटी कमिशनर यांच्या कारकीर्दीसंबंधानें जे गुणानुवाद काढले ते ऐकून आह्मांस आनंद वाटतो आणि तसेंच त्यांनीं लोकांच्या संबंधानें जीं कळकळीचीं व कल्याणाचीं कामें केलेलीं आहेत त्या बद्दलही आपल्या मानपत्रांत गौरव केलेला आहे.

या प्रसंगीं श्रीमती रॉबर्टसन याना आमच्या बरोबर वऱ्हाडांतल्या दवऱ्यांत येतां आलें नाहीं ह्मणून त्याना फार दिलगिरी वाटत आहे. आह्मी जो काळ आपल्या मध्यें घालविला त्याच्या फार गोड गोड आठवणी आह्मांस अद्याप आहेत आणि सर्व ठिकाणीं जें आमचें प्रेमानें स्वागत झालेलें आहे ते आह्मी उभयतां स्मरत असतों.

## लॉर्ड हार्डिंज साहेबांचें भाषण.

आमचे सध्याचे व्हाइसराय ना. लॉर्ड हार्डिंज साहेब यांचें कोणतेंही भाषण घ्या. त्यांत सरळपणा, सहानुभूति, कळकळ इ. गुण उत्तम प्रकारें व्यक्त झालेले असतात. वरिष्ठ कायदे कौंसिलाच्या नुकत्या झालेल्या बैठकीचे वेळीं सद्यः स्थितीसंबंधानें त्यांनीं जें भाषण केलें तें या गुणांनीं युक्त होतें हें सांगावयास नकोच तुर्कस्थाननें प्रस्तुतच्या युद्धांत निष्कारण पडून आपल्या पायावर धोंडा कसा पाडून घेतला याचा थोडक्यांत इतिहास त्यांनीं सांगितला त्यावरून जर्मन लोकांच्या चिथावणीला बळी पडून एनव्हर पातशाहानें तुर्की राष्ट्राचें ' नभूतो न भविष्यति ' असें कायमचें नुकसान केलें आहे. तुर्कस्थाना विरुद्ध इंग्रजांना जरी इच्छेविरुद्ध शस्त्र धरावें लागलें आहे तरी मुसलमानांच्या पवित्र तीर्थस्थानांना धक्का लागूं देणार नाहीं हें ब्रिटिश मुत्सद्यांचें अभिवचन हिंदुस्थानांतल्या मुसलमान प्रजेच्या राजनिष्ठेस दृढ करणारें आहे. या युद्धांत हिंदी प्रजेनें दाखविलेली अढळ व उत्कृष्ट राजनिष्ठा व केलेलें उत्कृष्ट प्रतीचें साह्य यांविषयींचा उल्लेख व्हाइसराय साहेबांनीं मोठ्या अभिमानानें व गौरव पूर्वक केला. हिंदुस्थानांतील शेतकी व व्यापार यांना धक्का लागूं नये ह्मणून गव्हाच्या निर्गतीला घातलेला निर्बंध कपाशीची लागवड कमी करण्याविषयींचे प्रयत्न, आणि प्रेसिडेन्सी ब्यांकामार्फत व्यापाऱ्यांना कर्जाऊ रकम मिळण्याची केलेली तजवीज यांचा ही त्यांनीं उल्लेख केला, तो योग्यच होता. पण सर्वांत विशेष गोष्ट ही कीं सध्याच्या प्रसंगाचें महत्त्व जाणून हिंदी वर्तमानपत्र कर्त्यांनीं विचारपूर्वक लेख लिहिण्याचें जें धोरण ठेविलें आहे त्याबद्दल त्यांनीं प्रशंसापर उद्गार काढले, आणि वर्तमान पत्रांच्या संपादकांच्या गळ्याभोंवतीं आणखी एक गळफास टाकण्याची जी सूचना करण्यांत आली आहे तिच्याविषयीं स्वतःची असंमति त्यांनीं स्पष्टपणें दर्शविली. वर्तमानपत्रांचा धंदा विशेषसा किफायतीचा नसतांही व सरकारी अधिकाऱ्यांच्या अवकृपेस व त्यामुळे अवहेलनेस पात्र होण्यासारखे दुर्दैवाचे प्रसंग वरचेवर येण्याचें भय असतांही केवळ लोकशिक्षणासाठीं ह्मणून या व्यवसायात पडणाऱ्या संपादकांच्या कामगिरीची प्रशंसा करणारे व त्यांच्याकडे सहानुभूतीच्या व अनुकंपेच्या दृष्टीनें पाहणारे क्यानिंग साहेबांच्या मागून जे थोडे व्हाइसराय झाले त्यांत लॉर्ड हार्डिंज साहेबांचा नंबर बराच वर लागेल यांत शंका नाहीं. असे व्हाइसराय प्राप्त झाल्याबद्दल कोणाला धन्यता वाटणार नाहीं!

## विद्याखात्याचा वार्षिक रिपोर्ट.

मध्यप्रांत व वऱ्हाड यांतील विद्याखात्याच्या १९१३।१४ सालच्या नुकत्या प्रसिद्ध झालेल्या रिपोर्टांत शिक्षणविषयाचें लोकांना अधिकाधिक वाटूं लागलेलें महत्त्व, लोकांच्या वाढत्या गरजा भागविण्याची सरकारची असमर्थता, व लोकांच्या सहकारित्वाची अवश्यकता, शिक्षणक्रमांत फेरफारकरण्याची जरूरी आणि मध्यप्रांताला लवकर युनिव्हर्सिटी मिळण्याची लोकांची अपेक्षा वगैरे अनेक महत्त्वाच्या गोष्टींचें प्रातिबिंब पडलेलें दिसून येतें. शिक्षणाचें महत्त्व ओळखून त्या प्रीत्यर्थ प्रत्यक्षकृति करण्याचे कामीं वऱ्हाड प्रांताचें पाऊल पुढें आहे हें या रिपोर्टांत जागोजागीं कबूल करण्यांत आलें आहे हें पाहून आह्मांस जितका संतोष वाटतो, तितकाच हायस्कुलांतून विद्यार्थ्यांची गर्दी झाल्यामुळें त्यांच्या शिक्षणाचें नुकसान होत आहे व शिक्षणक्रमाला व्यवहारोपयोगी बनविण्याची आवश्यकता जास्तजास्त भासूं लागली आहे तरी अनेक कारणांमुळें या अडचणी दूर करण्यास सरकारी अधिकारी तूर्त असमर्थ आहेत हें पाहून खेद वाटल्यावांचून राहत नाहीं. शिक्षणाचा सगळा भार सरकारावर टाकणें आह्मांस पसंत नाहीं. या कामासाठीं पुण्याच्या डेक्कन एज्युकेशन सोसायटी सारखी एखादी संस्था वऱ्हाडपुरती निर्माण होणें अवश्य आहे, आणि सरकारनें या कामीं सहानुभूतिपूर्वक उत्तेजन दिल्यास अशी एखादी संस्था निर्माण होणें अशक्य नाहीं, या गोष्टीचा विचार आमचे लोकमान्य पुढारी अवश्य करतील व जागजागीं शाळा स्थापून सरकारवरचें ओझें हलकें करतील अशी आह्मी आशा करतों. उमरावतीस स्थापन झालेल्या मुलींच्या हायस्कुलाबद्दल लोकांच्या प्रशंसनीय कृतीचें रिपोर्टांत जें अभिनंदन केलें आहे तें अधिकाऱ्यांच्या गुणग्राहकतेचें उत्कृष्ट प्रमाण आहे. पण त्याबरोबर आह्मांला हें ही सांगणें अवश्य दिसतें कीं आमच्या समाजाच्या सद्यःस्थितीचा विचार करतां मुलींचा व मुलांचा शिक्षणक्रम एकच असावा कीं काय, आणि मुलींच्या हायस्कुलाचें नेतृत्व आमच्या समाजाशीं पूर्णपणें अपरिचित असलेल्या युरोपियन बाईचे हातीं असण्यापेक्षां आमच्या समाजांतल्याच व स्त्रियांच्यागरजा, आणि त्यांचीं सुखदुःखें यांचें अनुभविक ज्ञान असलेल्या एखाद्या देशी हिंदु बाईकडे असणें अधिक श्रेयस्कर होईल या गोष्टीचा विचार अवश्यमेव व्हावयास पाहिजे. तूर्त येवढेंच सांगून व लवकरच पुनः या रिपोर्टाकडे वळण्याचें अभिवचन देऊन आह्मी दुसऱ्या विषयांकडे वळतों.

## पंजाब हिंदु कान्फरन्स.

प्रत्येक जातीनें आपली निराळी परिषद स्थापून आपल्या जातीच्या बऱ्यावाईट गोष्टींचा विचार करणें यापासून एक राष्ट्रीयत्वाला धक्का पोचतो असें कित्येकांचें ह्मणणें आहे, पण आह्मांला तसें वाटत नाहीं. प्रत्येक जातीनें एकराष्ट्रीयत्वाविषयीं उदासीनता न दाखवितां किंवा राष्ट्राचें एक अंग ह्मणून आपल्यावर जो कर्तव्याचा भार आहे तो न विसरतां स्वतःच्या जातीच्या सुधारणेचा विचार केला तर तो सर्वतोपरी इष्टच आहे असें आह्मांस वाटतें आणि ह्मणून पंजाबांत भरलेल्या हिंदुकान्फरन्सचें आह्मीं अभिनंदन करतों. पंजाबांत हिंदु व मुसलमान या जातींत तीव्र द्वेषभाव आहे असें सिव्हिल अँड मिलिटरी ग्याझिट सारखीं पत्रें वारंवार भासवीत असतात पण हें किती खोटें आहे हें परवाच्या हिंदुकान्फरन्सचे वेळीं दिसून आलें. हिंदुकान्फरन्सच्या अध्यक्षांचें स्वागत करण्यांत उदार विचारांचे अनेक मुसलमान गृहस्थही सामिल झाले होते. मुसलमानांच्या धर्मगुरूचा ही असाच सन्मान हिंदूकडून होण्याचा प्रसंग येईल तेव्हां आह्मांला खरोखर फार आनंद वाटेल. हिंदु जातीचा दिवसेंदिवस ऱ्हास होत आहे ही गोष्ट निर्विवाद आहे. आमच्या समाजांतल्या बालविवाहासारख्या रूढी, व अस्पृश्य वर्गाला आजपर्यंत हिंदुसमाजाकडून मिळालेली आजपर्यंतची वागवणूक वगैरे अनेक कारणें या गोष्टीच्या मुळाशीं आहेत. त्यांचा विचार करून आजपर्यंत अज्ञानामुळें घडत आलेल्या चुका सुधारण्याचा काळ आतां आलेला आहे या गोष्टी यंदाच्या हिंदुकान्फरन्सच्या अध्यक्षांनीं जशा स्पष्ट रीतीनें समाजापुढें मांडल्या, तशा वरचेवर मांडण्यांत येतील तरच आमच्या समाजाचे डोळे उघडतील. श्री रामचंद्राला भिल्लिणीचीं उष्टीं बोरें खातांना आपण जातिभ्रष्ट होऊं अशी शंका जर आली नाहीं, तर हिंदुसमाजानें आपल्यांतल्याच अस्पृश्य वर्गाच्या संसर्गानें बाटण्याचें भय कां वाटावें, व त्यामुळें येवढ्या मोठ्या अस्पृश्य वर्गाचीं मनें दुखविण्यास व त्याला धर्मांतर करावयाला लावून स्वतःचाच ऱ्हास करून घेण्यास त्या समाजानें कां तयार व्हावें असा कान्फरन्सच्या अध्यक्षांनीं विचारलेला प्रश्न हिंदुकान्फरन्सचें प्रगतिपर धोरण व्यक्त करणारा आहे. हिंदुकान्फरन्सच्या बैठकीत पंजाब व संयुक्त प्रांत या पुरत्याच न ठेवतां कांग्रेसप्रमाणें त्या फिरत्या होतील तर सगळ्या हिंदुस्थानांतल्या हिंदु समाजांत कालांतरानें कां होईना पण विचार जागृति झाल्यावांचून राहणार नाहीं. आणि अशी विचार जागृति हाच हिंदुस्थानचा प्रस्तुतचा तरणोपाय आहे.

## पुराणांतलें भूगोलविषयक ज्ञान.

' नवयुग ' मासिक पुस्तकाच्या एका अंकांत ' पुराणांतील शास्त्रज्ञान ' या नांवाचा एक लेख नुकताच येऊन गेला आहे. त्यांत गणित, ज्योतिष, पदार्थविज्ञान वनस्पतिशास्त्र इ. संबंधानें आमच्या पुराणांतून कशा प्रकारची माहिती मिळते त्याची थोडक्यांत चांगली माहिती दिली आहे. हाच लेख अधिक व्यापक स्वरूपाचा असता तर त्यांत पुराणांतून भूगोल विषयक माहितीही कशी मिळते त्या विषयींचा उल्लेख करण्यांत आला असता. कारण अलीकडचे सुशिक्षित ह्मणविणारे लोक पुराणांना किती ही नांवें ठेवोत, पण त्यांत कित्येक गोष्टी संबंधानें फार मूल्यवान माहिती आहे यांत शंका नाहीं. फार लांब कशाला ? ज्या नाइल नदीचा उगम शोधून काढण्यासाठीं युरोपियन शोधक कित्येक वर्षें शिकस्तीचे प्रयत्न करीत होते. त्या नदीच्या उगमाविषयींचा अगदीं स्पष्ट उल्लेख आमच्या पुराणांतून आहे, आणि तो असल्याविषयीं आश्चर्य वाटण्याचें कारण नाहीं. कारण कीं इजिप्त देश व हिंदुस्थान यांच्यामध्यें ईसवी सनाच्या पूर्वी कित्येक शतकांपासून व्यापार वाणिज्यादि व्यवहारांनिमित्तानें अतिशय दळणवळण होतें. त्यावेळीं हिंदुस्थानचें लोक गुजराथच्या बंदरांतून जहाजें हाकारून बर्बर देशच्या ( इजिप्तच्या ) किनाऱ्यावर उतरत असत. हिंदु लोक मोठे शोधक होते. ते ज्या देशांत जात तेथील भूगोल विषयक ज्ञान उत्तम प्रकारें मिळवीत व त्यांचें टांचण करून ठेवीत. अर्थात् आफ्रिकेंतली प्रतिगंगा जी नाइल नदी तिच्या संबंधानें हिंदूंच्या प्राचीन पुराण ग्रंथांतून उल्लेख आहेत यांत नवल नाहीं. नाइल हें नांवच 'नील' या संस्कृत शब्दाचा अपभ्रंश आहे. इजिप्त देशाला आमच्या पुराणग्रंथांतून कुशद्वीप असें नांव आहे. खुद्द इजिप्तच्या प्राचीन भाषेंत ही त्या देशाला ' कुश ' हेंच नांव आढळतें. ले. स्पेक साहेबांनीं आमच्या पुराणांतल्या माहितीवरून आफ्रिकेचा नकाशा तयार केला. त्यांत चंद्रस्थान नांवाचें एक मोठें सरोवर दाखविलें आहे व त्याच्या जवळच ' अमर ' नांवाचें एक स्थान त्यांना आढळलें. या स्थानापासून ' नील ' नांवाची नदी

निघालेली त्यांना आढळली. हें 'अमर' स्थानह्मणूनच पाश्चात्य शोधकानीं महत्प्रयासानें शोधून काढलेलें नाइलनदीचें उगमस्थान उर्फ व्हिक्टोरिया नाएंझा हें होय. हा शोध लावणारे ले० स्पेक साहेब लिहितात कीं आफ्रिकेंतल्या सरोवराची माहिती प्राचीन काळच्या हिंदु लोकांनीं करून घेऊन ती इजिप्तमधल्या लोकांना प्रथम सांगितली असली पाहिजे यांत शंका नाहीं. पण आश्चर्याची गोष्ट ही आहे कीं आमच्या पुराणांत असे पाश्चात्यांना आश्चर्यचकित करून सोडणारे शोध असतां त्या पुराणांचा आह्मी तिरस्कार करतों, आणि गोरगाटी ह्मणून ज्याला तुह्मी फेंकून देत आहां ती पुराणें गारगोट्या नव्हत, तर असल बहुमोल रत्नें आहेत असें सांगण्यास ले० स्पेक साहेबासारख्यांची आह्मांला गरज लागते! धिक्कार असो आमच्या शिक्षणाला!

## अरविंद बाबूंची तपश्चर्या

आपणावर आलेल्या संकटाच्या निवारणाचा उपाय शोधून काढण्यासाठीं पूर्वीचे क्षत्रिय, व देवदानव तपश्चर्येसाठीं निघून जात व उग्र तपश्चर्येच्या अंतीं दिव्यज्ञान प्राप्त करून घेऊन परत येत अशा गोष्टी महाभारत व पुराणादि ग्रंथ यांत आपण वाचतों. बाबू अरविंद घोष यांची धर्मश्रद्धा जागृत असल्यामुळें त्यांच्यावर जेव्हां पांच सहा वर्षांपूर्वी संकट आलें होतें तेव्हां त्यांनीं एकेदिवशीं कोणाला न कळवितां पांदेचरीची वाट धरून तेथें तपश्चर्या सुरू केली आणि आह्मांस कळविण्यास संतोष वाटतो कीं या तपश्चर्येनें त्यांच्या ज्ञानावरचा मळ काढुन टाकून तें उज्वल केलें आहे. त्यांच्या मुलाखतीची जी हकीकत मद्रासच्या 'हिंदु' पत्रांत प्रसिद्ध झाली आहे. ती विश्वसनीय असेल तर ब्रिटिश राज्यकर्ते व हिंदुस्थानची प्रजा यांच्यामधील संबंध, हिंदी लोकांचें ध्येय व तें साध्य करण्याचे योग्यमार्ग यांच्या संबंधानें त्यांची दृष्टि तपश्चर्येमुळें निर्मळ होत चालली आहे व कल्पनेच्या विमानांत बसून भराऱ्या मारण्याचें सोडून त्यांचे पाय वस्तुस्थितीच्या भूमीवर टेकून चालण्यास कबूल झाले आहेत असें म्हटलें पाहिजे. कांग्रेस ह्मणजे भीक मागणारी संस्था हें निंदाव्यंजक नांव देणारे अरविंदबाबू आणि गेल्या कांग्रेसचे अध्यक्ष ना. मि. भूपेंद्रनाथ बसु यांच्या भाषणाचे गोडवे गाणारे व त्यांना खरे मुत्सद्दी समजणारे अरविंद बाबू एकत्र असें सांगितलें तर ते कोणाला खरे सुद्धां वाटणार नाहीं, इतकें तपश्चर्ये मुळें अंतर पडलें आहे. इतकेंच नाहीं तर सातआठ वर्षांपूर्वी उत्साहाच्या भरात अविचारानें आपल्या हातून उच्चार व कृति यांच्या संबंधांत अत्याचार घडला अशी कबुलीही ते निःशंकपणें व मोकळ्या मनानें देत आहेत. गेल्या दहा वर्षांत राज्यकर्त्यांशीं हिंदुस्थानच्या लोकांनीं ठेविलेली सहकारिता पाहून त्यांनीं समाधान व्यक्त केलें आहे, व हिंदुस्थानाविषयीं ठेविलेल्या दृष्टीचा कोन यापुढें आपण बदलला पाहिजे असे जे उदारपणाचे उद्गार हिंदुस्थानच्या अंडर सेक्रेटरी साहेबांनीं नुकतेच काढले त्यांत हिंदुस्थानच्या भावी आशेचें बीज त्यांना दिसूं लागलें आहे. या सगळ्या गोष्टी अत्यंत समाधान कारक आहेत. अरविंद बाबू सारख्या बुद्धिमान् आणि लेखनपटु गृहस्थाच्या मतांत तपश्चर्येच्या योगानें जें हें स्पृहणीय अंतर पडलें आहे तें लक्षांत घेऊन हिंदुस्थान सरकारनें कृपाळु होऊन त्यांना आतां आपल्या हद्दींत येण्याची परवानगी द्यावी, अशी आह्मी आतां त्यांना अत्यंत नम्रपणें प्रार्थना करतों.

---

## युद्धकथा.

सरकारी साप्ताहिक युद्धवृत्ताच्या ६ व्या लेखांत पूर्वार्ध जर्मनी व आस्ट्रिया यांस रसदेच्या तुटवड्यामुळें कसें पेंचांत व जेरीस आणिलें जात आहे याचा उल्लेख आहे तो वगळून उत्तर भाग पोलांड मधील व काकेशिया कडील लढाया संबंधानें असून पूर्वेच्या भागाकडून लढाई कशी संपुष्टांत येत चालली आहे हें दर्शविण्यासाठीं आह्मी तो भाग खालीं देतोंः—

पूर्वेकडे ह्मणजे वार्साच्या पश्चिमेस पोलंडमध्यें जें घनघोर युद्ध रशिया व जर्मनी या दोन राष्ट्रांमध्यें आज कांहीं आठवडे माजून राहिलें होतें तें आतां संपलें, अशी तार आली आहे कीं, जर्मन व आस्ट्रियन सैन्यांचा पोलंडमध्यें पुढें घुसण्याचा प्रयत्न सपशेल फसला इतकेंच नाहीं, तर प्रत्येक ठिकाणीं त्यांचा पुरा मोड होऊन व पुष्कळ लोक गारद होऊन त्यांस माघार घ्यावी लागली. जर्मन सैन्य अजून हल्ले करित आहे पण ती केवळ तितकाच अधिक वेळ सांपडावा ह्मणून खटपट आहे हातघाईच्या लढाया पुष्कळच झाल्या, पण प्रत्येक खेपेस रशियन सैन्याचेंच श्रेष्ठत्व दिसून आलें. ह्या अवधींत रशियन सैन्य बुकोव्हिनाचे (हा एक रुमानियाचे बाजूस आस्ट्रियाचा प्रांत आहे) दक्षिणेस घुसलें आहे आणि गॅलिशिया व हंगरीकडे जाणारे आगगाडीचे रस्ते त्यांनीं आपले ताब्यांत घेतले. असें दिसतें कीं, रशियन सैन्यानें जर्मन सैन्यास अडकावून ठेवलेंच आहे पण तें आणखी पलीकडे दक्षिणच्या बाजूस पुढें सरकत आहे; हेतु हा कीं, आस्ट्रियाचे मुख्य सैन्यास वळसा घालून पुढें हंगेरीचे मुलुखांत घुसावें. ह्या हालचालीनें हंगेरीमध्यें बरेंच भय उत्पन्न झालें आहे; आणि असें कळतें कीं हंगेरीवर स्वारी झाल्यास आमचें संरक्षण व्हावें ह्मणून जें आस्ट्रियन सैन्य जर्मन सैन्याबरोबर पोलंडमध्यें आहे तें इकडे पाठवून द्यावें अशी हंगरीतील लोकांनीं मागणी केली आहे. आस्ट्रियन सैन्य जर तिकडे पाठविण्यांत आलें तर पोलंडमधील शत्रूचें सैन्य कमी होऊन त्या मानानें रशियन सैन्याचें बळ अधिक होईल.

तथापि गेल्या आठवड्यांतील मुख्य महत्वाची बातमी ह्मणजे आशियामायनरमध्यें रशियन सैन्यानें तुर्की सैन्याचे जे पुरे पराभव केले ती होय. जर्मनीला मोठी आशा होती कीं तुर्कस्थानाला आपले पक्षांत मिळवून घेतलें ह्मणजे तुर्की मुलुखास लागून असलेल्या रशियाचे काकेशिया (काळ्या समुद्राचे पूर्वेस) प्रांतावर तुर्कांनीं स्वारी केली तर ह्या आपले मुलुखाचे संरक्षणासाठीं रशियाला आपलें कांहीं सैन्य पोलंडमधून काढून घेणें भाग पडेल. पण रशियानें तसें कांहींच केलें नाहीं. रशियानें आपलें पोलंडमधील सैन्य मुळींच कमी केलें नाहीं त्यांनीं नवेंच सैन्य उभें केलें, आणि ह्या नव्या सैन्याचे साहाय्यानें त्यानीं तुर्कांचे आर्दाहान व सरीकामिश ह्या दोन ठिकाणीं नुकतेच पुरे पराभव केले. तुर्कांचें सबंध एक आर्मीकोर (सुमारें ४० हजार लोक) कैद करण्यांत आले व बाकीच्या तुर्की सैन्यानें पळ काढला.

---

## सध्याचें महायुद्ध.

गेल्या आठवड्यात युद्धाला बराच रंग चढला होता. पश्चिम हद्दीवर सॉयन्स हें युद्धचें केंद्र होतें. तेथें व न्हेम्स येथें शत्रू कडच्या तोफखान्यानें आपली शिकस्त केली, पण कांहीं उपयोग झाला नाहीं. संयुक्त सैन्यें एका मागून एक खंदक सर करीत गेले. यावेळींही हिंदी फौजेनें तारीफ करण्यासारखें शौर्य दाखविलें. परंतु हिंदी लोकानीं घेतलेल्या खंदकात जर्मन लोकानीं सुरुंग लावून ठेविले होते. त्यामुळें त्या खंदकांत हिंदी प्राणांची फार हानि झाली. तथापि या दगलबाजीबद्दल सूड उगविण्यास संयुक्त सैन्यानें कमी केलें नाहीं. एके ठिकाणीं तर जितके जर्मन सापडले तेवढे सगळे त्यांनीं कापून काढले. जर्मन लोकाना लाबासी हें ठिकाण मुकाट्यानें सोडून जावें लागलें. ही पश्चिम हद्दी वरची स्थिती झाली. पूर्वेकडे विस्तुला नदीचा पूर्व किनारा हें लढाईचें केंद्र आहे. येथें ही जर्मनीला मागें हटवीत हटवीत रशियानें पुष्कळ पुढें पाऊल टाकिलें आहे. शक्तीनें होत नाहीं अशीं कामें युक्तीनें करण्यांत जर्मन लोक वस्ताद आहेत. त्यांनीं हार खातांच पांढरें निशाण दाखविलें. पण रशियन लोकांना जर्मनीचा हा कावा पुरेपणीं ठाऊक झाला असल्यामुळें ते फसले नाहींत. दक्षिणेकडे रशिया तुर्कांचा चांगलाच समाचार घेत आहे. करोरगाम येथें तुर्कांचा पराभव करून रशियानें कित्येक तुर्की आफिसरांनाही पकडलें. शिवाय ११ वी तुर्की पलटण त्यांनीं साफ कापुन काढली. रशियन आरमारानें याचवेळी तुर्कस्थानची धान्यादि सामुग्रीचीं आठ जहाजें बुडविलीं. इतकेंच नाहीं, तर रशियानें तुर्कांना चोरोकच्या पलीकडे हाकून लाविलें

जर्मनी यावेळीं सर्व बाजूनीं पेचांत सापडला आहे यांत शंका नाहीं. लढाईत ठिकठिकाणीं हार खावी लागत आहे. पैशाची तूट पडली आहे व कर्ज तर मिळण्याचा संभव नाहीं, अशा अडचणींत सापडलेल्या जर्मन फडणिसानें राजीनामा द्यावा यांत आश्चर्य नाहीं. जर्मनीनें इटलीकडे आपला नामांकित वकील पाठविला पण त्याचे प्रयत्न व्यर्थ झाले. अमेरिकेंतही लोकांची सहानुभूति सगळी इंग्लंडच्या बाजूला आहे. ही सगळी बातमी ब्रिटिश प्रजेला आनंददायक वाटणारी आहे पण गेल्या दोन दिवसांत या युद्धाचें क्षेत्र अधिक विस्तृत होतें कीं काय अशी शंका वाटण्यासारखी बातमी येत आहे. प्रस्तुतच्या युद्धांत जर्मनीनें जर्मन समुद्रांत जिकडेतिकडे सुरुंग अव्यवस्थितरीतीनें लावून ठेविल्यामुळें स्वीडनच्या व्यापाराला जबरदस्त धक्का बसला आहे. हें राष्ट्र आजपर्यंत तटस्थ होतें व अद्यापही आहे. तथापि किती दिवस असें सांपत्तिक नुकसान सोशीत राहणार? त्यापेक्षां युद्धांत पडून एकदा सोक्ष कीं मोक्ष करून घ्यावा अशा प्रकारचे विचार तेथील मुत्सद्यांच्या डोक्यांत घोळूं लागले आहेत. स्वीडन युद्धांत पडल्यास तो कोणत्या पक्षाला मिळेल तें अद्याप निश्चित सांगतां येत नाहीं. कोणत्याही पक्षाला मिळाला, तरी युद्धाचा निकाल त्वरित होण्यास त्याची मदत होईल हें संभवनीय आहे. इराण व तुर्कस्थान यांच्यांत उपस्थित झालेल्या प्रकरणाला बराच रंग चढला आहे. तुर्कस्थान इराणचें तार्त्रिज शहर घेऊनच राहिलें नाहीं, तर इराणच्या दोन ठिकाणच्या गव्हर्नरांना गोळी घालून व दुसऱ्या कांहींजणांना जिवंत जाळून त्यानें ठार केलें असल्याच्याही खबरा आल्या आहेत. हा सगळा प्रकार पाहून आधीं बुद्धि जातें आणि मागाहून भांडवल जातें अशी जी मराठींत ह्मण आहे ती तुर्कस्थानासंबंधानें खरी ठरणार कीं काय तें कळत नाहीं.

---

## लढाईची वर्गणी

इतर इलाख्यांच्या मानानें या सार्वजनिक कार्यांत आमचा प्रांत मागें नाहीं किंबहुना कित्येकांच्या पुढें आहे ही गोष्ट आनंदाची होय. एकंदर वर्गणी सुरू झाल्यापासून चालू वर्षाच्या प्रारंभीपर्यंत ९६७७१० रुपये २ आणे २ पै जमली आहे. हीच वर्गणी अशी आहे कीं जिला सर्वांचा हातभार लागलेला आहे. सर्व पक्षांचे, व भिन्न भिन्न विचाराचे, लोक ही वर्गणी एक दिलानें देत आहेत हें विसरता कामा नये. एकंदर वर्गणीची जिल्हेवारी जिल्ह्याजिल्ह्याच्या नांवानिशीवार आमच्या कडे आलेली आहे तिच्यावरून या इलाख्याच्या २२ जिल्ह्यांची तुलना करिता यावी ह्मणून आह्मी तो तक्ता खालीं मराठींत देत आहो. या आंकड्यावरून सरकारी दुजोरा कोठें लागला व वर्गणीचे आकडे कसे मोठेमोठे पडले याचाही अंदाजा करण्याला हा तक्ता मोठेंच साधन होय. सरकारचा हेतु या वर्गणी संबंधानें एक शब्दही वजनाचा न टाकावा असा होता आणि तो निर्धार आमच्या आकोल्याजिल्ह्यांत निश्चयानें व नेटानें अंमलांत राहिला आहे. धर्मादायाच्या बाबतींत कोणीच कोणाचा हात धरीत नसतात. पुण्यकार्यामध्यें जो तो स्वतंत्र असतो. आणि त्यांना कोणीच मर्यादा घालूं शकत नाहीं. या दृष्टीनें पाहता आह्मी बुलडाणा जिल्ह्यांतील लोकांचे धन्यवाद गातों आणि त्यांनीं जो उदारपणा आपल्या वर्गणीच्या आकड्यांत व्यक्त केला आहे तो वर्णनीय आहे. किंबहुना त्यांना अशी वर्गणी देण्याची क्वचितच पाळी येत असेल अशी शंका येते. आणि त्या मुळेंच नवल नवल एक लाखाएवढा आंकडा बुलढाणे जिल्ह्या-

शेंकडों लोकांना जीवदान देणारें जालीम औषध.

## सरदी कॉलरा संग्रहणी पोटदुखी

संधिवात, फेंफरें, प्लेगची गांठ सर्व जातींचा ताप, अजीर्ण, प्लग, विंचवाचे दंश वगैरेवर अत्यंत गुणकारी.

## जव्हेरीयनचें जीवनामिक्श्चर



हजारों लोकांचें प्राण वांचले आहेत. विश्वास ठेवून वापरा. मोठी शि. रु. १॥ लहान शि. ०१२

वी. एच. जव्हेरियन कंपनी,
खलासीचकला, मुंबई.

नो० न० २२

मांगालिक प्रसगीं बक्षीस देण्याकरितां

सेंटचाराजा.

## आटो—दील—चमन.

हें सर्वोत्तम सेंट मुद्दाम वापरण्यासाठीं हल्लींच्या फॅशनचें हें एकच होय. फक्त २—३ थेंब रुमालावर टाकल्यानें चमेलीच्या आणि बटमोगऱ्याच्या हजारों ताज्या फुलांइतका सुवास ८ दिवसपर्यंत टिकतो एका लहान बाटलींत हा सुगंधी पुष्पांचा भांडार आहे किं, रु. -॥- -॥।- व रु. २ ट. ख. वेगळा. सुवासिक कार्डें दिलचमनचीं दर डझनास रु. -॥।- "

सोल एजन्ट्स. एच, आर. मोदी आणि कं.
नं. १० प्रिन्सेस स्ट्रीट, मार्केटसमोर, मुंबई.

सतत १० वर्षांच्या पुर्ण अनुभवानें उत्तमोत्तम ठरलेला
दूषित रक्त शुद्ध करणारा




शरीराचा पंचप्राण म्हणजे शुद्ध रक्त होय. तेंच एकदां बिघडलें कीं नाना तऱ्हेचे रोग देहांत आपला शिरकाव करूं लागतात. भयंकर अशा उपदंशजन्य विकारांमुळ व तदनुषंगिक होणाऱ्या पक्षघातासारख्या रोगामुळें अर्धांग वायु, अवयव लुले पडणें, स्मरणशक्ति कमी होणें, शरीरावर गांधी उठणें, व्रण व काळे डाग पडणें, संधिवात व दूषित रक्तामुळें उद्भवणाऱ्या इतर सर्व रोगांवर हाच सार्सापरिला देणें फारच उत्तम होय. अनुभवाशिवाय गुणाची कल्पना येणार नाहीं. किंमत १ बाटलीस रु.१।. टपालखर्च -।- पांच आणे. चार बाटल्यांस टपालखर्चासह रुं. ४॥- उत्तम गुणास चार बाटल्या लागतात. आमचा सार्सापरिल्याचा खप पाहून बऱ्याच लोकांनीं हुबेहुब नकल केली आहे. तरी घेतांना तो आमचाच आहे अशाबद्दल खात्री करून घेणें.

मालक-- डा. गौतमराव केशव, आणि सन्स
ठाकुरद्वार पोस्टाजवळ मुंबई नंबर २.

नो० नं २३

## वृद्धपणाचा नाश व नवी जवानी.

नामर्दास मर्द बनविणारी

### राजवंशी नवरत्न याकुती,

किंमत रु० १० ट्रेड मार्क "सँडो"

व ढिल्या नसांना मजबूत बनविणारें.

### राजवंशी सांढ्याचें तेल,

किंमत रुपये ९ ट्रेड मार्क "सँडो."

असंख्य लोकांनीं एकच डबी वापरून अपरंपार शक्ती मिळविली आहे. सरकारचे अॅनॅलायझर, वैद्य व डाक्तर यांनीं तपासून व वापरून उत्तम सर्टिफिकिटें दिलीं आहेत.

### परमा सायरप.

कसल्याही प्रमेहावर तीन दिवसांत खात्रीनें गुण देणारें औषध. एक फारच अत्युत्तम आश्चर्यकारक इलाज किं० ३ औंसाच्या बाटलीस २॥ रुपये.

ठिकाणा :— डॉ० डी० एच० भट,
खबुतरखाना भुलेश्वर मुंबई.

नो० नं० २४

## Oriental Government security Life Assurance Co., Ltd

ESTABLISHED 1874.

HEAD OFFICE, BOMBAY. R. PATERSON BROWN MANAGER
THE LEADING INDIAN LIFE ASSURANCE COMPANY

## FUNDs 4 CRO RES.

INVESTITED IN GOVERNMENT SECURITIES AND MUNICIPAL AND PORT TRUST BOUNDS.

### Quinquennial ecord of Progress.

| Year. | No. of Polices in force. | Exisra Assunces. |
|---|---|---|
| | Rs | Rs. |
| 1888 | 8668 | 2,63,38,000 |
| 1893 | 17,657 | 4 68,36,090 |
| 1898 | 28,516 | 6,81,27,774 |
| 1903 | 40,390 | 8,47,06,108 |
| 1908 | 52,168 | 10,12,93,883 |
| 1913 | 62 097 | 12,36,79,510 |

| Year. | Annual Income. | Total Assets. |
|---|---|---|
| | Rs. | Rs. |
| 1888 | 11,48,642 | 36 38,694 |
| 1893 | 21,16,549 | 80 05,818 |
| [illegible] | 3136 421 | 1,41,32356 |
| 1903 | 1 0709 | 2,10,95,947 |
| 1908 | 53,55,639 | 3,22,79,991 |
| 1913 | 69,44,548 | 4,41,61,889 |

## RECORD BONUS

*The Bonus declared for the last triennium constitutes a record.*

IMMEDIATE PAYMENT OF CLAIMS AFTER PROOF OF DEATH and TITLE. THE RATES ARE BASED ON ACTUAL INDIAN EXPERIDNCE AND ARE VERY LOW.

*Extract from report made npon the Company's position as at 31st December 1912, by Mr. Thomas WALLACE, Fellow of the institute of Actuaries, London.*

"At each of the last three Valuations the Reserves of the Company have been calculated on an increasingly stringent basis. On this occasion there has been a further addition to the reserves and the financial position of the Company has been further strengthened. The resources of the Company are now so ample that the security which they afford is undoubted and Policyholders and Shareholders alike may confidently look forward to a continuation of prosperity in the future."

Do not delay in applying for Insurance—delays are dangerous. The Oriental is the leading Indian Life Assurance Company. Providing the Policy holders with a absolute security and possessing all the important factors essential in a first class office it commands the full confidence of the public.

INFLUENTIAL AND ENERGETIC AGENTS WANTED. TERMS LIBERAL
Full particulars, prospectus and prosposal forms on application to:—

**M. deSOUZA,**
CHIEF AGENT,
C. P. Berar & Khandesh, NAGPUR

N. N. 25

हें पत्र आकोला येथें कैलासवासी खंडेराव बाळाजी फडके यांच्या वऱ्हाडसमाचार छापखान्यांत नारायण खंडेराव फडके यांनीं सदाशिवआश्रमांत छापून प्रसिद्ध केलें